## एच.पी.टी ॲण्ड आर.वाय.के. कॉलेज, नाशिक


# शतकमहोत्सवी वर्ष

## १९२४ - २०२४

# गुरू अर्घ्य

# महाविद्यालयाचे यशवंत विद्यार्थी







।। हंसक्षीरन्यायेन गृहाण यद्यदुत्तमम् ।।

## एच. पी. टी. आर्ट्स ॲण्ड
## आर. वाय. के. सायन्स महाविद्यालय, नाशिक

# गुरु अर्घ्य



विद्येचा आगर - हं. प्रा. ठा. महाविद्यालय.



# आमची श्रद्धास्थाने,
# आमचे आदरणीय गुरुजन





## मा.नामदार गोपाळ कृष्ण गोखले

अन्वर्थवेदी शूरश्च क्षमावान्न च कर्कशः ।
कल्याणमेधास्तेजस्वी स भद्रः परिकीर्तिते ।।


जी व्यक्ती बुद्धिमान्, शूर, क्षमावान् आणि सहृदय असते, जनकल्याणाच्या भावनेने युक्त असते, तेजस्वी असते, तिलाच समाजामध्ये कल्याणकारी म्हटले जाते.

## मा.प्रिं.टी.ए. कुलकर्णी

रत्नैर्महार्घैस्तुतुषुर्न देवा न
भेजिरे भीमविषेण भीतिम् ।
सुधां विना न प्रययुर्विरामं न
निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः ।।

अतिशय मूल्यवान् रत्नांनी देव संतुष्ट झाले नाहीत किंवा भयंकर विषाने ते भ्याले नाहीत, तर अमृतप्राप्तीशिवाय ते थांबले नाहीत कारण इष्टार्थप्राप्तीशिवाय धैर्यवान् लोक कधीच थांबत नाहीत.

# आमची श्रद्धास्थाने,
# आमचे आदरणीय गुरुजन





## मा. प्राचार्य श्री.बा.पंडित

मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णास्
त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः ।
परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ॥

मन, वाणी व शरीर यांमध्ये पुण्यरूपी अमृतानें परिपूर्ण असलेले, त्रिभुवनाला अनेक उपकारांनी आनंद देणारे व दुसऱ्याच्या अत्यंत अल्प गुणांना पर्वततुल्य करून, आपल्या अंतःकरणात संतुष्ट होणारे असे सज्जन किती असतात?
(अर्थात खूप दुर्मीळ असतात.)

## मा.सर डॉ.मो.स.गोसावी

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।
निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धनात्प्रमुच्यते ॥

जो कशाचाही द्वेष करत नाही आणि कशाचीही इच्छा करत नाही, तो पुरुष कर्मे करूनही नित्यसंन्यासी समजावयाचा; कारण हे महाबाहो, जो सुखदुःखादि द्वंद्वापासून मुक्त झाला तो अनायासेच कर्मांच्या सर्व बंधनातून मुक्त होतो.

**Gokhale Education Society's**

# HPT Arts & RYK Science College, Nashik-5

**(हंसक्षीरन्यायेन गृहाण यद्यदुत्त'' ।)**

***Leading towards Centenary... (1924-2024)***

Year of Establishment: 1924
Founder Principal: Prin. T.A. Kulkarni

## : Our Vision :

**Higher Education for all.**

First college established in the North Maharashtra Region
Accreditated 'A' Grade 3.11 CGPA, ISO: 9001: 2015 Certificate
Recognition: UGC- 2f, 12B
Best College Award (2019-20) by the SPPU, Pune

## : Name of the Donors :

1.Shriman Hansraj Pragji Thakarsey
2. Smt. Sunderbai Hansraj Pragji Thackersey
(Philanthropist and Industrialist, Mumbai)
3. Shriman Raojisa Yamasa Kshatriya
(Enterpriser and Philanthropist, Nasik)
4. Sapat Foundations (Philanthropic Enterprise, Mumbai)

## : Office Bearers :

Dr. V. N. Suryawanshi, Principal
Prof. Dr. A. B. Chaurasia (Science), Vice Principal
Prof. Dr. P. S. Deshpande (Arts), Vice Principal
Shri. Dilip Chavan, Registrar

## : Courses Offered :

**(I) Under-Graduate Courses:**

(a) Humanities: Sanskrit, Marathi, Hindi, English, Economics, Political Science, Geography, History, Psychology.

(b) Sciences: Chemistry, Physics, Electronics, Statistics, Mathematics, Botany, Zoology, Microbiology, Geography, Computer Science (Non-grant), Biotechnology (Non-grant).

(c) Vocational Stream (UGC Sponsored Courses) :

1) Functional English

2) Tourism and Travel Management,

**(II) Post-Graduate : M.A. / M.Sc. / Non Conventional**

- ARTS- Marathi, Hindi, English, Economics, Political Science, Psychology, Geography, History.
- SCIENCE- Physics, Chemistry (Organic), Chemistry (Analytical), Zoology, Microbiology, Botany, Computer Science
- Bachelor of Library & Information Science (B.Lib. & Inf. Sc.).
- Master of Library & Information Science (M.Lib. & Inf. Sc.).
- Master of Journalism & Mass Communication MA( JMC ).

**(III) Research Centers:**

Chemistry, Physics, Botany, Marathi, English, Economics, Geography, Hindi, Political Science.

**(VI) Certificate Courses in Languages:**

French, German, English

**Highlights of the College**

- The College, has completed 100 years of academic excellence. The college is celebrating its centenary in the academic year 2023-2024.
- The Science Stream was added in 1948 and the College was renamed as HPT Arts & RYK Science College in 1974.
- The Junior College with both for Arts and Science streams was added in

the year 1976. The Junior College was renamed after J.R.Sapat Junior College of Arts and Science attached to HPT Arts and RYK Science College as the Society received a generous donation from Sapat Foundation, Mumbai.

- ISO Certification from 9001:2015 and NAAC Reaccreditation: 'A' Grade in the year 2019.
- The College was selected by the University Grants Commission (U.G.C.), New Delhi in the year 1994-95 to implement its scheme of Vocationalization of Degree Education.
- Well-equipped Language Laboratory set up with UGC Assistance in the year 1984.
- Central Instrumentation facility for all Science Departments.
- The College has its own annual publication 'SHRADDHA' which provides an outlet for student's ideas and thoughts through creative writing.
- Renowned Marathi poet and the recipient of the prestigious 'Dnyanapeeth Award', Late Shri. V. V. Shirwadkar alias Kusumagraj, was alumni and Renowned Marathi Writer Prof. Vasant Kanetkar was teaching faculty of this college.
- The college library (Bhausaheb Vartak Granthalaya) is having more than 1,50,000 books and collection of more than 4000 manuscripts in its collection and rare books, along with a Reading room and Resource centre.
- The college offers various activities for the holistic development of students under Students' Council, NSS. NCC, Vidyarthini Mancha, Cultural Committee, Placement Cell, Earn and Learn, Girls'Counseling Cell, Parent-Teacher Association, Alumni Association.
- *Spanadana* - the cultural fest and *Amhi Jijau Savitrichya leki* - social outreach program are conducted every year.

# हं. प्रा. ठा. स्वागत - गीत

सरस्वतीचा पुत्र पातला आज तिच्या मन्दिरी ।
मङ्गल वाद्ये गुढया पताका तोरण बांधा दारी ।।
जवळ वाहते गङ्गा पावन पिकवित द्राक्षमळे ।
इथून वाहे सरस्वती ही फुलवित बुध्दिमने ।
मनामनातून उमलती इथे संस्काराची फुले ।
प्रज्ञेच्या प्रांगणात डुलती ज्ञानाची कमळे ।।
इथे राहिले राम जानकी पर्णकुटी बांधुन ।
वीर विनायक कान्हेरे हे याच भूमितिल धन ।
पलुस्करांचे भिजलेले स्वर दरवळती अजुन ।
वीणेतून श्रवणीय प्रकटली कुसुमाग्रज ही तान ।।
भूमि अशी ही आज करितसे तव स्वागत संपन्न ।
ज्योत ज्योत जागविण्या लाभो दीर्घायुष्य प्रसन्न ।।

- प्रा.डॉ. सौ. अरुणा य. रारावीकर

# मनोगत

सस्नेह नमस्कार!

गोखले एज्युकेशन सोसायटीचे एच. पी. टी. आर्ट्स अ‍ॅण्ड आर. वाय. के. सायन्स महाविद्यालय जून १९२४ मध्ये स्थापन झाले त्याला आता बरोबर १०० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने प्रकशित होणाऱ्या गुरुअर्घ्य या विशेषांकाला मनोगत लिहिताना मला खूप आनंद होत आहे. या १०० वर्ष पूर्ततेच्या वेळी मी आणि माझे सहकारी महाविद्यालयाच्या सेवेत आहोत हे आमचे परम भाग्य आहे. शंभर वर्षांमध्ये महाविद्यालयाने अनेक अभ्यासु, बुद्धिमान आणि कठोर परिश्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे विविध मार्ग उपलब्ध करून दिले. अगदी सुरवातीच्या काळात उच्च शिक्षणाची पदवी म्हणजे यशस्वी कारकीर्दीची हमी होती. अशा कालखंडात समाजातील अनेक गुणवंताना यशस्वी जीवनाचे द्वार उघडून देण्याची महत्त्वाची भूमिका या महाविद्यालयाने बजावली. अर्थात, त्यासाठी प्राचार्य टी. ए. कुलकर्णी आणि त्यांना मदतीचे हात देणारे संस्थेचे पदाधिकारी यांना ते श्रेय आहे. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी नाशिकमध्ये महाविद्यालय स्थापन करण्यासाठी दानशूर व्यक्ती पासून तर सर्व सामान्यांना या शिक्षण यज्ञात सामावून घेतले. मुंबईचे दानशूर उद्योजक हंसराज प्रागजी ठाकरसी यांच्या कडून २.५० लाखाची देणगी मिळविली त्यात रावजीसा यमासा क्षत्रिय या नाशिकच्या उद्योगपतींनी भर घातली आणि हे महाविद्यालय समृद्ध केले. महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी बरेच प्रयत्न प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांना करावे लागले. स्थापनेपासून महाविद्यालयातील प्राध्यापक आणि पदाधिकारी विद्यार्थाना जागतिक दर्जाचे नागरिक व्हावेत. शिक्षक आणि शैक्षणिक संस्था मधील व्यक्तींना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी महाविद्यालयात उपक्रम सुरू केले. अनेक नामवंत प्राध्यापक या महाविद्यालयाला लाभले त्यांनी आपले जीवनच विद्यार्थ्यांसाठी समर्पित केले. प्रा. देवस्थळी, प्रा. पाटणकर, प्रा. गजेंद्रगडकर, प्रा. आंबेकर, प्रा. वसंत कानेटकर, प्रा. राजदेरकर अश्या अनेक नामवंत प्राध्यापकांची देणगी

महाविद्यालयाला लाभली. अनेक विद्यार्थ्यांना प्राध्यापकांनी ज्ञानामृत दिले आणि त्यांच्या जीवनामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. ज्ञानार्जन करण्याची प्रेरणा देवून, समाजाचे ऋण फेडण्यासाठी प्रवृत्त केले. समाजामध्ये सुसंस्कृत तरुणांची भर घालून समाज अत्यंत समृद्ध केला. आपल्या शंभर वर्षांच्या वाटचालीत अनेक नामवंत प्राध्यापकांनी महाविद्यालयातील तरुणांना योग्य दिशा दिली आणि आपल्या देशाच्या विकासामध्ये योगदान देण्यासाठी प्रवृत्त केले. प्रा. सोहनी, प्रा. आचार्य, मिसेस आचार्य यांसारखे अनेक प्राध्यापक हे विद्यार्थ्यांच्या प्रेरणेचे केंद्रबिंदू होते. आजही अनेक माजी विद्यार्थी या महाविद्यालयाला भेट देतात आणि या सर्व प्राध्यापकांच्या आठवणीने व्याकूळ होतात. त्यांच्या आठवणी सांगतात व कृतज्ञता व्यक्त करतात आपल्या समर्पित जीवनातून ज्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली अश्या सर्व प्राध्यापकांना समर्पित हा आजचा विशेषांक आहे. आमच्या संपादक मंडळातील सर्व प्राध्यापकांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

**(डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी)**
प्राचार्य

# संपादकीय

आज हं. प्रा. ठा. कला महाविद्यालय शतक गाठत आहे तर मागाहून सुरू झालेला विज्ञान विभाग, रा. य. क्ष. विज्ञान महाविद्यालय, त्याच्या अमृत महोत्सवात पदार्पण करत आहे. हा एक अनोखा योगायोग आहे, असे वाटते, दुग्धशर्करायोगच जणू!!! हं. प्रा. ठा. कला आणि रा. य. क्ष. विज्ञान महाविद्यालयाने नासिक सह उत्तर महाराष्ट्राचा चेहरा-मोहराच बदलून टाकला. गोदाकाठावरील मंत्रघोषाने दिवसाचा आरंभ करणाऱ्या या नासिक नगरीत, आधुनिक शिक्षणाची ज्ञानगंगा ह्या महाविद्यालयाच्या रूपाने प्रथमतः आणली मा. प्राचार्य त्र्यंबक अप्पाजी कुलकर्णी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी मा. डॉ. चंदूबाई कुलकर्णी या लक्ष्मीनारायणांनी...

नामदार गोपाल कृष्ण गोखले यांच्या विचारांनी प्रभावित झालेले प्राचार्य कुलकर्णी, आधुनिक शिक्षण घेतल्यानंतर इतर शिक्षित तरुणांप्रमाणे ब्रिटिशांच्या सेवेत रुजू न होता, स्वतंत्र भारताच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहत होते. स्वतः शिक्षक असल्याने, शिक्षण हे असे माध्यम आहे की जे माणसाला नवी दृष्टी देते, ह्याची त्यांना मनोमन खात्री होती. त्यामुळेच आपल्या काही समानशील सहकाऱ्यां सह त्यांनी गोखले एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. ह्या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये सर्वत्र शिक्षण पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रयास सुरू केले. त्यांच्या या प्रयासाचे फलितच म्हणजे आपले हे हं. प्रा. ठा. कला आणि रा. य. क्ष. विज्ञान महाविद्यालय होय.

अध्यापकांनी स्थापन केलेली ही संस्था, अध्यापकच चालवत असणारी ही संस्था, मा. सर मो. स. गोसावी सर म्हणतात त्याप्रमाणे नेहमी स्वच्या जाणीवांपुढे आणि कोणत्याही प्रकारे राजकीय हेतू न बाळगता, ज्ञानासाठी शिक्षण, शिक्षणातून कौशल्यनिर्माण, शिक्षणातून सुजाण समाजाभिमुख कर्तव्यदक्ष नागरिक घडविणे, ह्या एका ध्येयाने शंभराहून अधिक वर्षे कार्य करत आहे. आपल्याकडे शास्त्र शिकत असतांना एक विचार असतो, अनुबंध चतुष्टयाचा. यांत शास्त्राशी संबंधित असणारा ग्रंथ अभ्यासत असतांना, शास्त्राचे उद्देश आणि त्या शास्त्राशी संबंधित ग्रंथाचे उद्देश समान असतात. अगदी त्याप्रमाणेच गोखले एज्युकेशन सोसायटीचे वर सांगितलेले ध्येयनिष्ठ उद्देश आणि तिच्याच ह्या पहिल्या महाविद्यालयाचे उद्देश समानच आहेत.

मुंबईसारखी महानगरी सोडून, प्राचार्य कुलकर्णी सपत्नीक या नाशिकसारख्या छोट्या गावात आले आणि गावापासून दूर अशा माळरानासारख्या असणाऱ्या परिसरात राहू लागले. या ओसाड माळरानाचे नंदनवन या दंपतीने केले. आज आपल्याला हे नंदनवनच दिसते, त्यामुळे त्याकाळच्या या परिसराची कल्पनाही आपल्याला करता येणार नाही. प्राचार्य कुलकर्णींनंतरच्या प्राचार्य पाटणकर,

प्राचार्य गजेंद्रगडकर, प्राचार्य आचार्य, प्राचार्य पुराणिक, प्राचार्य सोहनी, प्राचार्य ओक, यासारख्या प्राचार्यांच्या परंपरेने प्राचार्य कुलकर्णींचे स्वप्न साकार केले. हं. प्रा. ठा. महाविद्यालयाने उत्तमोत्तम प्राध्यापक आणि छात्रांचा एक वारसाच (Legacy) निर्माण केला. यात डॉ. गो. वि. देवस्थळी, प्रा. म. वि. गोविलकर, प्रा. वा. बा. दातार, प्रा. डी. के. बेडेकर, प्रा. राम बापट, प्रा. आठवले, प्रा. एम् जी देशपांडे, डॉ चंद्रकांत वर्तक, प्रा. वसंत कानेटकर, प्रा. गोगटे, प्रा. ओतूरकर, यांसारख्या अनेक प्राध्यापक सहकाऱ्यांची साथ या सर्व प्राचार्यांना मिळाली. याबरोबरच श्री. धुला पाटील, श्री. दादा पाटील, श्री.आबा गवळी, श्री.शिंगवेकर या आणि अशा प्राध्यापकेतर सहकारी वृंदाची साथ या सर्व प्राचार्य आणि प्राध्यापकांना मिळाली.

आज आपण विद्यार्थी केंद्रित अध्यापन आणि कौशल्य निर्माण करणारे शिक्षण याचा विचार करत आहोत. प्राचार्य कुलकर्णी कौशल्याधारित शिक्षणाचा विचार, विसाव्या शतकाच्या प्रारंभीच करताना दिसतात. मा. सर डॉ. मो. स. गोसावी आणि मा. प्राचार्य श्री. बा. पंडित यांचा, अध्ययनाबरोबर कौशल्य आत्मसात करणे, सर्जनशीलतेला वृद्धिंगत करणे, संवेदनशीलता जपणे, समाजाच्या गरजांचा विचार करणे, इ. बाबींवर विशेष भर असे. उत्तमोत्तम प्राध्यापकांची मांदियाळी असणारे हे महाविद्यालय म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची कास धरणारे आहे. त्यामुळेच येथील विद्यार्थ्यांच्या मनात एच. पी. टी. केवळ एक महाविद्यालय राहत नाही तर, तो एक संस्कार होतो की जो मनात ठसतो, आणि अधिकाधिक पक्क होत जातो.

आमच्या एच. पी. टी. च्या गुरुजनांनी शिष्यपरंपराही तितकीच सक्षम निर्माण केली. प्रा. शं. ना. नवलगुंदकर, डॉ. गो. के. भट, श्री. डी. के. बेडेकर, श्री. वा. ल. कुलकर्णी, श्री. वि. वि. करमरकर, श्रीमती शांताबाई दाणी, श्री बापू नाडकर्णी, श्री कृ. बा. निकुंब, श्री वामनराव यार्दी, डॉ. आर. बी. पाटणकर, श्री. माधव मनोहर, श्री वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज, डॉ सुहास पळशीकर, डॉ. विवेक सावंत, डॉ. आशुतोष गोवारीकर, श्री. आनंद लिमये अशा आणि या व्यतिरिक्तही, कारण ही काही प्रातिनिधिक नावे आहेत, नैकविध क्षेत्रात आपले महनीय योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातील गुरुजनांनी घडविले आहे. आज शंभर वर्षांचा प्रवास पूर्ण करणाऱ्या या महाविद्यालयाला आपल्या सर्व विद्यार्थ्यांचा अभिमान आहे. नव्याने काही करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना यांसारख्या समाजासाठी झटणाऱ्या विद्यार्थ्यांचा आदर्श पण आहे.

'वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा,' असा जगाचा अनुभव असला तरी, आपल्या या महाविद्यालयाच्या आरंभीच्या काळापासूनच दातृत्वशाली व्यक्तींचे सहकार्य महाविद्यालयाला प्राप्त झाले आहे. श्री. हंसराज प्रागजी ठाकरसी, श्रीमती सुंदरबाई हंसराज प्रागजी ठाकरसी, श्री. डी. जी. ठाकरसी, क्षत्रिय परिवार, सपट परिवार आणि यांसारख्या दानशील व्यक्तींच्या भरघोस सहकार्यावर हे महाविद्यालय उभे राहिले आहे. आज या सर्व मान्यवरांची आठवण होते. त्यांच्या दातृत्वाला मनापासून वंदन!!!

गुरुचे स्थान आपल्या सर्वांच्या आयुष्यात नितांत महत्त्वाचे आहे, याबाबत दुमत असणारच नाही. गुरु आपल्याला घडवत असतात, वेळप्रसंगी रागवत असतात; पण हे सर्व आपल्या मायेपोटी असते. लहानपणापासून आपल्या या गुरुपरंपरेला खर तर सुरुवात होते. अध्यात्म जीवनात

अनन्यसाधारण महत्त्व असणाऱ्या गुरुचे आपल्या भौतिक व्यवहारातले रूप म्हणजे आपले अध्यापक, शिक्षक हे होत. अनेक विषय शिकवणारे शिक्षक आपल्या शाळेत, महाविद्यालयाच्या काळात आपण पहात असतो. यातील काही असे असतात की, जे आपल्या मनात कायमचं एक स्थान निर्माण करतात.

अशा अध्यापकांचे, शिक्षकांचे बोलणे, त्यांचे विचार, त्यांची कृती, त्यांचे आचार हे सर्व त्यांच्या देहा पलिकडे आपल्या मनांत ठसत जात असते. त्यांच्या सहवासात जसे आपण घडत जातो, तसे त्यांच्या सहवासात नसतांना अथवा त्यांच्यापासून दूर असतानाही आपण त्यांनी दिलेल्या आचार-विचार संस्कारांना कधीही विसरत नाही. इथे शिक्षकाचा 'गुरु' होतो. प्राध्यापकांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या या आपल्या महाविद्यालयातील गुरुजनांना, त्यांच्या विद्यार्थ्यांनी वाहिलेली ही शब्दकुसुमांजली म्हणजे 'गुरु अर्घ्य'. अर्घ्य देणे ही नुसती क्रिया नसते. त्यात असते कृतज्ञतेची भावना! आपल्या हितासाठी झटणाऱ्या व्यक्ती प्रती असणारा आदर. तिने आपल्यासाठी जे केले त्याची आपल्याला जाणीव आहे, हा भाव त्या दिलेल्या अर्घ्यातून व्यक्त होतो. त्यातून व्यक्त होते ती जबाबदारीची जाणीव! आपल्याला जसं आपल्या गुरुजनांनी घडविले, तसे आपण इतरांसाठी केले पाहिजे. 'A simple act of caring creates an endless ripple that comes back to you', असा संदेश आपण ग्रहण करत असल्याची अभिव्यक्ती म्हणजे हे अर्घ्य...

गुरु की महिमा हरि सों भारी, वेद पुरानन सब ही विचारी, ब्रह्मा व्यास रटत पल छिन मो।। इतका हा गुरु महिमा अगाध आणि असीम आहे. त्याविषयी जितके बोलावे तितुके कमीच!!! आमच्या सर्व गुरुजनांना वंदन करून, त्यांचे स्मरण करून, ह्या पुस्तकासाठी ज्यांनी ज्यांनी लेख पाठविले, त्या सर्व हंप्राठी यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ह्या 'गुरु अर्घ्य' साठी आम्हाला ज्यांनी प्रेरणा दिली त्या गोखले एज्युकेशन संस्थेच्या मा. सचिव डॉ. सौ. दीप्ती देशपांडे यांचे, आपल्या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी, कला विभागाचे मा. उपप्राचार्य प्रो. डॉ. पी एस देशपांडे, विज्ञान विभागाचे मा. उपप्राचार्य प्रो. डॉ. ए. बी. चौरसिया, आय क्यू ए सी मा. समन्वयक डॉ. पी. यु. रत्नपारखी, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक मेजर व्ही. डब्ल्यू. उगले या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. या पुस्तकासाठी आम्हाला प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. सी. एस. जावळे, ग्रंथपाल डॉ. आर. बी. बागूल, डॉ. अश्लेषा कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यासाठी त्यांचे मनःपूर्वक आभार. हे 'गुरु-अर्घ्य' आपल्यापर्यंत आकर्षक रूपामध्ये पोहोचविणाऱ्या 'शब्दमल्हार' प्रकाशन संस्थेचे श्री. स्वानंद बेदरकर, श्री. प्रशांत वाखरे, श्री. सुनील वेलजाळी या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. आपल्या गुरुजनांना ही शब्दरूपी भावांजली समर्पित करतांना आम्हा गुरु अर्घ्य संपादक मंडळींना मनापासून आनंद होत आहे. पुनश्च आपल्या गुरुजनांना सश्रद्ध अभिवादन करून, आमच्या लेखणीला विराम देतो.

# संपादक मंडळ


**प्राचार्य डॉ.व्ही.एन.सूर्यवंशी**

**उपप्राचार्य प्रो.डॉ.पी.एस.देशपांडे**

**उपप्राचार्य प्रो. डॉ.ए.बी.चौरासिया**

**आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. पी. यु. रत्नपारखी**
**कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक मेजर व्ही. डब्ल्यू. उगले**

**प्रा.सौ. एम. डी. निचाळे**
**डॉ. आर. बी. बागूल**
**प्रो. डॉ. ए. आर. वसावे**
**डॉ. टी. एल. जोशी**
**प्रा. पी. यु. अहिरे**
**डॉ. आर. जी. भोंग**
**डॉ. एम. ए. सानप**
**प्रा. सौ. एन. एम. पाटील**

**प्रा. व्ही. एन. चव्हाण**
**डॉ. एस. आर. मेनन**
**प्रा. सौ. एम. आर. मंगुरकर**
**प्रा. सौ. एच. एम. जोशी**
**डॉ. एल. व्ही. हुन्नरगीकर**
**डॉ. सी. एस. घुगे**
**प्रा. आर. बी. शेजवळ**
**डॉ. यु. जी. म्हस्के**

## निमंत्रित सदस्य

**डॉ.ए.ए.कुलकर्णी (एस.एम.आर.के., बी.के., ए.के. महिला महाविद्यालय)**
(एच.पी.टी. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी)



# ज्ञान निष्ठांची मांदियाळी

## हं. प्रा. ठा. कला आणि रा. य. क्ष. महाविद्यालयाचे आमचे नायक- आमचे प्राचार्य

हं. प्रा. ठा. कला आणि रा. य. क्ष. विज्ञान महाविद्यालयाची धुरा आमच्या आतापावेतोच्या प्राचार्यांनी खूप समर्थपणे उचलली आहे. ह्या शंभर वर्षाच्या कालावधीत, आमच्या या प्राचार्यांनी महाविद्यालयाला यथायोग्य दिग्दर्शन केले आहे. आज या महाविद्यालयाचा एवढा मोठा विस्तार म्हणजे त्यांच्या नेतृत्वाचे फलितच आहे. आज हे महाविद्यालय शतक पूर्ण करत आहे. शतमान उत्सवाच्या निमित्ताने, त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा आम्हाला निश्चितच प्रेरक ठरणार आहे. आमच्या या नायकांना आमची ही शब्द कुसुमांजली!!!


**प्राचार्य टी. ए. कुलकर्णी (१९२४–१९४७)**



स्वातंत्र्यपूर्व काळात आधुनिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींहून वेगळी वाट प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी निवडली. १९१८ साली मुंबईत गोखले एज्युकेशन सोसायटीची स्थापना केल्यावर, त्यांनी आधुनिक शिक्षणाची गंगा या गोदावरीच्या तीरी आणली. हं. प्रा. ठा. कला आणि रा.य.क्ष. विज्ञान महाविद्यालय उपाख्य एच.पी.टी. आर्टस् अँड आर्. वाय. के. सायन्स महाविद्यालय, नावाने उत्तर महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय प्राचार्य कुलकर्णींनी सुरू केले. ते आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. चंदुबाई कुलकर्णी यांनी नासिकच्या शैक्षणिक–सांस्कृतिक जीवनाला एक वेगळी कलाटणी दिली. श्रमदानाबरोबर शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणातून कौशल्य निर्माण हा विचार त्यांच्या प्रशासन व्यवस्थेचे विशेष म्हणावयास हवा. दृढनिश्चयी, करारी, बुद्धिवादी, प्रयोगशील, कर्तव्यदक्ष, शिस्तपालक तरीही प्रेमळ अशा प्राचार्य टी. ए. कुलकर्णींचे आचार्य ऋण हे उत्तर महाराष्ट्रीय कधीही विसरू शकणार नाहीत. त्यांच्या आणि डॉ. चंदुबाई यांच्या तपस्येतून, परिश्रमातून हा महाविद्यालयाचा वेलू गगनाला स्पर्शिता झाला आहे. प्राचार्य कुलकर्णी यांनी

जी नररत्ने शोधून काढली आणि त्यांच्या हाती ह्या संस्थेचा आणि महाविद्यालयाचा कार्यभार सोपवला, त्यांनी प्राचार्य कुलकर्णींच्या प्रमाणेच ह्या महाविद्यालयाची जोपासना केली आणि त्याचा विस्तार केला.

**प्राचार्य बी. एल. पाटणकर (१९४७–१९५४)**




स्वभावाने सरळ आणि अत्यंत साधे असणारे प्राचार्य पाटणकर एकांतप्रिय असले तरी प्रशासकीय कार्यात रस घेत असत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात राहून, मन लावून अभ्यास करावा, असे त्यांना वाटत असे. शिस्तप्रिय असले तरी विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय होते. महाविद्यालयात विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. प्राचार्य पाटणकरांना 'उत्तर महाराष्ट्राचे महर्षी कर्वे' असे म्हंटले जाते. त्यांनी सुरू केलेले एस. एन. डी. टी. चे वर्ग म्हणजे नासिकमधील महिलांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. आपला संसार सांभाळत, नोकरी करत, शिक्षणाची स्वप्ने पाहणाऱ्या महिलांसाठी, प्राचार्य पाटणकरांचे हे वर्ग म्हणजे जणू काही संजीवनी ठरले. अनेक प्राध्यापकांना त्यांनी विना वेतन ह्या वर्गांमध्ये शिकविण्यास प्रेरणा दिली. आपल्या निवृत्ती पश्चात् ही त्यांनी हे कार्य निष्ठेने सुरू ठेवले होते. त्यांनी हे वर्ग सुरळीत चालू रहावेत, यासाठी पन्नास हजार रुपयांची देणगी या वर्गांसाठी दिली. अशा दातृत्वशील प्राचार्यांची परंपरा या महाविद्यालयास लाभली आहे, हे या महाविद्यालयाचे सद्भाग्यच!!!

**प्राचार्य के. व्ही. गजेंद्रगडकर (१९५४–१९५६)**



गुरुदेव रानडेंचे अनुयायी असणारे तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक प्राचार्य गजेंद्रगडकर म्हणजे मूर्ती लहान; पण कीर्ती महान! या उक्तीला साजेसे असे व्यक्तिमत्त्व असणारे होते. उत्कृष्ट अध्यापन कौशल्य, सौम्य स्वभाव, धार्मिक वृत्ती, सतत वाचनमग्न अशा प्राचार्य गजेंद्रगडकरांच्या दोन वर्षांच्या प्राचार्य पदाच्या कालावधीत महानगरपालिकेकडून दिव्यांची सोय महाविद्यालयाच्या परिसरात झाली. त्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले.

**प्राचार्य एस. जी. पुराणिक (१९५६–१९६१)**



डॉ. धनंजय गाडगीळ यांचे शिष्य असणारे प्राचार्य पुराणिक अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून १९३२ साली एच. पी. टी. महाविद्यालयात रुजू झाले. नंतर ते विभागप्रमुख होते. असीम वक्तृत्व, प्रभावी व्यक्तित्व, अध्यापन कौशल्य, उत्तम व्यवस्थापन या आपल्या अंगभूत असणाऱ्या कौशल्यांनी त्यांनी आपल्या अर्थशास्त्राच्या विभागाच्या विस्ताराबरोबरच महाविद्यालयाच्या विकासामध्ये पण भरीव योगदान दिले. त्यांच्या प्राचार्यपदाच्या कालावधीत पुष्कळ सरकारी अर्थसहाय्य संस्थेला प्राप्त झाले आणि संस्थेच्या कार्यचा व्याप वाढला. आपले स्नेही श्री.अण्णासाहेब कुलकर्णी यांच्या सहाय्याने

श्री.जगन्नाथशेठ क्षत्रिय यांच्याशी संपर्क करून, त्यांनी देणगी मिळविली आणि बी. वाय. के. महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. हे फक्त वाणिज्य शाखेचे महाविद्यालय असावे, असा दूरदर्शी विचार करून, स्वतंत्र महाविद्यालयासाठीची व्यवस्था प्राचार्य पुराणिक यांच्या कालावधीत झाली. ह्या महाविद्यालयात सर डॉ. मो. स. गोसावी प्राचार्यपदी विराजमान झाले, त्यानंतर ह्या महाविद्यालयाचा प्रगतीचा आलेख सदोदित उंचावत गेला आणि आजही उंचावतो आहे.

प्राचार्य पुराणिक यांनी परिश्रमपूर्वक 'नाशिक जिल्हा सहकारी बँक' स्थापन करण्यासाठी ब्लू प्रिंट तयार करून, संबंधितांना अचूक मार्गदर्शन केले. तिचा प्रारंभीचा कारभारही त्यांनी सक्षमपणे चालविला. आज नासिक जिल्ह्यात ह्या बँकेचा जो विस्तार झालेला दिसतो, त्यामागे प्राचार्य पुराणिक यांची दूरदर्शिता आणि मार्गदर्शन आहे. अध्यापन क्षेत्र आणि सामाजिक जीवन यांत एक सुरेख समतोल प्राचार्य पुराणिक यांनी साधलेला आहे.

**प्राचार्य एन. एम. आचार्य (१९६१–१९६८)**



सदा प्रसन्न मुद्रा, आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची वृत्ती, उमदे व्यक्तिमत्त्व असणारे प्राचार्य आचार्य इंग्रजी विभागाचे प्रमुख होते. इंग्रजीवर प्रभुत्व, अमोघ वक्तृत्व, कुशल अध्यापक प्राचार्य आचार्य विदेश भ्रमण करत असल्याने, विविध अनुभवांची शिदोरी असणारे होते. आपल्या सहकार्यांवर विश्वास ठेऊन, ते प्राचार्यपदाची धुरा सांभाळत होते. विद्यार्थ्यांशी वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध आणि त्यांच्या कुटुंबीयांशी देखील वैयक्तिक संपर्क प्राचार्य आचार्य यांचा असे. त्यांच्या पत्नी सौ. हेमलता आचार्य या देखील महाविद्यालयातील अध्यापन कार्यात मोलाचे योगदान देत असत. प्राचार्य आचार्य हे पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून तीन वर्षे कार्यरत होते. गोखले एज्युकेशन संस्थेचे ते उपाध्यक्ष होते.

**प्राचार्य व्ही. जी. ओक (१९६८–१९७२)**




पदवी स्तरावर मुंबई विद्यापीठाचा 'भाऊ दाजी प्राइज्' हा मानाचा पुरस्कार प्राप्त झालेले, अभ्यासू, असे प्राचार्य ओक १९३७ साली संस्कृत विषयाचे अध्यापक म्हणून महाविद्यालयात रुजू झाले. आपल्या अध्ययनाच्या व्यासंगा बरोबरच त्यांनी व्ही. एम. सी. ए. , मद्रास येथून शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला होता. प्रत्येक गोष्टीवर बारकाईने विचार, सखोल चिंतन करण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळे प्रत्येक कृती ते आत्मविश्वासाने करत असत. सर्वांना सोबत घेऊन, प्रशासन चालवत असतांनाच अत्यंत शिस्तबद्ध आणि काटेकोर असे त्यांचे काम असे. आपल्या प्रशासनाचे कार्य सांभाळून, त्यांनी डॉ कूर्तकोटी शंकराचार्य यांच्या सान्निध्यात वेदांतशास्त्राचे अध्ययन केले. वेदांतशास्त्रावर 'अद्वैत सिद्धांत' हा सुंदर ग्रंथ रचला. अनेक ग्रंथ लिहून, त्यांनी ते प्रकाशित केले.

त्यांच्या प्राचार्यपदाच्या कारकिर्दीत रसायनशास्त्र आणि हिंदी भाषा विषयाचे पदव्युत्तर

शिक्षण महाविद्यालयात सुरू झाले. जीवशास्त्र, प्राणीशास्त्र आणि भूगोल या विषयांचे पदवीचे शिक्षणही ह्यांच्याच प्राचार्यपदाच्या काळात सुरू झाले. त्यांच्या कार्यकालात त्यांनी पुष्कळ योजनांना चालना दिली. यातील काही योजनांची परिपूर्ती नंतरच्या प्राचार्यांच्या कार्यकालात झालेली दिसते. निवृत्तीनंतरही जशी संस्कृत साहित्यविषयक अभ्यासकांची जिज्ञासा ते शमवीत तसेच प्रशासकीय अडचणींच्या वेळीही नेहमी मार्गदर्शन करत. अत्यंत निस्पृहवृत्तीच्या आणि कोणत्याही कामाचे श्रेय नाकारणाऱ्या प्राचार्य ओक यांचे योगदान यामुळे अधोरेखित झाल्यावाचून राहत नाही.

**प्राचार्य एस. पी. सोहनी (एप्रिल १९७२ ते डिसेंबर १९७२)**




इतिहास आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक, राज्यशास्त्र विषयाचे व्यासंगी असे प्राचार्य सोहनी विद्यार्थीप्रिय, विषयाचे गहन ज्ञानी, चिंतनशील, सामाजिक भान असणारे होते. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी घडविले, अभ्यासाची दिशा दिली आणि वेळ प्रसंगी त्यांना अर्थसहाय्यही त्यांनी केले. प्रकृतीने नाजूक असले तरी प्रखर ध्येयवाद, सेवाभावी वृत्ती यांमुळे असीम असे मानसिक धैर्य त्यांच्याकडे होते. पुरोगामी विचार, स्पष्टवक्तेपणा, खेळाची आवड हे त्यांचे विशेष होते. जिमखाना विभाग त्यांनी अत्यंत यशस्वीपणे सांभाळला. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना अध्ययनाबरोबरच खेळासाठीही प्रेरित केले. विद्यार्थ्यांना विभिन्न खेळात प्राविण्य संपादन करण्यासाठी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. नासिकमधील अनेक क्रीडा संस्था व सामाजिक कार्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग असे. प्राचार्य सोहनी यांच्या स्मृती चिरंतन रहाव्यात म्हणून, त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्य सोहनी स्मारक समिती स्थापून, सोहनी कक्ष या महाविद्यालयामध्ये तयार केला. आपल्या गुरुं प्रती त्यांची निष्ठा, प्रेम आणि संस्कार त्यांनी या महाविद्यालयाला निर्माण करून दिलेल्या कक्षातून कायम स्मरत राहतील, यात शंका नाही.

**प्राचार्य पी. एम. जोशी (१९७३–१९७५)**



शांत, आनंदी वृत्तीचे प्राचार्य जोशी, प्राचार्य ओक यांच्या प्रमाणे याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. विद्यार्थ्यांशी अत्यंत स्नेहमय संबंध असणाऱ्या प्राचार्य जोशींचे अध्यापन कौशल्यही चांगले होते. त्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयात अत्यंत मोकळे वातावरण तयार करून, प्राध्यापकेतर वृंदालाही आपलेसे केले होते. प्राचार्य जोशी यांचे हृदयविकाराने अकस्मात् निधन झाले. त्यामुळे महाविद्यालय त्यांच्या कार्यकुशल मार्गदर्शनाचा अनुभव घेऊ शकले नाही, असेच म्हणावे लागेल.

**प्राचार्य डॉ. बी. डी. चौरे (१९७५–१९९०)**



अत्यंत तडफदार, परिश्रमी, कल्पनाशील, नियोजनबद्ध प्रगतीचा आलेख सतत विस्तारत कसा जाईल, यासाठी

प्रयत्न करणारे, त्यावेळीच्या महाविद्यालयाच्या इतिहासातील सर्वांत तरूण प्राचार्य म्हणून डॉ. चौरे यांचा उल्लेख करावा लागेल. भौतिकशास्त्र पदव्युत्तर वर्गांकरिता नवीन इमारतीचे काम यांच्या काळात झाले. भाऊसाहेब वर्तक वाचनालयाचा क्षेत्र विस्तार आपल्या प्राचार्यपदाच्या कारकिर्दीत डॉ. चौरे यांनी केला.


सामाजिक बांधिलकी या नात्याने, यांच्या काळात विद्यार्थ्यांनी मद्यपान विरोधी मंच स्थापन केला आणि त्याद्वारा जनजागृती केली. प्रौढ शिक्षण या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन, एकूण दहा प्रौढ शिक्षण शिबीरे चालविली गेली. आश्रमशाळा विभागांत विद्यार्थ्यांना शास्त्र, गणित इ. अवघड विषयांचे मार्गदर्शन, प्रयोगांच्या माध्यमातून शिक्षण असा विचार करून, फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून कवि कुसुमाग्रजांच्या तोरणगड, देवरगाव या ठिकाणी भेटी देऊन, या उपक्रमाचा आरंभ केला गेला. अध्यापना सह सामाजिक बांधिलकीच्या अनुषंगाने भरीव कामगिरी या कालावधीत झाली.

**प्राचार्य एस. डी. कुलकर्णी (१९९१–१९९३)**




प्राचार्य कुलकर्णी यांच्या कालावधीत महाविद्यालयाला असाधारण परिस्थितीला सामोरे जावे लागले; परंतु त्या कठीण परिस्थितीतही महाविद्यालयातील अध्ययन–अध्यापन आणि इतर कार्यालयीन कामकाज सुरळीत चालू ठेवण्याचे श्रेय प्राचार्य कुलकर्णी यांच्या खंबीर नेतृत्वाला द्यावे लागेल. राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम, एन. सी. सी चे प्रशिक्षण वर्ग, क्रीडा विभागाचे उपक्रम आणि विविध स्पर्धातील सहभाग यांच्या बरोबरच इतर वक्तृत्वादि विविध स्पर्धांतून विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग आणि मिळविलेली पारितोषिके, यातून ही बाब स्पष्ट होते.

**प्राचार्य डॉ. बी. डी. चौरे (१९९४–१९९५)**



कम्युनिकेटिव्ह इंग्लिश आणि ट्रॅव्हल अँड टुरिझम हे व्यावसायिक अभ्यासक्रम या काळात सुरू झाले. या काळातही महाविद्यालयाने सर्व स्तरांवर आपला समतोल विकास साधत वाटचाल केली आहे. पुढे डॉ. चौरे ह्यांची पुणे विद्यापीठाच्या प्रकुलगुरु पदावर नियुक्ती झाली.

**प्राचार्य डॉ. यु. के. भांबुरे (१९९५–१९९७)**




हे विजाणूशास्त्र (Electronics) विषयाचे प्राध्यापक होते. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची कारकिर्द ही अत्यंत उज्ज्वल अशी आहे. त्यांच्या तज्ज्ञतेचा आणि कार्यकुशलतेचा लाभ महाविद्यालयास निश्चित झालेला आहे. शिक्षण–प्रशिक्षण कार्यक्रमाबरोबरच बायोगॅस प्रकल्प, मधमाश्यांच्या संगोपनाचा प्रकल्प, आरोग्य विषयक शिबिरे, प्रबोधपर व्याख्यानांचे आयोजन अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार त्यांच्या कार्यकालात झालेला आहे.

**प्राचार्य डॉ. बी. व्ही. गिरधारी (१९९७–२००४)**



मराठी विषयाचे प्राध्यापक असणाऱ्या प्राचार्य गिरधारी यांनी आपल्या कारकिर्दीत नियमित अभ्यासक्रमाबरोबरच संशोधनासही चालना दिली. स्पर्धा परीक्षा, राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम, चर्चासत्रे, कार्यशाळा यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर त्यांचा नेहमी भर असे. नॅक या राष्ट्रीय मूल्पमापन परिषदेच्या मूल्यांकनासाठी प्रथमतः महाविद्यालय प्राचार्य गिरधारी यांच्या मार्गदर्शनाखाली सज्ज झाले. महाभारतावर आधारित त्यांचे संशोधन प्रामुख्याने असल्याने, संस्कृत भाषेच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. संस्कृत अभ्यास मंडळाद्वारा त्यांनी चांगले-चांगले अभ्यागत प्राध्यापक संस्कृत विभागात आमंत्रित करून, विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळवून दिला. महाविद्यालयाने त्यांच्या कारकिर्दीत आपली यशाची पताका उंचावत नेली.

**प्राचार्य डॉ. एस.आर. गुडसुरकर (२००४–२००५)**



प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख असणाऱ्या डॉ. एस. आर. गुडसुरकरांमुळे महाविद्यालयातील बायोटेक्नॉलॉजी(जैवतंत्रज्ञान) या विभागचा विस्तार झाला. मासकम्युनिकेशन या विषयामध्ये पदवीपर्यंतची व्यवस्था त्यांच्या काळामध्ये झाली. जीवशास्त्र विभागामध्ये बी.एस्सी. (अप्लाईड) असा नवीन अभ्यासक्रम सुरू केला गेला. विद्यार्थ्यांना कारखान्यातून ट्रेनिंग यांच्या काळामध्ये मिळाले. आणि १०० टक्के रोजगाराचे आश्वासनदेखील मिळाले. प्राणीशास्त्र विभागात एम.एस्सी. जेनेटिक्स हा अभ्यासक्रम यांच्या कारकिर्दीमध्ये सुरू झाला. एम.सी.ए. हा दोन वर्षांचा अभ्यासक्रमही सुरू झाला. यांच्या एक वर्षाच्या प्राचार्यपदाच्या कालावधीत अनेक कृतीसत्रे, सेमिनार आयोजित करण्यात आले अनेक कार्यक्रम विविध शाखांच्या प्राध्यापकांनी राबविले.

**प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी (२००५–२०२२)**



भौतिकशास्त्र आणि नंतर विजाणूशास्त्राचे प्राध्यापक असणारे प्राचार्य सूर्यवंशी ह्याच महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. एच्. पी. टी. महाविद्यालयात प्राचार्यपदी येण्यापूर्वी ते एच्. ए. एल्. महाविद्यालय, बोर्डी महाविद्यालय इथेही प्राचार्य म्हणून कार्यरत होते. अभ्यासू व्यक्तित्व, वाचनव्यासंगी असे प्राचार्य सूर्यवंशी सर्वांशी अगदी स्नेहपूर्ण व्यवहार करतात. प्रत्येकाला प्रोत्साहन देतात, त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांच्या कार्याला चालना दिली. संस्कृत सारख्या अगदी छोट्या विभागाचा कार्यक्रम असो अथवा रसायनशास्त्रा सारख्या विभागाचा कार्यक्रम असो, ते सर्व कार्यक्रमांमध्ये स्वतः जाणीवपूर्ण लक्ष देत आणि आजही देत आहेत. त्यांच्या कारकिर्दीत

महाविद्यालयाला नॅक या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेची 'अ' श्रेणी दोनदा प्राप्त झाली. त्यांच्या या वर्षांच्या कार्यकालात वैश्विक शांति परिषद् आणि बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदे सारख्या मोठ्या परिषदांचे आयोजन त्यांनी केले. विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन देणारे, त्यांना शिस्त लावणारे प्राचार्य सूर्यवंशी हे विद्यार्थीप्रिय प्राचार्य आहेत. प्रबोधनपर व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्रे, प्रदर्शने, सायन्स क्लब मार्फत विविध उपक्रमांचे आयोजन, सांस्कृतिक मंडळा तर्फे विद्यार्थ्यांसाठी नाट्य कार्यशाळा, कलारंग आणि स्मरणरंगासारखे दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम त्यांनी नाशिककरांसाठी खुले केले. अध्यापन, संशोधन आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या या काळातील कारकिर्दीत झाला.

**प्राचार्य प्रो. डॉ. एम. डी. देशपांडे (२०२२– मे २०२४)**



महाविद्यालयाच्या शंभर वर्षांच्या कालावधीतील पहिली महिला प्राचार्य होण्याचा मान प्राचार्य देशपांडे यांना प्राप्त झाला आहे. भौतिकशास्त्राचा अत्यंत गभीर व्यासंग असणाऱ्या, संशोधनात सतत रत असणाऱ्या प्राचार्य देशपांडे यांना संशोधनासाठी मोठे आर्थिक सहाय्य नामवंत संस्थांकडून प्राप्त झालेले आहे. संशोधनातील शिस्तबद्ध विचार त्यांच्या प्रशासकीय कार्यातही दिसून येतात. अध्ययन–अध्यापन या बरोबरच त्यांनी संशोधनावरही भर दिला. विविध विभागांना महाविद्यालयाच्या शंभरीच्या निमित्ताने कार्यप्रवण केले. त्यांना विविध उपक्रम करावयास प्रोत्साहन दिले. आपले कार्यक्रम करताना, त्याचे आर्थिक नियोजन करण्यावर त्यांनी भर दिला. चर्चासत्रे, कार्यशाळा, स्पर्धा यांचे आयोजन करत असतानाच महाराष्ट्र शिक्षण परिषद् आणि सर डॉ एम. एस. गोसावी फाउंडेशन यांच्यासह, महाराष्ट्र शैक्षणिक आणि व्यवस्थापन परिषदेचे आयोजन त्यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयाने यशस्वीपणे केले. विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलन आणि डेज् यांबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना, महाविद्यालयाची शिस्त राखून, मोकळीक दिली. सायन्स फोरममार्फत सोशलसायन्स सारखे मानव्य आणि सामाजिक विद्या शाखा आणि विज्ञान शाखा यांतील रेषा धूसर करणारे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे उपक्रम त्यांच्या प्राचार्यपदाच्या कालावधीत त्यांनी राबविले. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत, त्यांना योग्य ते मार्गदर्शन त्या सतत करत असत आणि निवृत्तीनंतरही करत आहेत. आपल्या दीड वर्षाच्या अल्प अशा कारकिर्दीत त्यांनी पुष्कळ भरीव कार्य केले आहे आणि महाविद्यालयाचा प्रगतीचा आलेख विस्तारत नेला आहे.

**प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी (मे २०२४ पासून पुढे–)**

मे २०२४ पासून महाविद्यालयाच्या शतकपूर्तीच्या समयी प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी हे, बी.वाय.के. महाविद्यालयातून पुनः एच.पी.टी. महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्य पाहू लागले आहेत. नॅक या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेच्या मूल्यांकनाची महाविद्यालयाची तयारी प्राचार्य सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली केली जात आहे. ह्या शतक महोत्सवाच्या निमित्ताने विविध योजना त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत.




**आज शतक गाठणारे हं. प्रा. ठा. कला आणि रा. य. क्ष. विज्ञान महाविद्यालय....**
**असेच पुढेही नेहमी ज्ञानसेवारती राहो...**

# अनुक्रम


टी. ए. / वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज १७

टी. ए. कुलकर्णी गीत २१

प्राचार्य आचार्य / प्रा. हर्षवर्धन कडेपूरकर २२

तेथे कर माझे जुळती गुरुवर्य - प्रा. वसंत कानेटकर / प्रा. उल्हास रत्नपारखी २७

शब्दसुमनांजली : प्रा. वसंत कानेटकर/ सौ. उषा जयंत गावडे ३१

व्यासंगी डॉ. गो. वि. देवस्थळी / डॉ. ग. उ. थिटे ३३

प्रा. म. वि. गोविलकर : मूर्तिमंत सात्विकता / सौ. रजनी साकुरीकर ३५

प्रा. वि. बा. आंबेकर / श्रीमती मुक्ता टिळक ३७

कर्तव्यपरायण, निःस्पृह प्राध्यापक गायधनी / सौ. वसुधा भास्कर गिरधारी ४२

डॉ. चंद्रकांत वर्तक / डॉ. वृंदा भार्गवे ४४

प्रा. भा. शं. जोशी सर : एक जिंदादिल व्यक्तित्व / डॉ. अशोक धुलधुले ४७

डॉ. एन. बी. कुलकर्णी / प्रा.शिशीर सिंदेकर ५२

Last Victorian एम. जी. उपाख्य मु. गो. देशपांडे / श्री. प्रमोद तेंब्रे ५५

सात्त्विकतेची प्रतिमा : डॉ. सौ. अरुणा रारावीकर / श्री. पद्माकर देशपांडे ५९

वात्सल्यमूर्ती सहस्रबुद्धे मॅडम / प्रा. डॉ. अश्विनी कुलकर्णी - धर्माधिकारी ६३

कविताच जगणे, कवितारुपीच उरणे! प्रोफेसर व्ही. एच. क्षीरसागर / डॉ. अंजली पटवर्धन कुलकर्णी ६५

प्रा. त्र्यंबक शंकर बोराटे : तत्त्वनिष्ठ शिक्षक / डॉ. प्रणव रत्नपारखी ६९
स्थितधी आचार्यः कुलकर्णी मनोहर महोदयः / हुन्नरगीकर लीना ७४
मार्तंड जे तापहीनः डॉ. मोहन गोखले सर / डॉ. गिरीश पिंपळे ७७
Prof. Madhav Kulkarni / Mrs. Rajitha Nair ८०
सर्वंशोभनीयं सुरूपं नाम : डॉ. निरूपमा कुलकर्णी / कु. समीक्षा काळे ८४
विद्यार्थी प्रिय प्राध्यापक, गुरुवर्य : ललित एम. समनोत्रा / प्रो. डॉ. अशोक वसावे ८६
उदार मनस्क : प्राचार्य सोहनी सर / श्री. श्रीराम शंकरराव बिनीवाले ९१
डॉ. सरल धारणकर : चालता बोलता इतिहास / श्री. शरद मोरे ९२
सा एका देवलोकस्य प्रेषिता अप्सरा! डॉ. गोगटे अनिता महोदया / डॉ. अश्लेषा कुलकर्णी ९४
आनंदी जीवनाची गुरुकिल्ली देणारे : प्रा. तरसे सर / श्री. दिनेश चंद्रकांत भावसार ९६
हं प्रा ठा : ज्ञानाची 'तदंगभूत' शाळा / प्रा. अनंत येवलेकर ९८
पसायदान १०२



# टी. ए.

## वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज



हं. प्रा. ठा. मधील कॉलेज जीवनाची आठवण करू लागताच, प्रकाशाच्या प्रखर झोतासारखे मनात प्रथमत: शिरते ते प्राचार्य टी. ए. कुलकर्णींचे त्या परिसरातील सर्वव्यापी अस्तित्व. प्राचार्य हा मराठी शब्द तेव्हा रूढ झालेला नव्हता. प्रिन्सिपॉलला प्रिन्सिपॉलच म्हणत. कुलकर्णींच्या नावाशी प्रिन्सिपॉल ही उपाधी घट्ट चिकटलेली होती; पण कुलकर्णी केवळ प्रिन्सिपॉलच नव्हते. ते या कॉलेजचे संस्थापक आणि प्रमुख कारभारीही होते. तेव्हा विद्यापीठ एकच होते मुंबईचे आणि कॉलेजे होती तीही फक्त मुंबई-पुण्यामध्ये. डेक्कन, फर्ग्युसन, एल्फिन्स्टन इत्यादी नावे ताजमहाल - कुतुबमिनारासारखी आकर्षक; परंतु सर्वसाधारणांना आपल्या कक्षेबाहेरची वाटायची. नाशिकसारख्या तेव्हा तुलनेने लहान आणि मागास असलेल्या गावामध्ये कॉलेज काढणे हे निखालस धाडसच होते. पुन: तेही गाववस्तीपासून दोनअडीच मैल दूर असलेल्या एका उजाड माळीवरती. शरणपूरच्या पलीकडे असा एक मोठा थोरला माळा पसरलेला आहे हे देखील शहरातील बहुसंख्य नागरिकांना माहीत नव्हते. झनाना मिशनचे हॉस्पिटल ही त्या दिशेकडील शहराची सरहद्द होती. हे धाडस प्रिं. कुलकर्णींनी केले आणि आत्यंतिक निष्ठेने आणि एकरूप भावनेने माळावर लावलेल्या या अंकुराचे संगोपन केले. डोक्यावर किरमिजी रंगाची पगडी, पांढरे शुभ्र धोतर आणि लांब काळा कोट अशा पोषाखातील त्यांची धिप्पाड मूर्ती कॉलेजच्या अवतीभवती सकाळ दुपारच्या उन्हात अनेकदा एकाकी हिंडताना दिसत असे. आता असे वाटते की, कॉलेजच्या भरभराटीची, तो ओसाड परिसर इमारतींनी आणि विद्यार्थ्यांनी गजबजून जाण्याची महत्त्वाकांक्षी स्वप्ने तेव्हाही त्यांच्या त्या लालसर डोळ्यांना दिसत असली पाहिजेत.

टी. ए. म्हणजे कॉलेज आणि कॉलेज म्हणजे टी. ए. असे समीकरण तेव्हा नाशिककरांच्या मनात रूढ झाले होते. भिक्षुकी संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या गावाला टी. एं. सारखा कर्ता सुधारक आणि त्याची महिला डॉक्टर म्हणून प्रॅक्टीस करणारी पत्नी (बहुधा नाशकातील पहिलीच महिला डॉक्टर) यांच्यासंबंधी एकदम आत्मीयता वाटणे कठीणच होते. आख्यायिका उत्पन्न करण्यात चतुर असलेल्या लोकांनी अनेक आख्यायिका या नवागत दांपत्यासंबंधी निर्माणही केल्या; पण टी. ए. कुलकर्णींना अशा गोष्टींचे अथवा त्यातून प्रकट होणाऱ्या प्रतिकाराचे अजिबात सोयरसुतक नव्हते. 'एकच तारा समोर होता,' अशी त्यांची वृत्ती होती. संस्थेच्या परिपालनावर त्यांचे लक्ष इतके एकाग्र झाले होते की, बाकीच्या गोष्टी त्यांच्या मनापर्यंत पोचतच नव्हत्या. उलट पक्षी ज्या शहरात आपल्याला राहायचे आणि काम करायचे आहे, त्या शहरातील लोकमत आपण शाब्दिक समर्थनाने नव्हे तर प्रत्यक्ष कार्यानेच जिंकले पाहिजे हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच दूर राहूनही ते कधी दूरस्थ राहिले नाहीत.

गावातील तरुण प्रागतिक मताच्या कार्यकर्त्यांशी त्यांनी स्नेहसंबंध प्रस्थापित केले आणि संस्थेला अनुकूल, असे वातावरण निर्माण करण्यात यश मिळविले. त्यासाठी प्रा. भा. ल. पाटणकरांचेही त्यांना फार मोठे सहाय्य झाले. या दोघांनीही शहरातील सांस्कृतिक व सामाजिक जीवनात महत्त्वाचा भाग घेतला. एवढेच नव्हे तर त्याला प्रेरणाही दिली. टी. ए. कुलकर्णी हे मुंबईत नावाजलेले सामाजिक कार्यकर्ते होते. गोखले, ना. म. जोशी यांसारख्या उदारमतवादी नेत्यांच्या तत्त्वज्ञानाचा दृढ संस्कार त्यांच्या मनावर झालेला होता. त्यागाचे व्रत स्वीकारून, सेवाभावी वृत्तीने लोकजागृतीचे काम कोणत्याही मोहाला शरण न जाता करीत राहिले पाहिजे हे त्यांचे ब्रीद होते. याच उद्दिष्टाने गोखले एज्युकेशन सोसायटीचा प्रपंच काही समानशील सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी उभा केला होता आणि दुर्लक्षित, मागासलेल्या भागात शिक्षणदानाचे काम हाती घेतले होते. नाशिकमध्ये कॉलेज काढण्यामागेही हेच ध्येय होते. आधुनिक ज्ञानविज्ञानाचे कालवे दूरवरच्या विभागात नेऊन तेथील लोकांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे टी. ए. कुलकर्णी नाशिकमध्ये आले ते केवळ एक कॉलेज घेऊन आले असे नाही. सामाजिक प्रगतीचे एक नवीन पर्व त्यांनी आपल्याबरोबर नाशिकमध्ये किंबहुना महाराष्ट्राच्या या भागामध्ये प्रथमत:च आणले होते.

टी. ए. कुलकर्णी स्वत: फार चांगल्यापैकी शिक्षक होते, असे म्हणता येणार नाही. शिक्षणदानाच्या व्यापक उद्दिष्टाशी ते जसे बांधलेले होते तसे शिक्षकाच्या कामाशी नव्हते. प्राध्यापक म्हणून त्यांच्याशी विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट होत असे ती फक्त पहिल्या वर्षाच्या वर्गांतच. पहिल्या वर्षाला ते इंग्रजीचे एक पुस्तक शिकवीत असत. प्राध्यापकाला आवश्यक असलेली एम. ए. ची पदवी त्यांनी घेतलेली नव्हती हे ही कदाचित कारण असेल; पण वरच्या वर्गांना ते कधी शिकवीत नसत हे मात्र खरे. प्राचार्यपदावर ते कुशल अध्यापकाच्या नव्हे, तर कर्तबगार कार्यकर्त्यांच्या अधिकाराने अधिष्ठित झालेले होते.

एका लहान गावातील उनाड माळरानावर हे रोपटे त्यांनी लावले होते. त्याचा सांभाळ

आणि त्याची निगराणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती. ती अन्य कोणाला घेता आली नसती आणि पेलताही आली नसती. त्या काळात कॉलेज चालविणे सोपे नव्हते. सरकारी प्रोत्साहन आणि सहाय्य आजच्यासारखे उपलब्ध नव्हते. सध्या शिक्षण संस्था चालविणे हे अर्थार्जनाचे आणि सत्तार्जनाचे साधन होऊ शकते. त्या काळात कार्यकर्त्यांना या कामासाठी स्वत:च्या त्यागावर, लोकांच्या सहकार्यावर आणि दातृत्वावर अवलंबून रहावे लागत असे. टी. एं. नी मुंबईतील ठाकरसी कुटुंबांकडून प्राथमिक देणगी आणली होती आणि त्यांचे नाव घेऊन कॉलेज सुरू केले होते; पण पहिली देणगी पुढील वाढत्या व्यवहाराला पुरेशी पडत नाही. बंदर सोडून गलबताने समुद्रात प्रवेश केल्यावर नाना प्रकारच्या संकटांशी मुकाबला करीत कप्तानाला ते पुढे न्यावे लागते. केव्हा तुफानी लाटा त्याचा मार्ग रोधीत असतात, तर केव्हा सहकाऱ्यांची नाराजीही. या सर्वांवर मात करून, प्रगती साधण्यासाठीही कप्तानाच्या ठिकाणी तंत्रज्ञानाचे गुण नव्हेत तर नेतृत्वाचे अदम्य सामर्थ्य असावे लागते. हे सामर्थ्य टी. एं. मध्ये होते; किंबहुना टी. ए. हे अशा सामर्थ्यांची साक्षात 'सावेष' मूर्ती होते. या सामर्थ्यांच्या पायावर संस्था प्राथमिक काळात उभी राहिली म्हणूनच तिचा आजचा भव्य विस्तार शक्य झाला.

टी. ए. कुलकर्णींची कुंडलीतील रास कोणती असेल ती असो. आम्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रभावशाली व्यक्तित्वातून सतत जाणवत असे ती त्यांची सिंह रास. शरीरयष्टी धिप्पाड असली, तरी तिची स्थूलता कपड्यांतून ओघळत नव्हती. चालणे संथ पण दमदार असे. चेहरा रूंद, नाक धारदार आणि नजर भेदक. या सर्वांना साजेल असा स्वर – आतल्या भरदारपणाने श्रोत्याला काबीज करणारा, पगडी, लांब कोट आणि धोतर हा पोशाख त्यांच्या देहयष्टीला कवचकुंडलांसारखा अंगभूत आणि वैशिष्ट्यदायक वाटायचा. असे जबरदस्त व्यक्तित्व एक साहित्य संघाचे डॉ. भालेराव सोडले, तर मी तरी दुसऱ्या कोणत्याही माणसाचे पाहिलेले नाही. उग्रता, अविचलता आणि वात्सल्य यांचे एक विलक्षण मिश्रण या व्यक्तिमत्त्वात झालेले होते आणि या गुणविशेषांचा प्रत्यय याच क्रमाने यायचा. म्हणजे प्रथम जाणवायची ती उग्रता आणि अखेरी जाणवायचे ते वात्सल्य; पण तेही जाणवल्यापासून राहात नसे. रिंगमास्तर सर्कसच्या रिंगणात इतस्तत: चाबूक आपटीत फिरतो त्याप्रमाणे टी. ए. कॉलेजच्या आवारात आणि इमारतीत फिरत असलेले दिसायचे. त्यांचा दरारा विद्यार्थ्यांना तर वाटेच; पण मला वाटते, प्राध्यापकांनाही तितकाच वाटत असे. एखाद्या वर्गात कोणा अश्राप प्राध्यापकांच्या तासाला गोंधळगलका चालू झाला, तर खिडकीतून टी. एं. ची लाल पगडी दूरवर दिसल्याबरोबर वर्ग एकदम शांततेमध्ये बुडून जाई. सर्व विद्यार्थ्यांच्या मानाखाली जात आणि तोंडे बंद होत. काही कारणानिमित्त कचेरीत जाण्याचा प्रसंग आला तर कचेरीचा जिना चढताना विद्यार्थ्यांच्या पायातील अर्धा जीव पायरीपायरीवर गळून पडत असे. बेशिस्त विद्यार्थ्यांला ते कधी बोलले, असे मला आठवत नाही. त्यांचे नजर रोखून पाहणेच पुरेसे असायचे. असे असूनही टी. ए. कधी विद्यार्थ्यांशी अरेरावीने वा अपमानास्पद पद्धतीने वागल्याचे मला आठवत नाही. बाह्यत: कितीही कठोरता असली, तरी मुलांशी बोलताना

स्वर सहसा वात्सल्याने भिजलेला असायचा आणि पुन: तो स्वर असा की, ज्यापासून वात्सल्यासारख्या सर्व नाजूक भावना खूप दूर आहेत असे वाटावे. वर्गात इंग्रजीचा तास घेताना अनेकदा गाडी एका रूळावरून दुसऱ्या रूळावर चटकन जात असे. पुस्तकातला पाठ बाजूला राहायचा आणि मुंबईच्या सामाजिक, राजकीय नेतृत्वातील कथा-दंतकथा कानांवर पडू लागत. नामदार गोखले, सर फिरोजशहा मेहेता, दिनशा वाच्छा इत्यादी ऐतिहासिक नावे हवेत तरंगू लागत; पण टी. ए. काय बोलतात यापेक्षा कसे बोलतात हे पाहण्याच विद्यार्थी रंगून गेलेले असत. सामान्यत: दूरवरच आणि काहीसा भीतीदायक वाटणारा हा माणूस इतक्या सहजतेने बोलतो आहे, चारचौघांसारखा गप्पा मारतो आहे, अधूनमधून हास्यविनोद करतो आहे आणि त्याचा तो ढाला, गंभीर आवाज वर्गाच्या भिंतीत पुराच्या पाण्यासारखा सर्वत्र भरून राहतो आहे, हा अनुभवच विशेष वाटायचा.

बी. ए. झाल्यानंतर मी नाशिक सोडून बरीच वर्षे बाहेरगावी राहात होतो. त्या काळात टी. ए. केव्हातरी निवृत्त झाल्याचे ऐकले. ते मुंबईला जाऊन राहिले होते. पुढे मी नाशिकला परतल्यावर दोनतीन वेळा त्यांची ओझरती भेट झाली. लोकहितवादी मंडळातर्फे तेव्हा निघालेल्या रात्रीच्या कॉलेज वर्गांचे उद्घाटन करण्यासाठी आम्ही त्यांना बोलावले होते. ते आनंदाने आले. नाशिकला इंजिनिअरिंग कॉलेज काढण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात होती. त्यासंबंधीचा बराच तपशील त्यांनी आम्हाला सांगितला. शेवटची भेट झाली ती मुंबईमध्ये आणि अगदी अनपेक्षितपणे १९६४ साली. टी. एं. चे वय तेव्हा ऐंशीच्या जवळपास किंवा पलीकडे गेलेले होते. तेव्हाही ते मुंबईत स्वस्थ बसलेले नव्हते. निवृत्ती हा शब्दच ते आयुष्यात कधी शिकले नव्हते. नवी नवी कार्ये अंगावर घेऊन, ते भारत सेवक समाजाच्या कचेरीत काम करीत बसलेले असायचे. मी त्या वर्षी गोवा येथील साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झालो होतो. संमेलनापूर्वी मुंबई साहित्य संघामध्ये सत्काराचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी मी संघात गेलो असता कोणी तरी टी. एं. चे पत्र मला आणून दिले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी समाजाच्या कार्यालयात यावे अशी आग्रहाची विनंती टी. एं. नी त्या पत्रात केली होती. विनंती कसली कपाळाची? ते पत्र वाचताना टी. एं. ची तीस वर्षांपूर्वीची धीरगंभीर मूर्ती माझ्या नजरेसमोर उभी राहिली होती आणि आतल्या करड्या आवाजात तिने मला फर्मावले होते; शिरवाडकर, यू मस्ट कम! मी अर्थात त्यांच्या आदेशाप्रमाणे गेलो. कार्यालयात तीसचाळीस माणसे जमली होती. सभेचा थाट सिद्ध झालेला होता. मी टी. एं. कडे पाहिले. सिंह म्हातारा झाला होता. चिरेबंदी किल्ला ढासळल्यासारखे वाटत होते; पण तरीही पूर्वीच्या सामर्थ्याच्या खुणा त्या अवशेषांतूनही जाणवत होत्या. स्वर कापत होता; पण त्यातील हुकूमत पूर्णत: मावळली नव्हती. ते खूप आनंदित होते. उल्हासाने ओथंबलेले होते. सभेचा कार्यक्रम नेहमीसारखा झाला. भाषणे झाली. टी. एं. नी अध्यक्षीय समारोप केला. मी त्यांच्या कॉलेजचा माजी विद्यार्थी हा मुख्य किंबहुना एकमेव कौतुकाचा मुद्दा होता. तसे पाहिले तर कॉलेजातील माझी कर्तबगारी कोणत्याही क्षेत्रामध्ये अशी नव्हती की, माझे नाव त्यांच्या लक्षात राहवे. व्यक्तिगत संबंधही कधी

फारसा आलेला नव्हता. विचार एकच होता; माझ्या कॉलेजचा एक माजी विद्यार्थी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला आहे. त्या एकाच विचाराने ते त्या दिवशी भारावून गेले होते. समारंभ संपल्यावर निरोप घेताना मी त्यांच्या पायावर डोके ठेऊन नमस्कार केला. उठून वरती त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यातून आसवांचे प्रवाह मुक्तपणे गळत होते. अगदी नि:संकोचपणाने. माझ्या छातीत प्रश्न, कुठला ऋणानुबंध हा? वडीलधारी माणसे असती तर त्यांनी अशी आसवे गाळली असती? इथे कसला संबंध? फक्त मी त्यांच्या कॉलेजचा त्यांच्याच कॉलेजचा विद्यार्थी होतो, एवढाच!


*(कै. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज हे हं. प्रा. ठा. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक, कवी असून महाविद्यालयाच्या हीरकमहोत्सवी वार्षिकात त्यांचा हा लेख प्रसिद्ध झाला आहे. )*

## टी. ए. कुलकर्णी गीत

जटेवरी रे तोललीस तू मङ्गल मंदाकिनी ।
त्र्यंबकेश्वरा आली म्हणुनी ही गंगा अंगणी ।
आज जाइ हा तुझा खरोखर वेलू गगनावरी ।
हार गळ्यातील अर्पिलेस तू प्रभुच्या पायांवरी ।।
अग्नये स्वाहा इदं न मम ।
अग्नये स्वाहा इदं न मम ।।
मंत्र जपत तू सर्वस्वाचा होम मांडिला जनी ।।१।।

पगडीखाली होती तुझिया गीता भगवन्ताची ।
श्रीरामास्तव तुला लाभली साथ सती सीतेची ।।
पायतळी तव विकट हांसली वाट कण्टकांची ।
पसरित गेली पायघड्या श्रद्धा अन्तरिची ।।२।।

सान तळ्याचे बने आज हे सुन्दर सरोवर ।
हंस विहरती डुलती कमळे सुगन्ध वाऱ्यावर ।।
सरोवराच्या तळी परन्तु तुझी प्रेरणा झरते ।
तुझ्या स्मृतीने माती इथली अजुनही गहिवरते ।।३।।



# प्राचार्य आचार्य

**प्रा. हर्षवर्धन कडेपूरकर**



आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात अनेक गुरू येतात,पण आपले प्रथम गुरू असतात आपले आईवडील. औपचारिक शिक्षण सुरू झाल्यानंतर विविध शिक्षक गुरू म्हणून त्यांची भूमिका बजावतात. नासिकच्या सरस्वती प्राथमिक विद्यालयातून सुरू झालेली माझी विद्यार्थी 'वारी' न्यू हायस्कूल, एच. पी. टी. महाविद्यालय, मराठवाडा विद्यापीठ, हैद्राबादची सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ इंग्लिश व इंग्लंडमधील ब्रिस्टल विद्यापीठ इथपर्यंत जाऊन पोहोचली. या सर्व संस्थांमधील गुरूंनी मला घडवले हे खरेच आहे; पण त्याचबरोबर माझ्या सहाध्यायांकडूनही मी शिकलो. प्राध्यापक म्हणून कार्यरत झाल्यानंतर सहकारी शिक्षक व मुख्यतः विद्यार्थी यांच्याकडूनही खूप काही शिकलो. या सगळ्यांबद्दल लिहिण्याची इच्छा असूनही शक्य नसल्याने मी माझ्या एकाच गुरूंविषयी लिहिणार आहे; पण माझ्या सर्व गुरूंबद्दलची माझी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने घेतो.

एच. पी. टी. महाविद्यालयाचा मी चार वर्षे विद्यार्थी होतो. या काळात इंग्रजी विभागात प्राचार्य एन. एम. आचार्य, प्रा मु. गो. देशपांडे, प्रा सी. एस. पंडित, प्रा पिरजादे असे एकाहून एक दिग्गज प्राध्यापक होते. प्राचार्य आचार्यांची विद्यार्थीप्रियता जबरदस्त होती. मुख्य म्हणजे प्राचार्य असूनही अगदी नियमितपणे ते त्यांचे सर्व तास घेत. त्यावेळी एफ. वाय. बी. ए. ला सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजीचे दोन पेपर्स सक्तीचे होते. यातील एका पेपरला ख्यातनाम नाटककार विल्यम शेक्सपियर याचे एक नाटक नेमलेले असे. आमच्या वेळेला 'ज्युलियस सिझर' हे नाटक अभ्यासाला होते. आचार्य सर हे नाटक शिकवीत असत असे म्हणण्यापेक्षा सर ते नाटक वर्गात जीवंत उभे करीत असत असेच म्हणावे लागेल. ते सादरीकरण इतके प्रभावी असे की,

त्या वर्गातील सर्व विद्यार्थी तर हजर असतच, पण एस. वाय. व टी. वाय. चे विद्यार्थीही येऊन बसत. त्यावेळी एच. पी. टी. मधील पोफळे हॉल हा सर्वात मोठा असलेला वर्ग एफ. वाय. साठी दिला जात असे. वर्ग मोठा असूनही अपुरा पडत असे, आणि वर्गाच्या उंच खिडक्यांमधूनही विद्यार्थी बसलेले असत. सर नाटकाच्या सादरीकरणात एवढे रममाण व्हायचे की त्यांना महाविद्यालयाचा तो वर्ग म्हणजे रंगमंच आहे असेच वाटायचे. वर्गभर संचार करताना कोट व टाय यांचे भान राहत नसे. अमोघ वक्तृत्व, शैलीदार इंग्रजी, अध्यापनाचे प्रेम, श्रोत्यांवर सहज प्रभाव पडेल असे व्यक्तीमत्व या साऱ्या गोष्टींची ईश्वरी देणगीच सरांना लाभली होती. आजही माझ्या कानात सरांचा आवाज घुमतो आहे. ज्युलियस सिझर या शोकांतिकेतील पुढील काही वाक्ये आजही मनात ताजी आहेत :

Et tu Brute, then die Caesar हे सिझरचे अखेरचे शब्द.

Not that I loved Caesar less, but that I loved Rome more. सिझरच्या हत्येचे समर्थन करताना ब्रुटसने काढलेले हे उदगार

The fault dear Brutus is not in our stars, but in ourselves that we are underlings. सिझरच्या हत्येसाठी ब्रुटसला मानसिकदृष्ट्या तयार करण्यासाठी कॅशियसने केलेले हे वक्तव्य

Friends, Romans, Countrymen, lend me your ears, I come to bury Caesar, not to praise him. सिझरच्या दफनविधीच्या वेळी अॅन्टोनियोने रोमन जनतेला केलेले हे आवाहन!

या नाटकातील अशी अनेक वाक्ये आज सुमारे साठ वर्षांनंतरही कानात, मनात, ह्रदयात घुमत राहिली आहेत केवळ प्राचार्य आचार्य सरांच्या किमयागिरीमुळेच. सरांच्या 'वन मॅन शो' मधून आमच्यासमोर सिझर, ब्रुटस, कॅशियस, अॅन्टोनियो आदी पात्रे उभी राहत. नाटकाच्या छापील प्रतीची गरज सरांना नसायचीच. सारे काही जीभेवर असायचे. देहभान विसरून सर त्या भूमिकांत शिरायचे आणि आम्हा विद्यार्थ्यांनाही आमच्या नकळत त्यात ओढून न्यायचे. हिप्नॉटिक इफेक्ट व्हावा तसे सारे विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन जात. अशीच आठवण आहे Chaucer च्या Canterbury Tales ची. या गोष्टी मुळातच फार रंजक आहेत. त्यात आचार्य सरांमुळे यांची रंगत वाढली नाही तरच नवल! अशा अनेक आठवणींची शिदोरी आजही माझ्याकडे आहे.

वर्गातील आचार्य सर वर्गाबाहेरही काही वेगळे नव्हते. त्या काळी महाविद्यालयाच्या कोणत्याही समारंभासाठी बाहेरून आलेल्या पाहुण्यांची मोठी पंचाईत होत असे. समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून आचार्य सर करीत असत. त्यावेळची त्यांची भाषणे इतकी प्रभावी होत की पाहुण्या व्यक्तीपुढे प्रश्न पडे की आता आपला निभाव कसा लागणार? हे म्हणजे लतादीदींनी एखादे गीत सादर केल्यानंतर उपस्थितातील कोणीही कितीही चांगले गाण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा काहीही उपयोग होत नसे, तसेच काहीसे आचार्य सरांच्या भाषणानंतर होत असे. पण याला काहीच इलाज नव्हता. लतादीदींचा सूर कधीही किंचीतही इकडे तिकडे हलत नसे, तसेच काहीसे आचार्य सरांचे होते. लतादीदी एकमेव

होत्या, तसेच आचार्य सरही एकमेव होते.

आचार्य सर प्राचार्य होते तसेच संस्थेचे आजीव सेवकही होते. यामुळे प्रशासनाची जबाबदारीही त्यांना स्वीकारावी लागली होती. पण त्यांना खरे प्रेम होते अध्यापनाचे. त्या काळी बहुतेक सर्वच प्राचार्य त्यांचे तास नियमितपणे घेत असत. पण विद्यार्थ्यांना वर्गात ओढून आणणे हे आचार्य सरांनाच साधले होते. त्याकाळी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांची रेलचेल असायची. स्नेहसंमेलन, युवक महोत्सव, क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, काव्यस्पर्धा, इत्यादींबरोबरच विद्यार्थी सभा, मराठी साहित्य सभा, गुजराथी साहित्य सभा यांचे भरगच्च कार्यक्रम होत असत. यातील अनेक उपक्रमात आचार्य सर उत्साहाने सहभागी होत.

बी. ए. साठी मी इंग्रजी हा मुख्य विषय निवडला असल्यामुळे एफ. वाय. , एस. वाय. व टी. वाय. या तीनही वर्षी आचार्य सरांचे मार्गदर्शन लाभले. सरांचे विद्यार्थ्यांशी अगदी अनौपचारिक संबंध होते. आपले गुरू आपल्याला अगदी पहिल्या नावाने ओळखतात याचा आनंद आम्हा विद्यार्थ्यांना होत असे. आम्ही इंग्रजी स्पेशल्वाले विद्यार्थी तर त्यांचे विशेष लाडके होतो. आम्ही टी. वाय. ला असतांना सरांचा प्रत्येक बुधवारचा तास त्यांच्या महाविद्यालय परिसरातील बंगल्यावरच होत असे. काहीतरी चांगलेचुंगले खाल्ल्याशिवाय व आम्हाला खिलवल्याशिवाय तास सुरू होत नसे. काहीच नाही तरी निदान सरांच्या फ्रीजमधील ‘जेली’चा समाचार घेण्याचे स्वातंत्र्य आम्हाला असे. सरांच्या पत्नी डॉ. हेमलता आचार्य त्यावर्षी अमेरिकेतील एका विद्यापीठात अभ्यागत प्राध्यापक म्हणून गेलेल्या होत्या, त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना सरांच्या निवासस्थानी मुक्तप्रवेश होता.

आचार्य सर व आचार्य मॅडम यांचे स्वभाव अगदी वेगवेगळे होते. सर म्हणजे प्रचंड ऊर्जा, अफाट उत्साह, मजबूत शरीरयष्टी, मनमोकळे हास्य आणि अनौपचारिक वर्तन ! मॅडम म्हणजे बेताची अंगकाठी, करारी मुद्रा, विद्वत्तेची झळाळी व सातत्यपूर्ण अध्ययनामुळे चेहऱ्यावर आलेली गंभीरता व विद्यार्थ्यांबरोबरच सहकारी शिक्षकांबरोबरही एक विशिष्ट अंतर ठेऊन राहण्याची वृत्ती ! सरांची अनौपचारिकता व मॅडमची औपचारिकता दोघांनाही शोभणारी होती. मी महाविद्यालयात शिकत असतानाच्या काळात मॅडम नाशिकला फारशा कधी नसायच्याच. ज्येष्ट समाजशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांच्याबरोबर त्या कोणत्या न कोणत्या संशोधन प्रकल्पात गुंतलेल्या असायच्या. पुढील काळात मी बी. वाय. के. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करू लागलो व मॅडमही एम. बी. ए. च्या विद्यार्थ्यांना शिकवायला महाविद्यालयात नियमितपणे यायला लागल्या आणि माझे आचार्य मॅडमशी ऋणानुबंध निर्माण झाले. अर्थात हे सोपे नव्हते. कधीही भेट झाली की विचारीत सध्या काय वाचतो आहेस? एक चांगले नवीन पुस्तक आले आहे. घरी येऊन घेऊन जा. पीएच. डी. चे काय ठरवले आहेस? इंग्रजी वगैरे ठीक आहे, पण समाजशास्त्रात काही करता येईल का ते आपण बघूया. थोडक्यात मॅडमना भेटायचे म्हणजे तयारीने भेटावे लागायचे.

मी बी. वाय. के. त रुजू झालो तोपर्यंत आचार्य सरांना निवृत्त होऊन काही काळ लोटला होता, पण संस्थेचे अध्यक्षपद त्यांच्याकडे होते

व त्यानिमित्ताने ते महाविद्यालयात येत असत. भेट झाली की कसा आहेस, काय चालले आहे वगैरे औपचारिक प्रश्न झाले की सर थेट मुद्द्यावर येत. 'तुझी पत्नी शोभना चकल्या छान करते, तिला सांग मी येणार आहे घरी. आणि मागच्या वेळी तिने बटाटावडे केले होते, तेही पुन्हा करायला सांग. गुलाबजाम तर हवेतच. ' माझी पत्नी शोभना हीदेखील सरांची विद्यार्थिनी होती. सर आमच्या घरी आले होते व या पदार्थांचा आस्वाद त्यांनी घेतला होता, हे जरी खरे असले तरी असे प्रसंग फार वेळा आले नाहीत. एकतर सरांचे वय झाले होते. एवढे सगळे खाद्यपदार्थ खाणे त्यांना शक्यही नव्हते, पण त्याबाबत बोलण्याचा उत्साह तसुभरही कमी झाला नव्हता. शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरूस्त राहण्याचा सरांचा प्रयत्न असायचा. निवृत्तीनंतर अगदी नियमितपणे सर त्यांच्या कुलकर्णी कॉलनीतील निवासस्थानापासून शालीमारपर्यंत रोज पायी येऊन जात. ते इतक्या गतीने चालत की त्यांच्याबरोबर चालणे भल्याभल्यांनाही जमत नसे.

सारे काही ठीक चालले आहे असे वाटत असतानाच अचानकपणे आचार्य मॅडम आजारी पडल्या. शस्त्रक्रिया करूनही त्याचा उपयोग झाला नाही. मॅडम गेल्यानंतर सरांची अवस्था कठीण झाली. मॅडमवर सर्वच बाबतीत अवलंबून राहण्याची सवय झाली असल्यामुळे सरांचा पुढचा एकाकी प्रवास अवघड होता. शरणपूर रस्त्यावरील कुलकर्णी कॉलनीतील त्यांचे 'प्रणव' हे घर बांधण्यापासून घर चालवण्यापर्यंतच्या सर्वच गोष्टी मॅडमच करीत असल्यामुळे सर या सर्वच बाबतीत अनभिज्ञ होते. सर किंवा मॅडम यांच्या कुटुंबातील कोणी त्यांची जबाबदारी घेतील याचीही शक्यता नव्हती. यामुळे सरांचा शेवट फार दूर नव्हता. अखेर तो क्षण आलाच. सर गेले. अतिशय निगुतीने उभे केलेले घर उजाड झाले. शेजारीच असलेल्या प्रा कानेटकर सरांच्या 'शिवाई' या घराने काही काळ टिकाव धरला आणि अखेर तेही नेस्तनाबूत झाले. आमच्या डोळ्यासमोर उभ्या राहिलेल्या या दोन्ही टुमदार वास्तूंचा अंत बघण्याची वेळ आली. प्रा कानेटकर सरांच्या शब्दात सांगायचे तर 'देवाघरचे ज्ञात कुणाला विचित्र नेमानेम? कुणी रखडती धुळीत आणिक कुणास लाभे हेम.' जीवनाचे हे कठोर सत्य कानेटकर सरांनी आधीच ओळखले होते आणि म्हणूनच त्यांच्या 'संगीत मत्स्यगंधा' नाटकातील या गीतात हे व्यक्त झाले होते. आचार्य सरांनीही जीवनाचे हे कठोर सत्य ओळखले असावे आणि म्हणूनच मॅडमच्या जाण्यानंतर त्यांनी आवरासावर सुरू केली होती.

आचार्य सर व मॅडम दीर्घ काळ महाविद्यालयाच्या परिसरातच राहत होते. कानेटकर सरही त्यांच्या कुटुंबियांसह तिथेच राहत होते. यथावकाश दोन्ही कुटुंबांनी कुलकर्णी कॉलनीत प्लॉटस् घेतले आणि छान बंगले बांधले. या दोन्ही कुटुंबांची जवळीक इतकी होती की कानेटकर सरांच्या 'लेकुरे उदंड झाली' या नाटकातील राजा व राणी या नायक-नायिकेच्या जोडीमध्ये आचार्य सर व मॅडम माझ्यासारख्या अनेकांना दिसले. राजा व राणीसारखेच आचार्य सर व मॅडम निपुत्रिक होते. तसेच नाटकातील राजा व राणी आणि आचार्य सर व मॅडम यांचे स्वभावविशेषही खूप एकसारखे होते. राजासारखेच आचार्य सरही सदैव हसतमुख असत. गंभीरता त्यांच्या वाऱ्यालाही उभी

राहत नव्हती. याउलट राणीसारख्याच आचार्य मॅडम कमालीच्या करारी व काटेकोर होत्या. राणीच्या स्वच्छता व नीटनेटकेपणाचा कळस म्हणजे घरावरील कौलेही नियमित घासूनपुसून घेणे! आचार्य मॅडम काही फारशा वेगळ्या नव्हत्या. मॅडमच्या शिस्तीत राहणे सोपे नव्हते. आचार्य सर व मॅडम यांचे स्वभाव इतके वेगळे असूनही त्या दोघांचे सांसारिक जीवन आनंदी व समाधानी होते.

वरून फणसासारख्या काटेरी भासणाऱ्या आचार्य मॅडम प्रत्यक्षात कमालीच्या कोमल हृदयी होत्या. लहानसहान गोष्टींवरून त्या अस्वस्थ होत. ही अस्वस्थता चेहऱ्यावर न दाखवता कोणत्याही प्रश्नास त्या धीराने सामोऱ्या जात. मॅडममुळेच माझा देवळाली कॅम्पमधील लेस्ली सॉनी सेंटरशी संबंध आला आणि तो पुढील दहा वर्षे टिकून राहिला. मेहरा मसानी संचालकपदी असलेल्या या केंद्रात विद्यार्थी, शिक्षक, समाजकार्यकर्ते अशा विविध समाजघटकांसाठी नेतृत्व शिक्षणाची शिबिरे आयोजित केली जात. एकदा मला मेहरा मॅडमचे पत्र आले. Planning in India and Economic Conditions of India या विषयांवर व्याख्याने देण्यासाठी मला निमंत्रित करण्यात आले होते. मी गोंधळून गेलो. मेहरा मॅडमना फोन करून सांगण्याचा प्रयत्न केला की हे माझे अभ्यासाचे विषय नाहीत. यासाठी अर्थशास्त्राचे माझे प्राध्यापक मित्र येऊ शकतील. यावर मेहरा मॅडम म्हणाल्या की हे विषय माझे नाहीत हे त्यांना माहीत आहे आणि म्हणून मीच यावर बोलले पाहिजे. आता काय करावे हा प्रश्न मला पडला. पण त्याचे उत्तर सोपे होते आणि ते म्हणजे आचार्य मॅडम ! मॅडमनी माझ्याकडून या विषयांची तयारी करून घेतलीच, पण मी ही दोन्ही सत्रे व्यवस्थितपणे हाताळेल हेही पाहिले.

आचार्य सरांचेही तसेच काहीसे होते. वरून सदैव हसतमुख वाटणारे आचार्य सर प्रसंगी अतिशय कठोर होत हे मी पाहिले आहे. त्याकाळी महाविद्यालय जनरल सेक्रेटरीची निवडणूक घेणे फार अवघड होते. शहरातील तसे एकमेव जुने महाविद्यालय असल्यामुळे साऱ्या गावाचे लक्ष या निवडणुकीकडे असायचे. चुरशीने होणाऱ्या या निवडणुकीत काहीही गडबड होणार नाही व गुंडगिरी होणार नाही यासाठी खूप सावधगिरी घ्यावी लागत असे. तसेच काहीसे स्नेहसंमेलनाचे होते. साऱ्या गावाचे स्नेहसंमेलन असल्यासारखे महाविद्यालयाशी काहीही संबंध नसलेले अनेक चेहरे यावेळी परिसरात दिसत. या सगळ्यांना आवरणे व शांतता राखणे हे कौशल्याचे काम होते. आचार्य सरांच्या विद्यार्थीप्रियतेची जणू परीक्षाच व्हायची. पण या सगळ्या प्रश्नांना आचार्य सर पुरून उरत.

आजही शरणपूर रस्त्यावरून जाताना कुलकर्णी कॉलनीच्या पार्कसमोरील घरांवर नजर जाते व अस्वस्थ व्हायला होते. आता तिथे उंच टॉवर्स उभे आहेत. पण 'प्रणव' व 'शिवाई' या वास्तू मात्र आजही तशाच मनात दबा धरून बसल्या आहेत. या वास्तू आणि त्या वास्तूंमधील आचार्य सर व मॅडम आणि कानेटकर सर व कुटुंबीय यांच्या आठवणी कधीच पुसल्या जाणार नाहीत. हेच तर माझे संचित आहे. याहून अधिक काय मिळवायचे असते गुरूंकडून?

◆◆



# तेथे कर माझे जुळती
# गुरुवर्य – प्रा. वसंत कानेटकर

**प्रा. उल्हास रत्नपारखी**



प्रा. वसंत कानेटकरांसारखा गुरू (प्राध्यापक) लाभणे हे मी माझे परमभाग्य समजतो. पदवीपूर्व ते एम. ए. (मराठी) अशी सलग सहा वर्षे त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मला झाला. हे सारे घडले ते हंसराज प्रागजी ठाकरसी (हं. प्रा. ठा-एच. पी. टी) महाविद्यालयामुळे गोखले शिक्षण संस्थेचे हे नाशिक शहरातील ख्यातनाम महाविद्यालय! इथे विद्यार्थी म्हणून मला जे मिळाले, त्याचे बहुतांश श्रेय सरांचे म्हणजे प्रो. वसंत कानेटकर यांचे आहे. (यापुढे मी सर हा उल्लेख प्रा. वसंत कानेटकरांना उद्देशून करणार आहे.) माझ्या आयुष्यातील ती सहा वर्षे म्हणजे सोन्याचे दिवस होते. महाविद्यालयात सर सुटाबुटात यायचे, त्यांचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार, प्रसन्न होते. ते वरून जसे सुंदर होते तसे त्यांचे अंतरंगही संपन्न होते. त्यासाठी सहा वर्षांचा आढावा, प्राध्यापक म्हणून सरांचे आगळे रूप या जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने यावे ही भूमिका. सर आज असते तर त्यांच्या आयुष्याला शंभर वर्षे पूर्ण झाली असती. ते कथाकार, कादंबरीकार व नाटककार होतेच, तसेच उत्कृष्ट प्राध्यापक होते हे सांगण्यासाठीचा हा लेख प्रपंच. १९४६ साली ते नाशिकच्या हं. प्रा. ठा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते.

**पदवीपूर्व वर्ग (Pre Degree)**

महाविद्यालयात या पदवीपूर्व वर्गात सर आम्हाला पाठ्यपुस्तकातील मराठी कविता, तसेच इंग्लिश पाठ्यपुस्तकातील कविता शिकवीत असत. मराठीप्रमाणे सरांचे इंग्रजीवरही प्रभुत्व होते. सव्वाशे विद्यार्थ्यांनी गच्च भरलेला वर्ग, एका बाजूला (शिकविणाऱ्याच्या उजव्या हाताला) मुली बसत तर दुसऱ्या डाव्या बाजूला मुले बसत. मधल्या थोड्याशा मोकळ्या जागेत सर उभे राहात, जी कविता मग ती मराठी असो वा इंग्लिश- त्या कवीची माहिती विस्ताराने

सांगत त्याच्या व्यक्तिमत्त्वावर पुरेसा प्रकाश टाकीत, मग ती कविता सावकाश वाचून दाखवीत. कधी कधी दोन-तीनदा ही वाचत असत. त्यांचे ते कविता वाचन विलक्षण असे. सरांचा आवाज अत्यंत गोड, भावपूर्ण! त्यामुळे त्या कविता वाचनाचा वर्गावर खूप प्रभाव पडे. कवितेचा अर्थबोध-सौंदर्यबोध होत असे. त्यावेळी सरांनी शिकविलेल्या हरपले श्रेय (कवी केशवसुत) मधुघट (कवीवर्य भा. रा. तांबे) गोदागौरव (कवी चंद्रशेखर) उद्ध्वस्त धर्मशाळा (बालकवी) या कविता सदैव स्मरणात राहिल्या. त्यावेळी बालकवीच्या एका कवितेसाठी बालकवीचे सगळे भावविश्व (चरित्र) उलगडून दाखविले होते. 'भिंत खचली । कलधून खांब गेला । उभी पडकी । उद्‌धवस्त धर्मशाळा ।' या ओळीतर मनःपटलावर कायम कोरल्या गेल्या.

इंग्लिश पद्य विभाग शेली (स्कायलार्क) कीट्स (ग्रेशिअन अर्न) शेक्सपिअरचे सुनीत (सॉनेट) वर्ड्स्वर्थ (शी ड्वेल्ट अमंग द अनट्राउन वेज) मिल्टन (ऑन हिज ब्लाइंड नेस-सॉनेट) या सारख्या अनेक कविता. इथेही कविता शिकविण्यापूर्वी रसाळ, प्रभावी कवितावाचन असायचेच. इथेही कवीचा वेधक आणि नेटका परिचय करून देत. वर्ड्स्वर्थची जी कविता आम्हाला अभ्यासण्यासाठी होती ती त्यांच्या "Luck Poems' चा एक भाग होती. त्यामुळे 'ल्युसी' नामक बालिकेचे भावविश्वच सरांनी उभे केले. त्या कवितेतल्या ओवी आणि सरांचा तो भावमधुर स्वर आजही कानात, मनात आहेत. "She dwelt among the untrodden way. ' या कवितेतील त्या ओळी अशा आहेत.

She lived unknown
and few could know
But luck ceased to be
But she is in her grave and oh
The difference to me

\- William Wordsworth

मिल्टनची "On his blindness' या सॉनेटमधील शेवटची ओळ अशीच मनात ठाण मांडून बसली आहे. ती ओळ अशी आहे, 'They also serve who only stand. '

**प्रथम वर्ष बी. ए. विशाखाचे दिवस**

महाविद्यालयातील माझे हे दुसरे वर्ष, पण पदवी अभ्यासक्रमाचे हे पहिले वर्ष. सरांच्या अध्यापन कौशल्याचा पुढील अनुभव कथना आधी माझ्या आणखी दोन प्राध्यापकांचा अतीव आदराने उल्लेच करावयाचा आहे. त्यातील पहिले आहेत, प्रा. वि. वा. तथा अण्णासाहेब आंबेकर व दुसरे डॉ. बाळासाहेब दातार. दोघेही व्यासंगी होते. प्रा. आंबेकर म्हणजे 'चालता बोलता ज्ञानकोश' होते. डॉ. बाळासाहेब दातार आपल्या मिस्कील शैलीबद्दल प्रसिद्ध होते. डॉ. दातार आम्हाला 'प्रमेयांची उद्याने' हा निबंधसंग्रह शिकवित, तर प्रा. आंबेकर हे भावबंधन (रामगणेश गडकरी) नाटक शिकवीत. वसंतराव म्हणजे प्रा. कानेटकर आम्हाला कवी कुसुमाग्रजांचा 'विशाखा' हा काव्यसंग्रह शिकवित असत, ते वर्ष म्हणजे 'विशाखा'चे दिवस होते.

या काव्यसंग्रहाचे इतके पैलू आम्हाला सरांनी उलगडून दाखविले की थक्क व्हावे. १९४२ साली हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यावेळी कोल्हापूरात राहणाऱ्या वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकराच्या पुढाकारानेच हे प्रकाशन घडलेले. हा विशाखाचा प्रकाशनपूर्व

इतिहास इथे विस्ताराने सांगावा असेही नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होण्याआधीच भाऊसाहेबांच्या घरी सरांनी तो वाचला होता आणि सर कुसुमाग्रजांच्या प्रेमात पडले होते. 'विशाखा' संग्रह सरांचा मुखोद्गत होता. त्यामुळे पुस्तक हातात घेण्याची गरजच नसायची. अगदी 'दूर मनोऱ्यात' या पहिल्या कवितेपासून 'समिधाच सख्या' या शेवटच्या कवितेपर्यंतचा प्रवास विलक्षण होता. एकाहून एक सरस कविता. कोणकोणत्या कवितांचा उल्लेख करायचा. हिमलाट, स्वप्नाची समाधी, अहि-नकुल, क्रांतीचा जयजयकार, जालीयनवाला बाग, कोलंबसाचे गर्वगीत, पृथ्वीचे प्रेमगीत, बालकवी, सैगल, समिधा व सख्या या कवितांमधील किती ओवी सहज लक्षात राहिल्या, नव्हे आपोआप पाठ झाल्या. काही उदाहरणे पहा.

किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाची लेणी
काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत
ओतीत विखारी वातावरणी आग
हा वळसे घालित आला मन्थर नाग
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार

सरांच्या शब्दाशब्दातून कवी कुसुमाग्रजांचे उत्तुंग व्यक्तिमत्व आमच्यासमोर उलगडत गेले. माझ्याही मनात तात्यासाहेबांबद्दल अतीव आदरभाव निर्माण होऊन पुढे तात्यासाहेबांशी ऋणानुबंध जुळले, घट्ट झाले.

### दुसरे आणि तिसरे वर्ष

दिवस रायगडाचे पदवीचे दुसरे वर्ष (S. Y. B. A.) म्हणजे आनंदपर्वणी ठरली. या वर्षी सर स्वतःच स्वतःचे नाटक शिकविणार होते. १९६२ साली 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक रंगभूमीवर आले. मराठी रंगभूमीवर एक नवे पर्व या नाटकाने निर्माण केले. या ऐतिहासिक नाटकाने इतिहास निर्माण केला. लवकरच विद्यापीठाने हे नाटक अभ्यासक्रमात समाविष्ट केले. हे नाटक सरांनी ज्या पद्धतीने आम्हाला शिकविले तो अनुभवच विलक्षण होता. ते मंतरलेले दिवस होते. सरांचा एक एक शब्द कानात साठवून ठेवावा असा होता. शिवाजी महाराजांच्या चरित्राचे अनेक पदर सरांनी आमच्यासमोर उलगडून ठेवले होते. या छत्रपतींच्या हृदयांतरीचे नेमके शल्य- नाटककार वसंत कानेटकरांनी प्रतिभेच्या बळावर, शब्दबद्ध केले होते, ते प्रा. वसंत कानेटकरांनी तितक्याच समर्थपणे स्पष्ट करून सांगितले. त्यामुळे नाटकातील सगळीच पाने समजली, उमजली. येसूबाईचं परिपक्व रूप जाणवलं, सोयराबाईंचा धूर्तपणा, अण्णाजी मोरोपंत यांचे प्रधानमंडळातील स्थान कळाले. सरनोबत हंबीररावांची स्वराज्यनिष्ठा जाणवली. छोट्या रामराजांच्या निर्मळतेने आकर्षून घेतले. या नाटकासारखे 'शिवाजी महाराज' पूर्वी कधीच दिसले नाहीत. पिता-पुत्राच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज या नाटकात वेगळ्याच तेजाने तळपत राहातात. हे सारे तेज विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यास सर शंभर टक्के यशस्वी ठरले होते.

त्यावेळी अभ्यासासाठी भाऊसाहेबांची बखर होती. १४ जानेवारी १७६१ च्या पानिपतच्या पराभवाची चर्चा करणारी ही बखर सरांनी ज्या अभ्यासपूर्ण पद्धतीने शिकविली की आजही नजीबखान, सुरजमल जाट, रघुनाथराव पेशवा, अहमदशा अब्दाली, जयाजी-जनकोजी-दत्ताजी

शिंदे, खंडेराव व मल्हाराव होळकर, भाऊसाहेब – विश्वासराव ही माणसे स्मरणात आहेत.

'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' शिकविताना सरांचा अभ्यास, व्यासंग सदैव जाणवत होता. संतकवी, पंडितकवी व खादी शाहिरी काव्या (पोवाडे–लावण्या) हा त्रिपेढी अभ्यास करताना सरांनी जो पट दृष्टीसमोर उभा केला तो त्यांच्या अध्यापन कौशल्याचा एक भाग होता.

**एम. ए. ची दोन वर्षे**

एम. ए. च्या दोन वर्षात मराठीचे ८ पेपर होते. त्यातील तीन–साडेतीन पेपर्स सर शिकवीत. त्यात 'टीकाशास्त्र' (क्रिटिसिझम) हा महत्त्वाचा पेपर वसंतराव (सर) शिकवित. आधीच्या अभ्यासक्रमात (बी. ए. च्या) 'काव्यशास्त्र' हा पेपर होता. त्यात संस्कृत काव्यशास्त्राच्या आधारे विश्लेषण होते. तर टीकाशास्त्रात पाश्चात्य टीकाकारांच्या आधारे विवेचन होते. इंग्लिश हा सरांचा विषय असल्याने अवघड वाटणारा 'टीकाशास्त्रा'चा अभ्यास सरांनी सुबोध केला.

या दोन वर्षात शिकविलेल्या पुस्तकांपैकी सदैव स्मरणात राहिलेल्या दोन गद्य आणि दोन पद्य पुस्तकांचा मुद्दाम निर्देश करीत आहे. गद्यात– श्री. व्यं. केतकरांच्या 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीचा उल्लेख करावाच लागेल. तसे 'लीळाचरित्र' या महानुभवान साहित्यातील एका अव्वल चरित्रग्रंथाचा उल्लेखही महत्त्वाचा आहे. केतकरी कादंबरीचा अफाट आवाका 'ब्राह्मणकन्ये'च्या निमित्ताने सरांनी आमच्या समोर उभा केला. तर 'लीळाचरित्रा'तून प्रकटलेले चक्रधर चरित्र उभे करताना त्या महानुभावीय मराठी गद्याचा जो गोडवा शब्दातून सांगितला तो सारा प्रकार विलक्षण होता.

क्रिस्तपुराण आणि मर्ढेकरांची कविता ही दोन पद्यपुस्तके त्यांनी शिकविली.

'क्रिस्तपुराण' हे 'जेसुइट' पंथाच्या ख्रिस्ती धर्मोपदेशकाने लिहिलेले ख्रिस्तचरित्र आहे. ओवीबद्ध असा हा काव्यग्रंथ आहे. या काव्यग्रंथाच्या निमित्ताने 'फादर स्टीफन' या ग्रंथकाराचा परिचय झाला. त्याच्या कवित्वाचाही सरांनी रसाळ भाषेत परिचय करून दिला. त्या निमित्ताने बायबल, येशूचे चरित्र, जुना करार, नवा करार या सारखे असंख्य पैलू सरांनी आमच्या समोर ठेवले.

'मर्ढेकरांची कविता' या संग्रहातील कवितांचा अभ्यास करताना 'मराठी नवकाव्य' या संकल्पनेचा अत्यंत सविस्तर परामर्श घेतला. मर्ढेकर नवकाव्याचे प्रणेते आहेत काय? या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली. दुर्बोध म्हणून ओळखली गेलेली मर्ढेकरी कविता कानेटकरांच्या रसाळ शैलीमुळे सुबोध झाली. त्यामुळे फलाटदादा, मी एक मुंगी, महात्मा गांधींवरील कविता लक्षात राहिल्या. 'पोरसवदा होतीस तू' या कवितेचे सरांचे रसग्रहण केवळ अप्रतिम! आजही त्या कवितेतील ओळी पिंगा घालतात.

पोरसवदा होतीस कालपरवा पावेतो  
आज टपोरले पोट, जशी मोगऱ्याची कळी  
थांब उद्याचे माऊली तीर्थ पायाचे घेईतो

मला पुढील काळात प्रा. वसंत कानेटकरांच्या ऐतिहासिक नाट्यपंचकावर पीएच.डी. (डॉक्टरेट) करण्याची संधी मिळाली. पुढे हा प्रबंध 'गगनवेध' या नावाने ग्रंथ रूपात प्रसिद्ध झालेला आहे. सरांच्या (प्रा. वसंत कानेटकर) अध्यापनरूपी रसयात्रेत चिंब भिजून गेलेला मी एक विद्यार्थी या महान गुरुवर्यांस अभिवादन करतो.



# शब्दसुमनांजली : प्रा. वसंत कानेटकर

**सौ. उषा जयंत गावडे**



'मासानां मार्गशीर्षोऽहम् ऋतूनां कुसुमाकर.' असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत म्हटले आहे. सर्व ऋतूंमध्ये मी नावाला यथार्थ ठरवणारे, नावाप्रमाणेच प्रसन्न, सदाबहार, उमदे, रूबाबदार व्यक्तिमत्व म्हणजे आमचे सर– अर्थातच स्व. वसंतराव कानेटकर.

आयुष्यात अनेक गोष्टी योगायोगाने घडतात. मी धुळ्याला बी. ए. झाले. नंतर वडीलांची एरंडोलला बदली झाली. अमळनेरच्या महाविद्यालयात माझे एम. ए. चे एक सत्र झाले अन् वडीलांची बदली कोकणात झाली; पण मला विद्यापीठ बदल नको असल्याने बार्न्स स्कूल येथे वडिल बंधूंकडे राहून नासिकच्या हं. प्रा. ठा. महाविद्यालयात प्रवेश घ्यायचे ठरवले. मी पदवीधर झाले, त्या महाविद्यालयाचे अचानक पत्र मिळाले. त्यात नमूद केल्यानुसार मला राष्ट्रीय शिष्यवृत्ती "National Scolarship' जाहिर झाली असून दहा दिवसांचे आत सर्व कागदपत्रांसह अर्ज, शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाद्वारा सादर करण्याचा आदेश होता. आधीच टप्पे खात पत्र मला बरेच उशीरा मिळाले होते. त्यामुळे ताबडतोब नासिकला येऊन हं. प्रा. ठा. महाविद्यालयात प्रवेश घेऊन शासनाकडे विनंती अर्ज सादर केला. याबाबतीत कार्यालयीन कर्मचारी व तत्कालिन प्राचार्य डॉ. ओक यांनी बहुमोल सहकार्य केले. जन्मभूमी नासिक असलेल्या माझी अशा प्रकारे या महाविद्यालयाशी नाळ जोडली गेली! जीवनात जे अनपेक्षित लाभ नियतीने दिले, त्यातील हे दोन अलभ्य लाभ. भारत सरकारची शिष्यवृत्ती व एक प्रथितयश नाटककार गुरुवर्य म्हणून लाभणे.

ऑक्टो. १९७० ते मे १९७२ या कालावधीत मी हं. प्रा. ठा. महाविद्यालयाची विद्यार्थिनी होते. पदव्युत्तर शिक्षणात संस्कृत हा माझा मुख्य विषय व मराठी पूरक विषय. पहिलाच तास मराठीचा. हॉल विद्यार्थ्यांनी तुडुंब

भरलेला. अन् अचानक कारमधून एक रुबाबदार व्यक्ती उतरून आमच्या वर्गात आली. मंद सुगंध हवेवर तरंगत सर्वत्र पसरला. प्रथमदर्शनीच वसंतराव कानेटकरांचे झालेले हे विलोभनीय दर्शन! आज घरोघरी कार दिसतात; पण ५०-५५ वर्षांपूर्वी स्कूटर हे देखील श्रीमंती लक्षण होते. रस्त्यांवर विशेष वर्दळही नव्हती. सायकली व क्वचित एखाद दुसरी रिक्षा दिसे. अन् सर तर कायमच कारने काही तासांपुरती महाविद्यालयात येत. अनेक व्यवधानात ते सदैव गुंतलेले असल्याने त्यांचे तास फार कमी होत; पण सवडीनुसार २-२ तास घेऊन ते अभ्यासक्रम पूर्ण करीत. एका वर्षी कवीवर्य तांबे यांच्या कविता व दुसऱ्या वर्षी तुकोबांचे अभंग यासंदर्भात नितांत सुंदर, अविस्मरणीय विवेचन त्यांच्या अस्खलित ओघवत्या शैलीतून कायमचे अंतर्मनात ठसले. त्यांचे तास म्हणजे आमची श्रवणानंदात लागलेली समाधी! त्यांच्या मुखातून बाहेर पडलेला शब्द न् शब्द वहीत उतरवतांना धांदल उडे. ते शब्द मनःपटलावर एवढे ठसत की उत्तर पत्रिकेत लेखणीच्या मदतीने पाझरत. त्याकाळी नोट्स काढलेल्या वह्या नंतर खूप वर्षे संग्रही होत्या. निबंधलेखनात व अध्यापन करतांना संदर्भासाठी त्यांचा खूप उपयोग झाला. वास्तविक सरांचा पिंड नाटककाराचा; पण पित्याकडून संक्रमित झालेले काव्य त्यांच्या रक्तात भिनले होते आणि तसेही जातीवंत नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचे वरदान लाभलेल्याला साहित्याच्या कोणत्याही क्षेत्राचे वावडे नसते.

कानेटकर सर हे हं. प्रा. ठा. महाविद्यालयाची शान व मान होते. ते महाविद्यालयाशी जोडले जाणे, हा महाविद्यालयाचा गौरव होता. त्याकाळी नामवंत साहित्यिकात ते अग्रेसर होते; पण 'एवढ्या महान व्यक्तीकडून आपण ज्ञानार्जन करतोय' याचे तेव्हा एवढे अप्रूप नव्हते; जेवढे आज प्रकर्षाने जाणवतेय. पदवी प्राप्त करेपर्यंत राष्ट्रीय शिष्यवृत्तीच्या ध्यासाने पछाडल्यामुळे मी अक्षरशः पुस्तकी किडा बनले होते. अन् पदव्युत्तर शिक्षण घेतांना घड्याळाकडे नजर ठेवत बसेस पकडण्याकडे लक्ष. कारण त्या काळात थेट बसेस नसल्याने बार्न्स स्कूल ते देवळाली कँप, देवळाली कँप ते भद्रकाली स्टॅण्ड व नंतर मेहेर स्टॉप ते कॉलेज अशा तीन बसेस येतांना व उलट क्रमाने जातांना बदलाव्या लागत. परिणामी अवांतर वाचनाला फुरसतच नसायची.


मात्र ज्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाने आमचा साहित्यिक पिंड पोसला गेला, बौद्धिक जडणघडण झाली अशा गुरुजनांमध्ये सदैव उत्साही, हसतमुख, प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या कानेटकर सरांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांनी खतपाणी घालून आमची साहित्यविषयक रूची वृद्धिंगत केली. मराठी हा माझा पूरक विषय असल्याने माझा मोजक्याच तासांसाठी त्यांचा संपर्क आला; पण हेही नसे थोडके! कारण मिळाले ते 'देता किती घेशील दो करांनी' होते! सुग्रास पंचपक्वान्नांची बौद्धिक सुग्रास मेजवानी देऊन आम्हा साऱ्यांनाच त्यांनी तृप्त केले. शिक्षक-प्राध्यापकाची विद्यार्थी प्रियता हीच त्याच्या कर्तृत्वाची पावती असते.

आज एवढ्या कालावधीनंतरही 'लोकांच्या हृदयामधील ढळते त्याचे न सिंहासन' अशा माझ्या या दिवंगत गुरुवर्यांचे चरणी ही शब्दसुमनांची ओंजळ समर्पित! शतशः प्रणाम!



# व्यासंगी डॉ. गो. वि. देवस्थळी

**डॉ. ग. उ. थिटे**



प्रोफेसर गोविन्द विनायक देवस्थळी नाशिकमधील एच. पी. टी. महाविद्यालयातील प्राध्यापक होते. त्यांनी या संस्थेमध्ये सुमारे सत्तावीस वर्षे संस्कृत भाषेच्या अध्यापनाचे कार्य केले. या महाविद्यालयाच्या शताब्दी सोहळाच्या निमित्ताने त्यांचे, त्यांच्या कार्याचे स्मरण करणे अत्यंत औचित्यपूर्ण ठरेल. १९६६–१९७१ या काळात प्रा. देवस्थळी हे माझे पीएच. डी. चे मार्गदर्शक होते. त्यामुळे त्यांच्याविषयी येथे चार शब्द मी लिहिणे अत्यंत औचित्यपूर्ण ठरेल असा माझा विश्वास आहे.

प्रा. डॉ. देवस्थळी यांच्या आयुष्याचा काळ ३ ऑक्टोबर १९०६ ते १४ मार्च १९९४ असा होता. म्हणजे सुमारे अठ्ठ्यांशी वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. या काळात त्यांनी सतत संस्कृतचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या प्रकारचे कार्य केले. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील धामापूर येथे झाला. त्यांचे सर्व शिक्षण मुंबई येथे झालं. मुंबईमधील सेंट झेवियर तसेच विल्सन् महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. प्रसिद्ध वैदिक अभ्यासक प्रा. हरि दामोदर वेलणकर यांचे ते विद्यार्थी. एम. ए. ला त्यांना 'झाला वेदांत' हे बक्षीस मिळाले होते. त्यांनी बी. टी. ही परिक्षाही दिली होती. ते प्रथम मुंबईतील शाळेत आणि नंतर नाशिकमधील एच. पी. टी. महाविद्यालयात अध्यापन कार्य करीत होते. नाशिकमधील वास्तव्याच्या काळातच त्यांनी 'मीमांसा, द वाक्सूत्र ऑफ एन्शन्ट इंडिया' या विषयावर मुंबई विद्यापीठातून पीच. डी. ही पदवी प्राप्त केली. (१९४६) हा ग्रंथ पुढे १९५९ पुणे येथून आणि पुढे १९९१ मध्ये दिल्ली येथून (पुर्नमुद्रित स्वरूपात) प्रकाशित झाला आहे. मुंबईत असतानाच त्यांनी हस्तलिखितांची सुमारे (३०००) वर्णनात्मक सूची तयार केली होती. ती मुंबई विद्यापीठातर्फे १९४४–१९४६ मध्ये दोन भागात प्रकाशित

झाली आहे. या सूचीमध्ये संस्कृत तसेच प्राकृत हस्तलिखितांचा समावेश करण्यात आला आहे. पुढे त्यांनी वेद, तसेच व्याकरण या विषयांतही संशोधन कार्य केले आहे आणि ते प्रकाशित झाले आहे. 'वरदराजाची मध्यसिद्धांतकौमुदी' (पुणे विद्यापीठ, पुणे १९६७) प्रा. का. वा. अभ्यंकरांचे 'वेदविकृतिलक्षण संग्रह' हे अपूर्ण कार्यही देवस्थळी यांनी पूर्णत्वास नेले. ते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातर्फे १९७८ मध्ये प्रकाशित झाले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मुद्राराक्षसम्, मृच्छकटिकम् यांसारख्या अभिजात संस्कृत नाटकांवरही ग्रंथ लिहिले. भाऊ दाजी अष्टेकर यांच्या नावाने होणाऱ्या व्याख्यानमालेत पुणे विद्यापीठातर्फे त्यांनी इंग्रजीतून व्याख्याने दिली. त्यातूनच त्यांचा (१९६०) 'रिलीजन ॲण्ड मायथॉलॉजी ऑफ द ब्राह्मण' हा ग्रंथ तयार झाला. अनुबंधाज् ऑफ पाणिनी (१९७६) हे ग्रंथ त्यांच्या व्याकरण क्षेत्रातील योगदानाचे द्योतक आहेत.

प्रा. डॉ. बा. व. पळसुले यांच्या सहकार्याने त्यांनी संपादित केलेला 'महाभाष्या' 'आह्निक ४' (पुणे १९८९) हा ग्रंथही त्यांचे संस्कृतमधील व्याकरणाच्या क्षेत्रातील योगदान म्हणून उल्लेखनीय आहे.

विविध नियतकालिकांमधून त्यांनी अनेक शोधनिबंध लिहिले. अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेमध्ये ते नेहमी उपस्थित राहून निबंधवाचन करीत. युनिव्हर्सल सुत्राज् : इनसायक्लोपिडिया डिक्शनरी (१९७१), भारतीय विद्याभवनातर्फे प्रसिद्ध झालेल्या द हिस्ट्री ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पिपल (भाग ३,४), मराठी तत्वज्ञानकोश, धर्मकोश यासारख्या ग्रंथांमध्येही त्यांचे लेखन समाविष्ट आहे. ओरिएंटल थेअरी आणि इंडियन ॲन्थ्रोलॉजी (भाग ३) या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी काही वर्षे केले.

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेमध्ये त्यांनी अभिजात संस्कृत (१९५६) आणि वेद (१९७६) या विभागांमध्ये अध्यक्षपद भूषविले होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातले ते आजीव सदस्य होते. त्या संस्थेच्या नियामक मंडळात (१९६५-१९६९) आणि कार्यकारी मंडळामध्येही (१९६७-१९७६) त्यांनी कार्य केले.

१९६४ मध्ये पुणे विद्यापीठात संस्कृत-प्रगत-अध्ययन केंद्राची स्थापना झाली. त्यामध्ये १९६४ ते १९६९ या वर्षांत ते प्रोफेसर या पदावर कार्य करीत होते. त्या काळात त्यांनी काही विद्यार्थ्यांना पीएच. डी. साठी मार्गदर्शनही केले. नंतर तीन वर्षे डेक्कन कॉलेजमधील संस्कृत कोश विभागात संपादक म्हणून आणि नंतर भांडारकर संस्थेमध्ये संशोधन प्राध्यापक म्हणून कार्यमग्न होते.

प्रा. डॉ. देवस्थळी दीर्घोद्योगी, परिश्रमी, व्यासंगी, मितभाषी, सरळमार्गी, अत्यंत सज्जन असे विद्वान होते. नाशिक या नगराच्या आणि एच. पी. टी. महाविद्यालयाच्या इतिहासामध्ये त्यांचे नाव अत्यंत आदरपूर्वक घेतले जाईल यात शंका नाही.



# प्रा. म. वि. गोविलकर : मूर्तिमंत सात्विकता

**सौ. रजनी साकुरीकर**

एच. पी. टी. कॉलेज चे नाव कुणी काढले की मनात नकळत रम्य स्मृतींची आवर्तने सुरू होतात. माझ्यासाठी एच. पी. टी. कॉलेज फक्त एक शिक्षण संस्था नव्हती तर ते एक संस्कारांचे विद्यापीठ होते.

मी एच. पी. टी कॉलेज मध्ये प्रवेश घेतला तेव्हा प्रा. गोविलकर, प्रा. चिटको, प्रा. राजगुरू, प्रा. दातार, प्रा. पंडित, प्रा. साळुंके असे आपापल्या विषयातील दिग्गज प्राध्यापक होते. एकीकडे मी दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये नोकरी करत होते आणि त्याच बरोबर शिकत होते. तो माझ्या आयुष्यातील संमिश्र काळ होता. नोकरीच्या ठिकाणी मी शिक्षिकेच्या भूमिकेत होते आणि कॉलेजमध्ये विद्यार्थिनीच्या भूमिकेत होते.

मला पूर्वीपासूनच राष्ट्रभाषा हिंदी अत्यंत प्रिय होती आणि म्हणूनच मी हिंदी हा विषय स्पेशलला घेतला होता. प्रा. गोविलकर सर आणि प्रा. चिटको मॅडम मला शिकवायला होत्या. दोघेही आपल्या वेगळ्या शैलीत शिकवायचे. त्या दोघांचे भाषा प्रभुत्व पाहून मी थक्क होऊन जायचे. त्या काळात विद्यार्थी संख्या अगदी मर्यादित असायची. बी. ए. हिंदीला आम्ही १० विद्यार्थी होतो, त्यातही ४ विद्यार्थिनी होतो. प्रा. गोविलकर सर आपल्या प्रवाही व्याख्यानात अस्खलित हिंदीत खूपच सुंदर शिकवायचे. आम्हाला संदर्भ ग्रंथांची यादी द्यायचे. ग्रंथालयात कोणत्या पुस्तकात कोणते संदर्भ कसे सापडतील हे सविस्तर सांगायचे, त्यामुळे अभ्यासाचे कधी ओझे झाले नाही.

सरांचे व्याख्यान ऐकतच राहावेसे वाटायचे. पण माझी अडचण अशी होती की, माझ्या नोकरीच्या ठिकाणी जाणारी बस सव्वा दहाला असायची, सव्वा दहा वाजेनंतर बस नसायची आणि सरांचे व्याख्यान साडे दहापर्यंत असायचे.

सरांचे व्याख्यान संपण्यापूर्वी १५ मिनिटे वर्गातून उठून जाणे मला प्रशस्त वाटत नसायचे; पण पूर्ण वेळ व्याख्यान ऐकले तर बस निघून जायची आणि माझी गैरसोय व्हायची. शेवटी एक दिवस धीर धरून मी सरांना माझी अडचण

सांगितली. सरांनी मोकळ्या मनाने मला लवकर जाण्याची परवानगी दिली. सरांच्या मनाचा हा मोठेपणा, विद्यार्थ्यांना समजून घेण्याची वृत्ती, साधी राहणी, हिंदी साहित्याचा व्यासंग यामुळे आम्ही सगळेच विद्यार्थी नेहमीच प्रभावित व्हायचो. आमच्या सर्व शंकांचे ते नेहमीच सोप्या शब्दांत निरसन करायचे.

त्यामुळे मला नेहमी वाटायचे प्रा. गोविलकर सर म्हणजे मूर्तिमंत सात्विकता! शिस्तप्रिय असूनही त्यांच्या वागण्यात रुक्षता नव्हती. विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या मनात कायम आपुलकी असायची.

१९७५ मध्ये हिंदी विषय घेऊन मी बी. ए. ची पदवी मिळवली. त्यानंतर एच. पी. टी. कॉलेजशी फारसा संपर्क राहिला नाही. माझे कॉलेज आता शताब्दी महोत्सव साजरा करत आहे याचा आनंद मोठा आहे. या लेखाच्या निमित्ताने माझ्या जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला. गुरुवर्य प्रा. गोविलकर सरांना आदरांजली! ◆◆

**आपला देश शिक्षणाच्या बाबतीत इतका मागासलेला आहे की, आपण केवळ पैशांसाठी अडून बसलो तर, या पिढीत तरी आपल्याला सर्वांना शिक्षण देण्याचे आपले कर्तव्य करता येणार नाही. त्यामुळे टीकेचा धोका पत्करूनही, मी हे ठामपणे म्हणतो की, शिक्षण हे स्वावलंबी असले पाहिजे. हे शिक्षण म्हणजे, मुलामधील किंवा प्रौढांमधील सर्व क्षमतांचा- शरीर, मन आणि आत्मा- यांचा सर्वांगीण विकास होय. साक्षरता शिक्षणाचा शेवट नव्हे, आणि सुरुवातही नाही. ते स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाच्या अनेक साधनांपैकी एक साधन आहे. त्यामुळे साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे.**

**- महात्मा गांधी, ३१ जुलै १९३७,**
**प्रा. रमेश पानसे यांच्या 'नयी तालीम- गांधी प्रणीत शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास', या पुस्तकातून.**

**शिक्षणाचा उद्देश केवळ पारंपरिक व पुस्तकी शिक्षण देणे हा असू नये. पांडित्य व घोकमपट्टी करणारे शिक्षण आम्हांस नको, तर त्यास हस्तव्यवसायाची व कृतीची जोड देणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हे सर्वांगीण हवे. सूत काढणे, सुतारकाम, विणकाम, गुरेढोरे राखणे व त्यांची निगा घेणे, बांधकाम हे विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे. श्रमाचे महत्त्व त्यांना पटवून दिले पाहिजे. शाळा स्वच्छ ठेवणे, भोवताली झाडे लावणे, पोहता येणे, खेळामध्ये सर्वोत्तम गती असणे इत्यादी सर्व विद्यार्थ्यांना शाळेत शिकविले पाहिजे. काळाची ती गरज आहे.**

**- प्राचार्य टी. ए. कुलकर्णी.**



# प्रा. वि. बा. आंबेकर

**श्रीमती मुक्ता टिळक**



विष्णू बापूजी आंबेकर २७ वर्षे हं. प्रा. ठा. महाविद्यालयात मराठी विषयाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. त्या पूर्वी ते पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल आणि मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षक होते. वाडिया कॉलेजमध्ये इंग्लिशचे ट्यूटर म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. मुंबईच्या खालसा कॉलेजमध्ये ही ते मराठीचे प्रमुख प्राध्यापक होते. हं. प्रा. ठा. मध्ये जून १९४१ ते नोव्हेंबर १९६८ प्रा. आंबेकर कार्यरत होते. पी. एच. डी. चे मार्गदर्शक म्हणून पुणे विद्यापीठाकडून त्यांना मान्यता मिळाली होती. नाशिकच्या मराठा कॉलेजच्या सायंकालीन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी सूत्रे सांभाळली. ही त्यांची सेवा अखेरची ठरली. प्रा. आंबेकर नाशिकात 'अण्णा' म्हणून ओळखले जात. त्यांचा जन्म वाई येथे १६ नोव्हेंबर १९०८ रोजी झाला. वडील बापूजी मार्तंड आंबेकर यांच्या विद्वत्तेचा वारसा अण्णांना लाभला होता. अण्णांचे शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज या नामवंत संस्थातून झाले. मॅट्रिकला इंग्लिश या विषयात पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक त्यांनी पटकावले. शिवाय कॉलेजमध्ये लॉजिक, मराठी आणि इंग्लिश विषयात उच्चांक मिळविले. याच काळात इतिहासाचार्य राजवाडे (प्रा. वि. का. राजवाडे) यांच्याकडे 'रीडर' म्हणून त्यांनी निर्वेतन काम केले. तसेच प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्याकडे पेशवे दप्तराच्या अभ्यासासाठी मदतनीस म्हणून काम केले.

अण्णांचा अनेक सामाजिक संस्थांशी संबंध होता. नाशिकच्या 'लोकहितवादी मंडळा'चे ते संस्थापक सदस्य होते. पुण्याच्या 'मराठी साहित्य परिषदे'चे ते मार्गदर्शक होते.

अण्णा हाडाचे शिक्षक होते. अध्यापनाची हातोटी त्यांना गवसली होती. चालता बोलता ज्ञानकोश असलेले अण्णा विद्यार्थी प्रिय होते. विषयाचा सखोल व्यासंग, इतिहास किंवा

इंग्लिश संस्कृतातील साम्य असलेले संदर्भ, नवे अर्थ व खुलासा, खुसखुशीत भाषा शैली, विवेचनात सहज सुलभता यामुळे विद्यार्थ्यांची मंत्रमुग्ध गर्दी त्यांच्या वर्गात सदैव असे. विद्यार्थ्यांच्या प्रश्न- शंकांचे ते समर्पक विवेचन करीत. आपल्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक असावा यावर त्यांचा कटाक्ष असे. ते स्वतः अभ्यासू होते. म्हणूनच त्यांची व्याख्याने श्रवणीय असत. त्यांना मार्मिकतेची झालर असे. वेगवान बोलणे, विषयानुरूप उदाहरणे- आख्यायिका, शिवाय साहित्य कलेचे विविध लोक- संस्कृतीतील उल्लेख या वैशिष्ट्यांमुळे शेकडो श्रोते सहज एका जागी खिळून राहत. प्रत्येकाला ते फक्त आपल्याशीच बोलत आहेत असे वाटे. विद्वत्ता, पांडित्य आणि वक्तृत्व हा त्यांचा जणू स्वभाव धर्मच होता.

त्यांचे विद्यार्थी कधीच विन्मुख जात नसत. मणक्याच्या दुखण्याने, 'प्लास्टर मध्येच झोपून राहा.' असा सल्ला डॉक्टरांनी अण्णांना दिला होता, तेव्हा. आणि पुढे एकदा छोट्या शस्त्रक्रियेनंतर त्यांना 'उठून बसायचे नाही' अशी ताकीद होती. त्यावेळीही अण्णांनी वर्ग आपल्या घरीच भरविला होता. अगदी अखेरच्या दिवसापर्यंत त्यांनी पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.

मुंबईला नाट्यशिक्षण वर्गापुढे होणारी त्यांची रंगभूमीच्या इतिहासावरची किंवा साहित्य संघातर्फे आयोजित होणारी व्याख्याने असायची, विविध प्रकारची उद्बोधक माहिती असे. ती ही विशिष्ट शैलीत. वेळेचे भान तर कोणालाच रहात नसे. ज्या कालखंडावर ते बोलत तो कालखंड श्रोत्यांच्या डोळ्यापुढे साक्षात उभा राही. अमेरिकन दूरचित्रवाणी माहिती विभागातर्फे झालेली त्यांची दोन व्याख्याने म्हणजे थोडक्यात पण जास्तीत जास्त माहितीने परिपूर्ण आणि परदेशी श्रोत्यांना आकर्षक वाटतील अशा भाषणाचा उत्कृष्ट नमुना होय.

पुणे विद्यापीठाने हरि नारायण आपटे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त १९६४/६५ मध्ये व्याख्यानमाला आयोजित केली होती. अण्णांची तीन अभ्यासपूर्ण व्याख्याने विशेष गाजली. एका विशिष्ट जीवन दृष्टिकोनातून अण्णांनी विचार मांडले होते.

महाराष्ट्र शासनातर्फे नाट्य शिबिरे भरत असत. त्यात १९६३ ते १९६५ पर्यंत अण्णांची व्याख्याने झाली. बालगंधर्व त्यांना विशेष प्रिय होते. नाट्य आणि संगीत, किंबहुना किर्लोस्कर-खाडिलकर पिढीची संगीत नाटके, बालगंधर्वांच्या तत्कालीन भूमिका हा अण्णांचा बोलण्याचा आवडता विषय! नाट्य आणि गायन शास्त्राचे ते दर्दी होते.

आजच्या संगीत नाटकाचे स्वरूप, त्यातील उणिवा, चांगलेपणा यांची जुन्या नाटकाशी तुलना यावर बोलताना ते रंगून जात. नाट्यवेड्या मराठी जनमानसात अण्णांची व्याख्याने आणि लेख फार लोकप्रिय ठरले. जुन्या नटांचे परिश्रम म्हणजे तपश्चर्याच! याची ते वाहवा करीत. लाऊड स्पीकर नको. आवाज कमावलेला हवा तरच तो अलंकृत असतो. असे संवाद आकर्षक-मनोवेधक होतात. यासाठी स्वरसाधना आवश्यक असते, हे त्यांचे मत. आवाजातील चढ-उतार, हेलकावे-कंप, विविध भावना वगैरेंचे ते प्रात्यक्षिक दाखवीत. 'स्वरांची फेक जमली तरच अगदी शेवटच्या श्रोत्यां- प्रेक्षकांपर्यंत आवाज सहज पोहोचतो. अगदी स्वाभाविक रीतीने शब्दोच्चार झाला तर

स्वरयंत्रावर ताण पडत नाही. लेखकाचा आशय सर्वांपर्यंत पोहोचतो.' असा त्यांचा अभ्यास व निरीक्षण होते. संगीत नाटकांवर झालेल्या टीकेला ते आपल्या व्याख्यान- लेखातून प्रत्युत्तरे देत असत.

हं. प्रा. ठा. मध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांची नाटके होत. 'नाटकात स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या', यावर अण्णांचा भर असे. म्हणून विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या रंगमंचावर अभिनय करायला त्यांनी प्रवृत्त केले. यासाठी त्यांनी पालकांच्या अनेक वेळा भेटी घेऊन त्यांची परवानगी मिळविली. हे काही सहजासहजी झाले नाही. मात्र यासाठी अण्णांना प्रिन्सिपल काकासाहेब कुलकर्णी आणि मामासाहेब पाटणकर यांचा पाठिंबा होता. हा नाट्य प्रयोग पाहण्यासाठी उत्सुक प्रेक्षकवर्ग मोठ्या संख्येने हजर होता. अण्णांनी आपल्या सुधारक विचारसरणीमुळे विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांना प्रवृत्त केले. अशा मिश्र भूमिकांची नाटके पाहण्याची दृष्टी नाशिककरांना अण्णांनी दिली.

त्यांच्यातला 'सुधारक' उदारमतवादी होता. जुनाट-जीर्ण विचार दूर करून नव्या- संयुक्तिक विचारांची मांडणी करणे, अनेकांचा भोंदूपणा समोर आणणे हे काम सर्वांना साधते असे नाही. चुकीची विधाने खोडून काढणारी अण्णांची परखड पत्रे अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध होत. व्याख्यानातून ते रुढींचे खंडन करीत. भरभक्कम आधाराशिवाय ते कधीच बोलत- लिहीत नसत. त्यांची स्मरणशक्ती विलक्षण होती. वक्रोक्ती, व्याजोक्ती, व्यंग्योक्तीचा ते पुरेपूर वापर करीत. कधी कोपरखळ्या मारतील याचा पत्ताही लागत नसे.

स्त्री शिक्षण, स्त्री दाक्षिण्य, स्त्रियांचे अर्थार्जन याविषयी त्यांचे विचार पुरोगामी होते. सौ. प्रभावती आंबेकर-अक्का प्रौढवयात शिकल्या. एक आदर्श शिक्षिका म्हणून त्या नाशकात परिचित होत्या.

अण्णांचे बालपण पुण्यात गेले. वडिलांचा अनेक विद्वानांशी परिचय. त्यांचे घरी येणे-जाणे, चर्चा-वादविवाद हे त्यांनी जवळून अनुभवले. नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंच्या 'भारत सेवक समाजा'च्या वातावरणात अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला. विचारांचे संस्कार झाले. विद्याव्यासंग, समाजजीवनाचे सखोल निरीक्षण-अभ्यास यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात स्पष्ट दिसते. अचूक माहिती देत विषय खुलविणे हे त्यांचे वैशिष्ट्य! त्यांचे लिखाण एकटाकी, मराठी - इंग्लिश अगदी झोकदार. झरझर लिहायचे असले की मोडी लिपीत ही ते लिहीत.

धुळ्यातील २८ व्या साहित्य संमेलनानिमित्त १९१४-१९४४ या कालखंडातील मराठी साहित्याचे समालोचन करणारा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यात 'लघुनिबंध' या वाङ्मय प्रकाराचा आढावा घेणारा अण्णांचा लेख मोठा उद्बोधक ठरला. 'वाङ्मय म्हणून विचार करताना ज्या जीवनाशी ते संबंध्द आहे ते जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे', हा दृष्टिकोन अण्णांनी सार्वजनिक वाचनालय नाशिकच्या शतकोत्सवातील स्मरणिकेमध्ये मांडला.

अण्णांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'हरिभाऊ - काळ आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. यात अण्णांनी ह. ना. आपटे यांच्याविषयी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचे संकलन आहे. हरिभाऊंच्या मृत्यूनंतर त्यांच्या

पत्नी रमाबाईंनी नुकतेच महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेल्या आंबेकरांना पत्र लिहून 'हरिभाऊंवर त्यांनी ग्रंथ लिहावा' अशी विनंती केली. त्यावरून अण्णांच्या व्यासंगाबद्दल, लेखन कर्तृत्वाबद्दल आणि हरिभाऊंविषयी त्यांना असलेल्या आदरयुक्त प्रेमाबद्दल रमाबाईंनाही किती विश्वास होता हे लक्षात येते. अण्णांनी लहानपणी हरिभाऊंना जवळून पाहिले. त्यांच्या लेखनाचे, कर्तृत्वाचे संस्कारही त्यांच्यावर झाले. अण्णांच्या वडिलांचे हरिभाऊ जवळचे स्नेही होते. सहाजिकच अण्णांना हरिभाऊ सर्वस्वी समजावून घेता आले. यामुळे या पुस्तकाचे मोल मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने फार मोठे आहे.

१९४२ मध्ये सांगली येथे झालेल्या नाट्यमहोत्सवानिमित्त अण्णांनी जे लेख लिहिले ते फार वाखाणले गेले. अण्णांनी कधीही आपल्या लिखाणाची हस्तलिखिते, प्रति किंवा यादी ठेवली नाही. त्यांचे कितीतरी लेख काळाच्या ओघात नाहीसे झाले. मला यावरून रेव्ह. ना. वा. टिळकांचे, माझ्या पणजोबांचे स्मरण होते. ते आपल्या कौटुंबिक - सामुदायिक उपासनेमध्ये टाळ, चिपळ्या घेऊन अभंग - ओव्या गात. ख्रिस्ताची प्रार्थना करताना, कीर्तने करताना अनेक उत्स्फूर्तपणे अभंग ओव्या गायल्या जात. नंतर त्यांना त्या आठवतही नसत. त्या थेट परमेश्वराचरणीच विलीन होत.

अण्णांच्या लेखनाचे आणखी एक अंग म्हणजे समीक्षा. ते समतोल साधणारे टीकाकार होते. आपले प्रामाणिक मत ते आवेशाने मांडत. त्यात संदिग्धता नसे. प्रत्येक साहित्यिकाचे गुण-वृत्ती पारखणे आणि नेमक्या शब्दात त्यावर टिप्पणी करणे हा टीकाकाराचा दुर्मीळ गुण अण्णांमध्ये दिसून येतो. नव साहित्यातील विफलपणावर त्यांचा कटाक्ष होता त्यांच्या मते, 'ही विफलता पश्चिमेकडून नकलून आणलेली, उसनी घेतलेली आणि म्हणूनच वरवरची-उथळ आहे. खरा अस्वस्थ युवक इतका निरोपयोगी, भकास राहणारच नाही. तो विधेयकाचा ध्यास घेईल. ' असे त्यांचे मत होते. अण्णांची वृत्ती नवीनाचे खुले स्वागत करणारी होती.

मराठी, इंग्लिश, संस्कृत साहित्याचा मूलगामी अभ्यास, अनेक अस्सल दस्तऐवज, कागदपत्रे, हस्तलिखिते, मूळ दुर्मीळ ग्रंथ यांच्या अध्ययन -परीक्षणामुळे अण्णांची विश्लेषण करण्याची हातोटी विलक्षण होती. त्यांना तारीख-वार, सनावळी-वंशावळी मुखोद्गत होत्या. हे सारे त्यांच्या समीक्षेतून स्पष्ट दिसून येई. मात्र त्यांची लिखित समीक्षा महासागरावर दिसणाऱ्या हिमनगाच्या शिखराप्रमाणेच राहिली. हिमनग सागरात किती खोल आणि किती प्रचंड आहे याची कल्पना करता येत नसते. तेच अण्णांच्या लिखित समीक्षेचे! ते म्हणत,' समोर बसून बोलण्याची मला जास्त सवय आहे, लिहिण्याची कमी!'

अण्णांनी संपादनाचे कामही केले. १९३०-३२ मध्ये रत्नाकर, १९४०-४१ मध्ये आशा साप्ताहिक आणि ज्योत्स्ना. 'ज्ञानप्रकाशा'च्या संपादन मंडळात असताना 'काव्य शास्त्र विनोद' हा विभाग ज्या कुशलतेने त्यांनी सांभाळला त्याचे दर्शन 'तरंग- तुषार' मधून होते. हा अण्णांच्या अनेक लेखांचा संग्रह त्यांच्या शष्ठ्यब्दपूर्तीनिमित्ताने प्रकाशित झाला होता.

हं. प्रा. ठा. चे नियतकालिक दरवर्षी प्रकाशित व्हायचे. माझे आजोबा ॲड. देवदत्त टिळक यांच्या 'नागरिक छापखाना' येथे त्याची छपाई होत असे. या नियतकालिकाचे 'वैदेही'

हे नामकरण अण्णांनी केले.

अण्णांच्या बाबतीत मला 'सव्यसाची' हा शब्द अपुरा वाटतो. विद्यार्थीप्रिय अध्यापक, अद्वितीय व्याख्याते, निष्णात पत्रकार, व्यासंगी-मार्मिक समीक्षक, विद्वान चिकित्सक, सर्वांगीण साहित्यिक, कुशल संपादक, सुधारणावादी, नाट्य दिग्दर्शक, संगीताचे दर्दी आणि हो... क्रिकेटचेही जाणकार ही!

साधेपणा, सहृदयता, विद्या आणि विद्यार्थ्यांबद्दल आत्मीयता, कर्तव्यनिष्ठा या त्यांच्या स्वभावविशेषांमुळे त्यांनी सर्वांची मने जिंकली. आपल्या विद्वत्तेचा ताठा त्यांनी कधीही मिरवला नाही. अशा या व्यक्तिमत्त्वाचा नाशिककरांनी मोठा नागरी सत्कार १७ नोव्हेंबर १९६८ रोजी केला आणि थोडेसे तरी ऋण फेडले.

मी अण्णांची विद्यार्थिनी नव्हते. ते सेवानिवृत्त झाले त्या वर्षी मी हं. प्रा. ठा. त प्रवेश घेतला. माझे वडील अशोक टिळक (अप्पा) अण्णांचे प्रिय विद्यार्थी-स्नेही. अप्पांकडून आणि इतर बऱ्याच जणांकडून मी अण्णांविषयी भरभरून बोलताना ऐकले आहे. त्यांचे शिकवणे, त्यांची ढब,आवाज, हावभाव, मुद्राभिनय, मिश्किल बोलणे सारे ऐकले आहे. अण्णांची इतरत्र होणारी व्याख्याने मी ऐकली, जरूर ऐकली.

अण्णा आमच्या 'शांतीसदन'पासून पाच मिनिटांच्या अंतरावर 'सरस्वती भुवन' मध्ये रहात असत. आंबेकर-टिळक कुटुंबाचा विशेष स्नेहभाव होता. आमची सतत ये-जा होई. अण्णा-अप्पांच्या साहित्यिक चर्चा, गप्पा, वादविवाद मी ऐकत असे. अण्णा-अक्कांचा स्नेह, जिव्हाळा मी अनुभवला आहे. एके दिवशी संध्याकाळी हत्तीखाना रोड (सध्याचा महात्मा गांधी रस्ता)वरून अण्णा घरी परतत होते, टांग्यातून. मी ही तिथेच होते. त्यांनी मला हात केला मीही हसून प्रतिसाद दिला. त्या रात्री अक्कांच्या 'अशोकराव, अशोकराव' हाका ऐकू आल्या रस्त्यावरून.

'अण्णांना बरं नाही, लवकर चला!' ऐकताच अप्पा धावले. आई, मी ही पाठोपाठ गेलो. अण्णांच्या छातीत असह्य कळा येत होत्या... उपचारांना त्यांनी प्रतिसाद दिला नाही! तो दिवस होता २३ ऑगस्ट १९७१.

आजही, माझ्या डोळ्यासमोर हत्तीखाना रोड वरून, टांग्यातून घरी जाणारे मला हसून हात करणारे अण्णा दिसत राहतात!!

◆◆

**शिक्षणाने विद्यार्थ्यांमधे सामाजिक प्रेरणा जागृत केली पाहिजे. त्याचप्रमाणे दुसऱ्यांबरोबर सहकाराने काम करण्याची सवय व त्याकडे कल या गोष्टी निर्माण केल्या पाहिजेत.**

**- विनोबा भावे यांनी दिलेली 'नयी तालीमची बारा सूत्रे',**
**प्रा. रमेश पानसे यांच्या 'नयी तालीम- गांधी प्रणीत शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास', या पुस्तकातून**



# कर्तव्यपरायण, निःस्पृह प्राध्यापक गायधनी

**सौ. वसुधा भास्कर गिरधारी**

नासिकच्या संस्कृत क्षेत्रातील एक महत्त्वाचे नांव म्हणजे प्रा. डॉ. मोहिनीराज गंगाधर गायधनी. लहानपणापासून तैलबुद्धी असणारे मोहिनीराज सर, अर्थात् माझे वडील, पक्के नाशिककर!!! मार्च १९१९ मधे जन्म, त्याकाळच्या सातवीच्या परीक्षेला नासिक जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या आमच्या बाबांनी, एस. एस. सी. नंतर एच. पी. टी. महाविद्यालयात पदवीसाठी संस्कृत विषय निवडला. आपले पदवीचे अध्ययन पूर्ण केल्यावर, एल्.एल्.बी. चे शिक्षण पूर्ण करून, विधिज्ञ बनावे अशी त्यांची इच्छा होती; परंतु आपल्या घरच्यांच्या आग्रहाने त्यांनी कायद्याचे शिक्षण न घेतां, एम. ए. संस्कृत विषयाच्या वर्गांना प्रवेश घेतला. ते डॉ. गो. वि. देवस्थळींचे विद्यार्थी होते. आपले एम. ए. पूर्ण केल्यावर, त्यांनी प्रा. डॉ. देवस्थळींच्या मार्गदर्शनाखाली पी. एच.डी. करावयास प्रारंभ केला. संस्कृत नाटकातील उपमा यावर त्यांनी आंग्ल भाषेत अत्यंत अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केला.

आपले एम. ए. पूर्ण केल्यावर, त्यांनी रुंग्ठा विद्यालयात संस्कृत विषय शिकवायला सुरुवात केली. यानंतर त्यांनी श्रीरामपूरला तीन वर्षे अध्यापन केले. प्रा. राजदेरकर नासिकरोड महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नियुक्त झालेले असतांना, एच. पी. टी. महाविद्यालयात संस्कृत प्राध्यापकाची जागा रिक्त झाल्याने, आमचे बाबा नासिकला एच. पी. टी. महाविद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. बाबा संस्कृत आणि अर्धमागधी भाषांचे चांगले जाणकार होते. प्राचार्य ओक हे त्यावेळी संस्कृत विभागाचे प्रमुख आणि महाविद्यालयाचे प्राचार्य होते.

डॉ. देवस्थळी विद्यापीठातून निवृत्त होत असतांना, त्यांनी रिडरच्या पदासाठी आमच्या बाबांचे नांव सुचविले. परंतु आपल्या आईच्या इच्छेचा मान राखत, त्यांनी नासिकलाच राहण्याचा निर्णय घेतला आणि एच. पी. टी. महाविद्यालयातच आपल्या निवृत्तीपर्यंत ते कार्यरत राहिले. निवृत्ती नंतरही त्यांनी आपल्या अध्यापन कार्यास कधीही विराम दिला नाही.

त्यांचा व्यासंग कायम राहिला. पंचवटीतील तात्याशास्त्रींकडे ते आपल्या अध्ययन कालापासून जात असत. शास्त्रींबरोबर अनेक विषयांवर ते चर्चा करत असत. नासिकमधील संस्कृत अध्ययन-अध्यापन परंपरेचा त्यांचा सखोल अभ्यास होता.

जैन साध्वींना ते संस्कृत आणि अर्धमागधी शिकवत असत. आयुर्वेद सेवा संघात संस्कृत शिकवत. ते ह्या सगळ्या गोष्टी विना वेतन करत असत. आपण महाविद्यालयातील कामासाठी वेतन घेतो, तेव्हा आपण आपल्या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर ठिकाणांहून वेतन घेणे, त्यांना पटत नसे. त्यामुळे त्यांनी कधीही महाविद्यालया व्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणाहून शुल्क घेतले नाही. अध्यापनाच्या बरोबरच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली होती. देशस्थ यजुर्वेद संस्थेचे सलग दहा वर्षे ते अध्यक्ष होते. वणी येथील श्रीसप्तशृंगी देवी संस्थानचे ते विश्वस्त म्हणून कार्य पहात असत. आपल्या स्वखर्चाने ते प्रवास करत. ते देवीची मनोभावे सेवा करत.

बाबांचा प्रत्येक क्षण हा अभ्यासात व्यतीत होत असे. आमचे काका गेल्यानंतर कुटुंबाची पूर्ण जबाबदारी बाबा आणि आमच्या दुसऱ्या काकांनी स्वीकारली. वारलेल्या काकांच्या सर्व मुलांना चांगले शिक्षण देऊन, त्यांच्या पायांवर उभे केले. आपली स्वप्ने पूर्ण करत असतांना, आपल्या आजूबाजूच्या आपल्या माणसांची काळजीही घ्यायची असते, त्यांची स्वप्नेही पूर्ण करायला त्यांना सहकार्य करायचे असते, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायचे असते, हे संस्कार आमच्या बाबांनी त्यांच्या वर्तवणुकीतून आमच्यावर केले. बाबांचा सहवास हा आम्हाला खूप काही शिकविणारा होता, घडविणारा होता. मार्च २०११मध्ये इहलोकीची यात्रा त्यांनी संपवली आणि आपला परलोकीचा प्रवास सुरू केला. त्यांच्या स्मृती आजही तितकच्याच बोलक्या आणि प्रेरक आहेत.

**सद्गुरुवांचोनी त्राता त्रिभुवनी । नाही हे पुराणी वेदी वाक्य ।।१।।**
**गोविंदाहुनीही वरिष्ठ आचार्य । धरावे ते पाय त्यांचे आधी ।।२।।**
**आळंदीवल्लभ स्वामीकृपा मोठी । तेणे पोटीपाठी नारायण ।।३।।**

**विद्वत्त्वं दक्षता शीलं संक्रान्तिरनुशीलनम्।**
**शिक्षकस्य गुणाः सप्त सचेतस्त्वं प्रसन्नता।।**

**प्रेरकः सूचकश्चैव वाचको दर्शकस्तथा।**
**शिक्षको बोधकश्चैव षडेते गुरवः स्मृताः।।**



# डॉ. चंद्रकांत वर्तक

**डॉ. वृंदा भार्गवे**

डॉक्टर चंद्रकांत वर्तक यांनी रूढ अर्थाने मला कधीही शिकवलं नाही. ते एचपीटी महाविद्यालयात प्राध्यापक असताना मी ठाण्याच्या महाविद्यालयात शिकत होते. एम ए ला असताना सरांचं भाषण एका सेमिनारमध्ये ऐकले तेंव्हा वाटले हे सर जर आपल्याला शिकवायला असते तर ..

त्यांची आणि माझी, एक शिक्षक आणि विद्यार्थिनी म्हणून भेट झाली.. ते त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी पीएचडी करायला लागले तेव्हा.. आपला शेजार कोण असावा .. आपण कोणाचा मुलगा किंवा मुलगी म्हणून जन्माला यावं हे जसं आपल्या हातात नसतं, तसं आपल्याला शिकवणारा घडवणारा शिक्षक कोण असेल हे देखील आपल्या हातात नसतं.. ज्यांना, विद्वान व्यासंगी आणि शिस्तशीर असा गुरु लाभतो त्या विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळून निघाल्याशिवाय राहत नाही.. डॉक्टर चंद्रकांत वर्तक हे मला भेटलेले असे प्राध्यापक.. त्यांच्याजवळची विद्वत्ता, अचूक संदर्भाचा आणि शब्दांचा वापर आपल्या विद्यार्थ्यांनी केलाच पाहिजे हा धाक पुढे सवयीत कसा विरघळून गेला ते मला समजलं नाही.. वर्तक सर हे माझ्या आईशी अधिक परिचित .. त्यामुळेच आपल्या मुलीने पदव्युत्तर शिक्षणानंतर, एमफील झाल्यानंतर सरांच्या हाताखाली मार्गदर्शन करावं असं तिला वाटणं साहजिक होतं.. सरांचे विद्यापीठ एस.एन.डी.टी.. माझे शिक्षण मुंबई आणि पुणे विद्यापीठातून झालेलं. पुढे मी एसएनडीटी विद्यापीठाच्या एस. एम. आर. के. महिला महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करू लागले आणि बरेचदा एसएनडीटी विद्यापीठात जाण्याचा योग आला.. त्यावेळेस तेथील प्राध्यापक नि विद्यार्थ्यांना मुखोद्गत नाव होतं डॉक्टर चंद्रकांत वर्तक..

निवृत्ती नंतर सरांचं वास्तव्य नाशिकला. पण त्यांचा सर्वांनाच दरारा वाटायचा. ते संवाद साधत .. पण कोणाशी ..तर वाचणाऱ्याशीच, साहित्याचं आकलन असणाऱ्याशी, शब्दांचे महत्त्व जाणणाऱ्यांशी, प्रतिभेचे देण

टिकवणाऱ्याशी, प्रज्ञेशी व्यभिचार करणाऱ्या कोणाही व्यक्तीला ते थारा देत नसत. ते माणसं जोखत. बुद्धी तपासत .त्याच्या वा तिच्या सवंग अशा अभिप्रायाला मात्र अजिबात दाद देत नसत. मराठीचा प्राध्यापक असला नि इंग्रजी भाषेतलं त्याने काही वाचलं नसेल, त्याला संस्कृतची जाण नसेल तर तो त्यांच्यासाठी मराठीचा प्राध्यापक होऊच शकत नव्हता. मराठीचा प्राध्यापक त्यांच्यासाठी लिटमस पेपर असायचा.. या ना त्या रसायनात टाकून त्याचा रंग बदलतो की नाही हे ते पाहत.. आणि ते रसायन होतं असंख्य प्रश्नांचं.. त्या प्रश्नांचा मारा ते नवोदित प्राध्यापकावर करत.. कधी कधी मी त्यांना म्हणे, की सर यामुळे तो नवोदित प्राध्यापक बावरून जातो ..तुमच्याशी बोलायचं म्हटलं की त्याला घाबरायलाच होतं ..पण यावर त्यांचे म्हणण.. प्राध्यापक म्हणून त्याने स्वतः ही करिअर निवडली आहे.. तेव्हा त्याला किमान वाचता तर आलं पाहिजे.. वाचलेलं लक्षात तर राहिलं पाहिजे.. एखाद्या लेखकाचं टोपण नाव त्याला माहिती नसेल.. तर वाचन काय ते कामाचं.. बरेचदा ते स्वतः च्या खिशातले पेन काढत.. एका चतकोर कागदावरती दोन-चार शब्द लिहीत ..ते शुध्द करून समोरच्याकडून परत लिहून घेत..

ते अभिमानाने सांगत की मी न.श. र. फाटकांचा शिष्य.. छबीलदास आणि पुढे रुईयात ते शिकत होते .. प्रतिकूल परिस्थिती त्यामुळे लवकर नोकरी करावी लागली.. स. गं. मालशे यांचे मार्गदर्शन.. . या दिग्गजांच्या सहवासात राहिल्यामुळेच प्रत्येक प्रश्नाचा मूलभूत शोध घेण्याचा एक सराव... मौज, सत्यकथेचे भवताल ..मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातल्या दुर्मिळ ग्रंथांचे सानिध्य.. चर्चा आणि गप्पाष्टकांसाठी दादर ..पुढे त्यांचं बोरवलीचे घर आणि कायमसाठी वास्तव्याला आल्यानंतर देवळालीतल्या प्राजक्त बंगल्यातला त्यांचा वावर.

त्यांच्याकडे सर्व साहित्यिकांचे येणं जाणं असायचं.. वामनराव चोरघड्यांपासून के ज पुरोहित असतील, विद्याधर पुंडलिक ते विजय तेंडुलकर, गंगाधर गाडगीळ ते मीना प्रभू, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, विंदा.. कधी ना कधी अगत्याने आलेले श्री पु भागवत, राम पटवर्धन, रामदास भटकळ, दिलीप माजगावकर, भानू काळे सगळेच त्यांचे स्नेही.. नाशिक रोड स्टेशनला तेव्हा ही मंडळी उतरायची की त्यांचा पहिला पाडाव या प्राजक्त बंगल्यामध्ये असायचा..

त्यांच्या घरी पुस्तकांच्या भिंती आणि अव्याहत लिहीणारा एक व्रतस्थ अभ्यासक.. आपली पीएचडीची विद्यार्थिनी बऱ्यापैकी लिहिते,वाचते हे समजल्यावर त्यांच्या घरात ,अगदी स्वयंपाकघरात मला कधीही केंव्हाही प्रवेश मिळू लागला.. प्राध्यापकाकडे वक्तृत्वाची शैली असली पाहिजे. श्रोतृवर्गासमोर बोलायचं असेल तर एक मांडणी करायला पाहिजे आणि ती मांडणी अभ्यासपूर्ण असायला पाहिजे.. आपल्या वागण्या बोलण्यात उथळपणा नको ..समारंभ छोटा असेल, मोठा असेल तर त्याची प्रचंड तयारी करायला हवी..हे त्यांच्याकडून मी शिकले..

चर्चासत्राच्या एखाद्या संयोजकाला पत्र लिहून त्याचं कुठे चुकलं.. ते मुद्देसूदपणे लिहिणाऱ्या वर्तक सरांनी असंख्य पुस्तक परीक्षण लिहिली.. नाशिक ते मुंबईचा प्रवास

पंचवटी एक्सप्रेसने ते करत . त्या प्रवासात पुस्तकांचा फडशा ते पाडत.त्यांचा ट्रेनचा प्रवास थांबला. ते निवृत्त झाले. आणि देशोदेशीचा त्यांचा प्रवास सुरू झाला.

'वळणावरच साकव'.'मावंदे' यासारखे ललित गद्य त्यांनी लिहिलं.. प्रदेश चिकित्सा हे एक वेगळंच पर्व त्यांना उलगडलेलं होतं.. गंगाधर गाडगीळ यांच्या प्रवास वर्णनपर लेखांना त्यांनी ६९ पृष्ठांची प्रस्तावना लिहिली.. हा मला वाटतं अभ्यासपूर्ण प्रस्तावना कशी लिहावी याचा तो मानदंड होता.. निवृत्त झाल्यानंतर सर, अंदमान, अमेरिका, मॉरिशस, नेपाळ, भूतान , व्हिएतनाम, इंडोनेशिया, बाली, कंबोडिया ,नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, फिंनलँड ,रशिया असंख्य ठिकाणी गेले.. नवा प्रदेश, नवी संस्कृती यापेक्षा त्यांना माणसांशी बोलायला खूप आवडायचं .सरांची स्मरणशक्ती फोटोजनिक .. प्रवासातील स्थळं, व्यक्तींचे नामोल्लेख त्यांच्या व्याख्यानात असायचे...

प्रवास वर्णनांबरोबर सरांनी कथाही लिहिल्या. त्यांच्या कथासंग्रहाचा गुजराती भाषेत अनुवाद देखील झाला. शब्द हे त्यांच्या जगण्याचं माध्यम .फोनवरही ते बोलायचे, तेव्हा ते एखाद्या पुस्तकाबद्दलच रसाळ विवेचन किंवा थेट टीका.. त्यांच्या दिनक्रमात सूर्यनमस्कार, प्राणायाम, उत्तम सात्विक आहार, झोपाळ्यावर निसर्गाच्या सानिध्यात केलेलं वाचन ह्यावर भर. देवळाली सारख्या ठिकाणी राहताना आजूबाजूला कॉस्मोपॉलिटन लोक.. त्यांच्याशी ते सतत इंग्रजीतूनच बोलायचे.. जवळपास व्याख्यान असायची ती इंग्रजीतूनच ते करायचे.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या साहित्य भूषण परीक्षेसाठी सरांबरोबर काम करताना मला खूप शिकायला मिळालं. निव्वळ पुस्तकी असणारे तरुण.. त्यांची अलंकारिक भाषा त्यांना संत्रस्त करायची.. त्यांच्या संशोधकीय वृत्तीतून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी त्यांनी केलेले लेखन.. त्यांच्या बरोबरीने पुस्तक लिहिताना बरच शिकता आलं.. त्यांचे अनेक लेख ते मला वाचूनही दाखवायचे त्याबद्दल आम्ही चर्चा करायचो... विद्यार्थिनी म्हणून प्रथम कठोर शिस्तीने त्यांनी वागवले; पण हा कठोरपणा माझ्या आयुष्याला वाचनस्पर्श देऊन गेला. त्यांच्या घरातली सात-आठ हजाराच्या वर असलेली पुस्तकं, हस्तलिखित, फायली, नियतकालिक.. या सर्वाचं ते गेल्यानंतर वर्गीकरण करताना डोळ्यात पाणी आलं.. त्यांच्या वळणदार अक्षरात त्यांनीच वर्गीकरण केले होते.. मला कोणती पुस्तके, नियतकालिके द्यायचे हे देखील पक्के केलेले.. सर नाहीत पण तो ठेवा आजही माझ्याकडे आहे..!

**विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा**
**सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।**
**यशसि चाभिरतिर्व्यसनं श्रुतौ**
**प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ।।**



# प्रा. भा. शं. जोशी सर : एक जिंदादिल व्यक्तित्व

**डॉ. अशोक धुलधुले**

प्रा. भास्कर शंकर जोशी सर मेरे प्रिय सर थे । उनको अलग-अलग नामों से पुकारा और पहचाना जाता था। अंतरंग मित्र उन्हें 'भास्कर' नाम से पुकारा करते थे, तो सामान्य रूप में छात्र उन्हें जोशी सर कहा करते। उनके नाम का लघु रूप अधिक प्रचलित था- 'भाशं' सर जिसे कुछ छात्र 'भाषम्' के रूप में उच्चरित करते थे । कुछ प्राध्यापक उन्हें मजाक में 'भाषण' जोशी भी कहा करते जो उनके बोलने की आदत के कारण था। ये बात तो सही थी कि जोशी सर बोलने का कोई मौका नहीं छोड़ते थे और सर बोलते बहुत मीठा थे। कुछ लोगों का मानना था कि उन्हें डायबीटिज मीठा खाने के कारण नहीं तो मीठा बोलने के कारण हुई थी। बात तो मज़ाक में कही जाती थी, पर मुझे सच लगा करती थी। मैंने अपने जीवन में इससे पूर्व किसी शिक्षक को इतना मीठा बोलते नहीं सुना था। सर इतने खुशमिजाज़ थे कि उनके संपर्क में आनेवाला कोई भी व्यक्ति उन्हें सदैव याद रखता था। उनकी मज़ाक करने की आदत हमेशा छात्रों को उनके आसपास रहने के लिए मजबूर करती थी। उनसे मिलते ही लोगों के चेहरें पर खुशी की चमक आ जाती थी। उनकी लोकप्रियता इतनी थी कि अन्य विषयों के छात्र भी उनकी कक्षा में आकर उनके लेक्चर का आनंद उठाते थे। सभी विषयों के छात्र उनसे बात करते, आसपास के महाविद्यालयों के छात्र भी हमेशा उनसे आकर मिला करते थे। उनके पास हर प्रसंग के लिए एक चुटकुला, एक उदाहरण हमेशा रहता था। उसी प्रकार हर समस्या के लिए समाधान भी मौजूद होता था।

१९८५ के जून महिने में मैंने एच. पी. टी. आर्टस् अँड आर. वाय. के. सायन्स कॉलेज में एम. ए. हिंदी के लिए दाखिला लिया था। पहली मुलाकात में ही मैं जोशी सर का मुरीद हो गया था। मेरी बहनें भी इसी महाविद्यालय में पढ़ती थी और सर को जानती थी। बहनों के मुँह से भी मैं सर की तारीफ सुन चुका था। सर का अध्यापन का तरीका सबसे भिन्न था। अध्यापन की सामग्री के बीच से भी वह ऐसी बातें निकाल

लेते थे जो मार्मिक, उद्बोधक और मनोरंजक हुआ करती थी। मुझे आज भी याद है कि भाषाविज्ञान और हिंदी भाषा का इतिहास जैसे विषय को वह किस प्रकार आसान बना दिया करते थे । अनुवादविज्ञान को वह सरलतापूर्वक समझाते थे। अनेक उदाहरण देकर खूब हँसाते थे। जानबूझकर गलत अनुवाद का उदाहरण पेश करते तो कक्षा में ठहाके लगा करते थे। मराठी की एक कहावत गाढवाला गुळाची चव काय को उन्होंने गधे को क्या गुड़ का स्वाद इस प्रकार अनुदित कर दिया और बताया कि लोग किस प्रकार शब्दानुवाद के चक्कर में पड़कर इस प्रकार का घटिया अनुवाद करते हैं। सारी कक्षा में ठहाके लगे। फिर उन्होंने इस कहावत का भावानुवाद करते हुए हिंदी की समकक्ष कहावत को बताया जो, 'बंदर क्या जाने अदरख का स्वाद', इस प्रकार थी। फिर उन्होंने बताया कि अनुवाद कभी इसे भी गलत तरीके से अनुदित कर देता है- माकडाला काय माहित अदरकीची चव । एक बार उन्होंने मराठी भाषा के ज्ञानपीठ पुरस्कार विजेता श्री. वि. वा. शिरवाडकर 'कुसुमाग्रज' की एक कविता 'समिधा' का अनुवाद करने का एक प्रकल्प सभी छात्रों को दिया। मैं तब रेल्वे स्टेशन लहावित में रहा करता था। मैंने रात दो बजे तक जाग कर उस अनुवाद को पूरा किया और सवेरे ८ बजे उन्हें कक्षा में दिखाया । उस अनुवाद को देखकर वह इतने खुश हुए कि कक्षा में तो मुझे खूब सराहा और प्राध्यापक कक्ष में ले आए और वहाँ भी सभी प्राध्यापकों के सामने वह अनुवाद पढ़ा। सभी ने प्रशंसा की। मैं शरमा रहा था । वहाँ भी सराहना मिली। उन्होंने मेरे जल्द ही प्राध्यापक बनने का पुनरुच्चार किया । बहुत जल्द मैं उनका प्रिय छात्र बन गया था। सर मुझे पाँच बार कुसुमाग्रज जी से मिलवाने ले गए थे। कुसुमाग्रज जी का संबंध एच. पी. टी. महाविद्यालय से रहा था, अतः वे जोशी सर को बाकायदा 'भाशं' ही बुलाते थे। हर बार जोशी सर कुसुमाग्रज जी से मेरा परिचय करवाना नहीं भूलते थे। हमेशा सर को और मुझे कुसुमाग्रज जी अपने हाथों शरबत लाकर पिलाया करते थे। मैं गद्गद हो जाया करता था कि सर के कारण मुझे ज्ञानपीठ से सम्मानित इस महान कवि के हाथों शरबत का प्रसाद मिलता है। इस बात के लिए मैं जोशी सर का आजीवन ऋणी रहूँगा ।

सर के साथ रहना और उनकी बातें सुनना मुझे बहुत अच्छा लगता था। वह अध्ययन के प्रति मेरी रुचि बढ़ाने के लिए भी सहायक हुआ करता था । पाठ्यक्रमेतर कौन - सी पुस्तकें पढ़नी चाहिए इसका ज्ञान मुझे सर से मिला । अनुवाद के प्रति रुचि बढ़ाने में उपर्युक्त घटना सहायक रही। आगे जीवन में मैंने अनेक अनुवाद किए जिनमें से संत तुकाराम महाराज पर लिखे एक ग्रंथ का अनुवाद है जिसके कारण मुझे कालाराम मंदिर में काशी पीठ के शंकराचार्य और त्र्यंबकेश्वर मंदिर में डॉ. यू. म. पठाण सर के करकमलों से सम्मानित किया गया । वह ग्रंथ पूरे उत्तर भारत में पहुँच गया। यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ के विभिन्न पाठ्यक्रमों की लगभग ११ पुस्तकों का मैंने अनुवाद किया । मराठी की कईं कथाओं और कविताओं का अनुवाद प्रकाशित हुआ। विज्ञापन और भाषणों के भी अनुवाद किए । सराहना के साथ धनार्जन भी हुआ। यह मेरे सर के कारण ही था। वह आज होते तो गर्व से उनका सीना चौड़ा हो जाता ।

महाविद्यालय में जोशी सर को कक्षा के बाद प्राध्यापक कक्ष में कम, कॉलेज कैंटीन में

अधिक पाया जा सकता था। बात करने के अतिरिक्त उन्हें चाय पीने और पिलाने में मजा आता था। सर कहा करते थे कि लोगों में कई अच्छी-बुरी आदतें मौजूद होती हैं और लोग उन्हें उसी नाम से पुकारते हैं जैसे- ज्यादा दारू पीनेवाले को दारुबाज कहते हैं उसी प्रकार हम 'चायबाज' हैं। वह अपने पिताजी के भी किस्से मुझे सुनाया करते थे कि किस प्रकार उनके पिताजी की कोयले की सिगड़ी पर चाय का पतीला हमेशा चढ़ा रहता था । वह हमेशा कहा करते थे कि यही इस दुनिया का अमृत है। प्राध्यापक कक्ष में खाडिलकर नाम के कर्मचारी थे, जो सबके लिए एक ही बार चाय बनाया करते थे। सर उन्हें दो-चार बार चाय पिलाने के लिए कहते थे और वह भी खुशी-खुशी उन्हें पिलाते थे। दिन भर में पता नहीं सर कितनी चाय पी जाते थे। कैंटीन में बैठे- बैठे कभी-कभी हमारी तीन-तीन चाय की प्यालियाँ हो जाती थीं। उन्हें जितना मजा चाय पीने में आता था उतना ही दूसरों को चाय पिलाने में भी आता था। महाविद्यालय से घर के बीच उन्हें रास्ते में इतने लोग मिला करते थे कि उनकी गिनती करना मुश्किल काम था। रिक्षावाले, रेड़ी खोमचेवाले, फल-फ्रुट बेचनेवाले, पनवाड़ी, होटलवाले, अलग-अलग दुकानदार सभी के अभिवादन को स्वीकारते हुए और उनके साथ बतियाते हुए सर अपने गंतव्य तक पहुँच जाते थे। ब्रेक के समय में सर मुझे अपने साथ कैंटीन ले जाया करते थे। मेरी जेब तो हमेशा खाली रहा करती थी। सर कहा करते कि जब कमाओगे तब बिल तुम भरना । सर मेरे कंधे पर हाथ डाले चलते थे। सारे छात्र एवं प्राध्यापक देखते रह जाते थे। कैंटीनवाला भी परेशान हो जाता था। हम कभी-कभी तीन-तीन बार कैंटीन का चक्कर लगाया करते थे। उससे सर कहा करते थे कि अशोक भविष्य में प्राध्यापक ही बनेगा । प्राध्यापक कक्ष में भी उन्होंने अपनी भविष्यवाणी दोहराई थी। उनके ये शब्द तीन साल में ही सच साबित हो गए थे।

एच. पी. टी. महाविद्यालय के हिंदी विभाग से प्रतिवर्ष एम. ए. की कक्षा की 'सरस्वती यात्रा' निकला करती थी जिसमें विभाग के सभी प्राध्यापक एवं छात्र उत्तर भारत की यात्रा कर हिंदी के लब्धप्रतिष्ठ लेखकों से साक्षात्कार करते थे। मैं जिस वर्ष वहाँ छात्र बनकर आया उस वर्ष किसी कारणवश सरस्वती यात्रा का आयोजन उत्तर भारत के लिए न हो सका था । इसलिए हमें नासिक के पास ही स्थित त्रिरश्मि बौद्ध गुफाओं में ले गए थे, जिन्हें लोग 'पांडव लेणे' भी कहा करते थे। प्रा. दादा रत्नपारखी और प्रा. कुमुदिनी पाटील भी साथ थीं। वहाँ जोशी सर ने भोजन के बाद सभी को एक विषय दिया- 'दहेज प्रथा' और इस पर तत्काल लघुकथा लिखने के लिए कहा गया। सभी छात्र अलग-अलग कोने पकड़कर लिखने लगे। मुझे यह बेहद सराहनीय लगा। छात्रों की सृजनशीलता को आजमाने और बढ़ाने का इससे बेहतर तरीका नहीं हो सकता । वह दिन आज भी मेरे स्मरण में है। सर ने मुझसे गाने के लिए आग्रह किया। 'का करू सजनी आए न बालम' गाने पर मुझे खूब शाबासी दी।

स्वर्गीय जोशी सर की स्मरण शक्ति आश्चर्यजनक थी। वह छात्रों को उनके नामों के साथ पुकारते थे। वर्षों पूर्व के छात्र उनसे मिलने आते थे तब भी यही सिलसिला चलता था। हम जिस प्रकार पुराने मित्रों को भूलते नहीं वैसे ही सर किसी छात्र को भूलते नहीं थे। वह छात्रों के साथ मित्रवत् व्यवहार करते थे। मैंने सर के साथ

रहते हुए यह देखा है। कोई बीस साल पुराना छात्र सर को अचानक मिलता तो वह उसे तुरंत पहचान लेते थे। उसके साथ जुड़े कुछ किस्से दुबारा रोशनी में लाए जाते।

सर मूलतः एक कलाकार थे। उन्हें नाटक और रंगमंच से काफी लगाव था। उन्होंने कई नाटक लिखे थे। उन नाटकों का मंचन करना उन्हें बेहद भाता था। उनके द्वारा लिखित एवं निर्दे शित 'दर्पण झूठ न बोले' नाटक का मंचन एच. पी. टी. के छात्रों द्वारा ग्रंथालय हॉल में किया गया था, जो बहुत सफल रहा था । सर को निर्देशक के रूप में कार्य करते देखना बहुत प्रभावित करता और बहुत कुछ सिखा जाता था। इसी के साथ सर एक कवि भी थे। कविताओं की एक हस्तलिखित प्रति जिसका शीर्षक उन्होंने 'पतझड़' रखा था, मुझे सौंपी और उसे दुबारा लिखने के लिए कहा। सर इतना फर्राटे से लिखते थे कि उसको पढ़ना थोड़ा कठिन था। मैं उसे आसानी से पढ़ सकता था। मैंने सारी कविताएँ लिख दी तब जाकर उसका प्रकाशन हो पाया। मेरे लिए अत्यधिक आनंद का मौका था । 'नई कविता' पर एक संगोष्ठी उसी वर्ष आयोजित की गई थी । तय हुआ कि नई कविताओं में से चुनिंदा ५० कविताएँ प्रतिभागियों को दी जाएँ। लेकिन उसे छपवाना महँगा साबित हो रहा था। इसलिए तय किया गया कि सायक्लोस्टाइल कर कविताओं वितरित किया जाए। कक्षा में मेरे हस्ताक्षर अच्छे थे इसलिए रात-रात भर जागकर मुझे स्टेंसिल कट करने का काम करना पड़ा। काम काफी थका देने वाला था, लेकिन सर ने मुझे प्रोत्साहित किया। संगोष्ठी में भी मुझे सराहना मिली।

प्रा. भा. शं. जोशी सर ने बार-बार यह भविष्यवाणी की थी कि मैं प्राध्यापक बन जाऊँगा । उनकी भविष्यवाणी १० अक्तुबर १९८८ को सच साबित हुई और मैं लासलगाव महाविद्यालय में प्राध्यापक बन गया। १ अगस्त १९९० को मैंने एच. पी. टी. महाविद्यालय जॉइन किया। सर को इतनी खुशी हुई थी कि वे सबके सामने बार - बार दोहराते गए कि मैंने कहा था न कि अशोक एक दिन प्राध्यापक जरूर बनेगा । मेरी कामयाबी पर खुश होनेवाले मेरे माता-पिता के अतिरिक्त जोशी सर थे। काफी लोगों को बुरा लगा था कि कल का छात्र (छोकरा) आज हमारे कंधे से कंधा मिलाकर, हमारी कुर्सी से कुर्सी सटाकर प्राध्यापक कक्ष में बैठेगा । सर के विचार इस मामले में उनसे अलग थे जो उनके चेहरे पर छायी खुशी में मैंने महसूस किए थे। सर के साथ मिलकर मैंने एच. पी. टी. में अध्यापन का काफी अच्छा अनुभव लिया। कभी सर कहते कि आज मैं थक गया हूँ, तो मैं उनकी क्लास में खुशी-खुशी चला जाता था। विश्वविद्यालयीन पाठ्यक्रम के अतिरिक्त महाराष्ट्र हिंदी परिषद की प्रबोध, प्रवीण, पंडित परीक्षाओं का आयोजन भी महाविद्यालय में जोशी सर के नेतृत्व में किया जाता था। उसका अध्यापन भी मैंने कई वर्षों तक किया। तब मैं लासलगाँव से नासिक अप-डाऊन किया करता था ।

मेरी ट्रेन १२. ३० पर जाती थी, पर कभी सर कहा करते कि आज ४. १५ वाली ट्रेन से जाओ। तब मैं रुक जाता और सर अपने साथ मुझे उनके घर ले आते थे। उनका पुराना घर नासिक के तिवंधा में था। घर जाते समय वे सी. बी. एस. सिग्नल पर तिवारी की होटल पर मोटरसाइकिल रोकने के लिए कहते । तिवारी हमेशा स्वागत करते । वह भी जोशी सर के पुराने

छात्र थे। वहाँ हम वड़ा, भजिए, चाय पर हाथ सा साफ करते। कभी तिवंधा पर स्थित बुधा हलवाई की दूकान पर जलेबी और दूध का स्वाद चखते । देर से सर के घर पहुँच जाते । सर १० सीढ़ी पहले ही आवाज लगाते थे – जोशीबाई कोण आलंय बघा । मैडम मेरा बहुत स्नेह से स्वागत करती थी। कभी वही मेरा भोजन हो जाता। बड़े आग्रह के साथ दोनों मुझे भोजन कराते । सर से यह एक और बात मैंने सीखी थी – खवैय्यागिरी । आज भी यह सिलसिला मेरे जीवन में जारी है। सर की सांपत्तिक स्थिती बहुत खास नहीं थी, लेकिन वे दिल से बहुत धनवान थे। आज के दौर में ऐसे लोगों का मिलना मुश्किल है।

जोशी सर की कुल चार बेटियाँ थी। उनमें से संध्या और वंदना का विवाह हो चुका था । वंदना की ससुराल रास्ते में ही पड़ती थी, इसलिए कभी – कभी हम वहाँ भी हो आया करते थे। सर के मिलनसार और मीठे स्वभाव के कारण छोटे-छोटे बच्चों से लेकर बड़े-बुजुर्गों तक उनसे बेहद प्यार करते थे। हर मिलनेवाले से सर मेरा परिचय बड़े सम्मान के साथ करवाते थे। सर, मैडम मुझे अपना बेटा और चारों बेटियाँ अपना भाई मानती थीं। सर की सोच याने समय से आगे चलनेवाला आधुनिक विचार था। छोटे-बड़े का भेद उन्होंने कभी नहीं माना। धर्म एवं जाति-पाँति का विचार उन्होंने कभी नहीं किया। सभी धर्मों एवं जातियों के लोगों के साथ वे उठते-बैठते, खाते-पीते थे। वह एक आदर्श शिक्षक थे, यह वे बार-बार अपने व्यवहार के द्वारा सिद्ध किया करते थे। उनके विषय में इतनी बातें और प्रसंग हैं जिन्हें सीमित दायरे में व्यक्त करना असंभव-सा लग रहा है।

प्रिय जोशी सर के साथ मेरा संबंध उनकी मृत्यु तक बना रहा। सेवानिवृत्ति के पश्चात् उन्होंने तिवंधा का घर छोड़कर इंदिरानगर में रथसारथी सोसायटी में फ्लैट लिया था । बीच- बीच में महाविद्यालय में आ जाते थे और मैं हमेशा उनसे मिलने के उनके नए घर जाया करता था। सर बीमार रहा करते थे, लेकिन मुझे देखते ही मानों उनमें ऊर्जा आ जाती थी । उठकर बैठ जाते और उसी पुराने तरीके से मैडम को आवाज लगाते। हमेशा कहते कि मेरे आने से उन्हें बहुत अच्छा लगता है। एक दिन वंदना का फोन आया कि दादा नहीं रहे... ! लगा मेरे पिता की मृत्यु हो गई। मैं तुरंत पहुँचा और अंत्यविधी में शामिल हो गया । मैडम और सभी बेटियों के चेहरे पर मैं पढ़ सकता था कि सर का बेटा अशोक आया है ! सर की मृत्यु के पश्चात् भी मैं मातृतुल्य जोशी मैडम से मिलने जाया करता था। समय के साथ वे भी नहीं रहीं। आज भी मेरा संबंध सर के परिवार के साथ बना हुआ है। कभी भाँजी पूजा का फोन आ जाया करता है, कभी बहनों का तो कभी जमाई राजा का ! सबकी खबर मिलती रहती है। आज भी सर को याद करता हूँ तो लगता है कल की ही बात हो। मेरे जीवन पर प्रभाव डालने वाले गिने-चुने व्यक्तियों में से एक भा. शं. जोशी सर थे। उनको याद करते ही अनेकानेक ऐसे प्रसंग याद आ जाते हैं, जिनसे प्रेरणा मिलती है, जीवन जीने का तरीका मिल जाता है, इसलिए सर भुलाए नहीं भूलते। शायद इसी को अमर हो जाना कहते होंगे। सर हमेशा छात्रों के हृदय में अपना अडिग स्थान बनाए हुए जीवित हैं। मैं उन्हें आज भी याद करता हूँ। उन्हें शत-शत नमन कर भावभीनी श्रद्धांजलि अर्पित करता हूँ।



# डॉ. एन. बी. कुलकर्णी

**प्रा.शिशीर सिंदेकर**

आयुष्य समृध्द करणाऱ्या गुरुंना नमस्कार.

उगवत्या सूर्याच्या साक्षीने येणारा प्रत्येक दिवस नवीन आव्हानं, समस्या, प्रश्न घेऊन समोर येत असतो. प्रत्येक प्रश्नासाठी, उत्तरांचे माहित असलेले, नसलेले पर्याय असतात, तर काही प्रश्नांची उत्तरं नव्याने शोधावी लागतात. प्रत्येक उत्तराचे वेग-वेगळे लाभ असतात, तर काही तोटे असतात. आयुष्याच्या वेग-वेगळ्या टप्प्यांवर हे निर्णय घ्यावे लागतात. ही निर्णय निश्चितीची प्रक्रिया त्या-त्या व्यक्तीच्या विचार प्रक्रिये (थॉट प्रोसेस) नुसार ठरते. अत्यंत महत्वाची असलेली ही 'विचार प्रक्रिया' अनेक गोष्टींनी विकसित होत, निश्चित रूप घेत असते. ही विचार प्रक्रिया घडविणारे, बदलवणाऱ्या घटकांमध्ये आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, मुलगा, मुलगी, नातेवाईक, मित्र, मैत्रिणी, शिक्षक, गुरु, घर, परिसर, सामाजिक, आर्थिक परिस्थिती वातावरण यांची महत्त्वाची भूमिका असते.

निर्णय प्रक्रियेला निश्चित दिशा, आकार देणारे हे घटक म्हणजेच गुरु होय. गुरु म्हणजे कोणी एक व्यक्ती नसून या सारख्या अनेक स्वरूपात आपल्यामध्ये ऊर्जा, चेतना, वेग-वेगळ्या माध्यमातून निर्माण करणारं जगद्व्यापी तत्त्व आहे. गुरु हे केवळ आध्यत्मिकच नव्हे, तर सर्वच क्षेत्रात अस्तित्वात असलेलं व्यापक तत्त्व आहे. गुरु हा मार्गदर्शक आहे, मित्र आहे, रागावणारा आहे, प्रेम करणारा आहे, कठीण समयाला आधार देणारा आहे, सांभाळणारा आहे, तेजाचा प्रकाश दाखवणारा आहे. कधी बोट धरून, तर कधी खांद्यावर हात ठेवून योग्य वाटेवर नेणारा आहे. आज आठवण येते ती अशाच काही गुरूंची.

अर्थार्जनासाठी उपयुक्त ठरेल असं ज्ञान, कौशल्य महाविद्यालयीन शिक्षणातून मिळावं अशी अपेक्षा असते आणि त्या वाटेवरच्या प्रवासाच वय लक्षात घेतलं तर योग्य शिक्षकांचं मार्गदर्शन हे आयुष्य घडवणारं असतं.

**प्रा. कर्डीले सर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून प्रा. कर्डीले

सरांकडे जबाबदारी होती. सर सेवानिवृत्तीच्या शेवटच्या टप्प्यावर होते. आजारपणामुळे ते अनेकवेळा रजेवर असत, पण ते जेव्हा येत असत, तेव्हा आम्ही अर्थशास्त्र विषयासंदर्भातले कोणतेही प्रश्न त्यांना विचारायचो आणि सर त्याचं अत्यंत सविस्तर उत्तर तोंडपाठ सांगत. ते आम्ही लिहून घेत होतो. १९५०-५१ च्या ऑल इंडिया रूरल क्रेडिट रिपोर्टपासून ते थेट कोणत्याही वित्त आयोगाच्या शिफारशी त्यांना मुखोद्गत होत्या.

**प्रा. संजय चपळगावकर सर**

सार्वजनिक वित्त (पब्लिक फायनान्स) या विषयावर प्रचंड ज्ञान असलेले प्रा. चपळगावकर सर. अफाट विद्यार्थीप्रिय, खणखणीत मोठा आवाज, उत्साही, ऊर्जा आणणारे आणि विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण करणारे सर. त्यांची विचार करण्याची पध्दत रॅशनल (विवेकपूर्ण) त्यामुळे काय चांगलं, काय वाईट हे समजण्याची उमज आम्हाला सरांमुळे आली. अनेक पर्यायांना स्पष्टपणे हो किंवा नाही म्हणण्याचं धाडस माझ्यात सरांमुळे नकळत निर्माण झालं. माझ्या आयुष्यात सर म्हणून आलेले, माझे केंव्हा मित्र झाले ते लक्षातही आले नाही. सुदैवाने सरांचा सल्ला मला आजही मिळत असतो. एन. एस. एस. च्या माध्यमातून सरांनी अनेक समाज उपयोगी कामं केली. युथ एक्स्चेंज प्रोग्राममध्ये अखिल भारतीय स्तरावर रोटरी क्लबतर्फे काही मोजक्या युवकांमध्ये त्यांची निवड झाली होती, त्या द्वारे सर अमेरिका, ब्राझील अशा वेगवेगळ्या देशांना भेट देऊन आले. 'अर्थशास्त्रासारखा रुक्ष विषय विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करीत कसा शिकवला जाऊ शकतो', हे सांगण्यासाठी सरांना अनेक महाविद्यालयांमध्ये आवर्जून बोलावले जाते.

**प्रा. एन. बी. कुलकर्णी**

अर्थशास्त्रातील माझे खरे गुरु म्हणजे प्रा. एन. बी. कुलकर्णी. सर प्रथम मुंबई विद्यापीठामध्ये होते, त्यानंतर नाशिकरोड महाविद्यालयात आणि नंतर आमच्या सुदैवाने एच. पी. टी. कॉलेजमध्ये कार्यरत होते. सेवानिवृत्ती पूर्वी ते काही काळ उपप्राचार्य होते. सर अत्यंत साधे, निगर्वी, शांत, मितभाषी, नेमकं पण योग्य वेळी अचूक आणि मार्मिक बोलणारे होते. टीकाकार होते. सर म्हणजे सखोल ज्ञानाचा अखंड झरा, नदी, ते समुद्र असं सगळंच होते.

अर्थशास्त्राच्या कोणत्याही विषयाचं सखोल ज्ञान सरांकडे होतं. ते नेहमीची लेक्चर्स तर घेत होतेच, पण आम्ही त्यांना अनेक वेळा बोलावून, इतर विषयही त्यांच्याकडून समजावून घेत असू. ते आवडीने येत असत. त्यांना मी कधीही चिडलेलं, रागावलेलं पाहिलं नाही. प्राईस थिअरी, सूक्ष्म अर्थशास्त्र त्यांचा आवडीचा विषय होता. प्रचंड आकडेवारी असलेला भारतीय अर्थशास्त्र हा विषय कसा शिकवायचा हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले. एच. पी. टी. कॉलेजमध्ये एम. ए. इकॉनॉमिक्स इंग्रजीतून शिकणारे माझ्या वेळेला केवळ सात विदयार्थी होते. तर मराठीतून शिकणारे एकशेवीस विद्यार्थी होते. मुळात एम. ए. ला एकदा मराठी माध्यमात शिकविल्या नंतर तोच विषय इंग्रजी माध्यमात केवळ ५-७ विद्यार्थ्यांसाठी शिकवणे हा त्यांच्या वर्क लोडचा (तासिका कार्यभार)

भागही नव्हता, पण हे त्यांनी आम्हाला कधीही कळू दिले नाही. माझ्या एका मित्राला टी. वाय. बी. ए. साठी एक प्राध्यापक प्रोजेक्ट गाईड होते, पण ते भेटत नसल्याने, त्याने सरांना विनंती केली, तेंव्हा सरांनी दर शनिवारी त्याला दोन तास मार्गदर्शन केले. करिअर गाईडन्स, एमपीएससी, सीएआयआयबी यासारख्या अनेक विविध क्षेत्रात सर मार्गदर्शक म्हणून अनेक विद्यर्थ्यांना परिचित होते. कोणत्याही अपेक्षेविना, मन लावून शिकवणं हीच सरांची पॅशन होती, धर्म होता. उपप्राचार्य म्हणून काम करीत असताना, विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेत, पॉझिटिव्ह दृष्टिकोनातून त्या सोडविण्यासाठी विद्यार्थाला मदत करीत.

सर प्रचंड अभ्यासू होते, सर विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते, त्यांना शिष्यवृत्ती मिळालेली होती पण सर स्वतःविषयी कधीच बोलत नसत. मुंबई विद्यापीठात असताना अनेक ग्रंथाचे वाचन त्यांनी केले होते, अनेक थोर अर्थतज्ज्ञांचा सहवास त्यांना लाभला होता. मुक्त विद्यापीठासाठी सरांनी अनेक पुस्तके लिहिली. अनेक पुस्तकांचे संपादन केले. प्रा. डॉ. विनायक गोविलकर सरांच्या थिंक लाईन या संस्थेमार्फत प्रकाशित होणाऱ्या अनेक पुस्तकांचे संपादन केले. काही विषयांवर लेखन केले. या संस्थेचे ते एक आधारस्तंभ होते.

सर तसे वृत्तीने गंभीर होते. (त्यांना गमतीने गंभीरराव म्हणत.) त्यांच्या विषयी वेगवेगळ्या आख्यायिका सांगितल्या जात असत. ते नाशिकरोड येथे राहात होते. एच. पी. टी. कॉलेज मधून निघाल्यानंतर ते पायी पायी चालत थेट शालिमारपर्यंत किंवा कधी कधी त्याही पुढे जायचे, वाटेत जिथून बस मिळेल तिथून पुढे बसने जात असत. सर अत्यंत साधे होते. पण प्राध्यापकांच्या हक्कांसाठी लढणारे होते. प्राध्यापक संघटनेसाठी त्यांनी काम केले, गद्रे मंगल कार्यालयातले त्यांचे भाषण आजही अनेकांना आठवते.

त्यांनी मला एकदा विचारलं, 'तुला जुने इकॉनॉमिक टाइम्स हवेत का,' मी त्यांच्या नाशिकरोडच्या घरी जाऊन १९७० च्या काळातली ती सगळी कात्रणं घरी घेऊन आलो', त्या काळातल्या पंचवार्षिक योजना, सरकारी धोरणं अशी खूप माहिति त्यातून मिळाली.

वर्ष १९९०; लेक्चरर म्हणून माझ्या पहिल्या इंटरव्ह्यूला एच. पी. टी. कॉलेजमध्ये सर समोर होते. त्या काळात प्रत्यक्ष वर्गात मुलांसमोर लेक्चर घ्यावे लागत असे. त्या वेळेला प्राचार्य चौरे, कुलकर्णी सर आणि एक दोन प्राध्यापक होते. माझे लेक्चर खूप छान झाले असे मला वाटले, (तरुणपणी उत्साह आणि आत्मविश्वास थोडा जास्तच असतो.) माझी निवड झाली, पण त्यानंतर सरांनी माझ्या पाच चूका शांतपणे मला समजावून सांगितल्या. आयुष्याच्या त्या वळणावर सरांची माझी गाठ भेट मला खूप काही शब्दांपलीकडचं देऊन गेली.

त्यांची आठवण येत नाही, असा एकही दिवस उगवत नाही. सरांच्या शेवटच्या काळात हॉस्पिटलमध्ये त्यांनी माझा हात बरच वेळ धरून ठेवला होता. सरांना बोलता येत नव्हतं, अर्धवट कोमा अशी स्थिती होती, पण त्यांना जे सांगायचं होतं ते मला कळालं, त्यांचे आशीर्वाद आजही माझ्या बरोबरच असतात.



# LAST VICTORION
# एम. जी. उपाख्य मु. गो. देशपांडे

**श्री. प्रमोद तेंब्रे**

एम जी सरांना जाऊन बरेच वर्ष झाली आहेत. आमची बी ए /एम ए (एंटायर इंग्रजीची गँग) भेटली तर त्यांची आठवण निघत नाही असे होत नाही. नाशकात असताना गोळे कॉलनीतील त्यांच्या त्यावेळच्या घरावरून गेले तर ते आठवत असत. त्यांचे गडगडाटी हसणे आठवायचे. आता तिथे कोणी राहत आहेत का हेही माहीत नाही. ती इमारत आहे की नाही हे ही माहीत नाही.

एम. ए. ला असताना अनेकदा त्यांच्या ह्या तळमजल्यावरील घरात ते आम्हाला बोलावत आणि न संपलेला पोर्शन पूर्ण करीत. लेंगा आणि बाही असलेला गंजी घालून सरत्या प्रकाशात त्यांनी घेतलेला वर्ग अजून आठवतो आहे. (त्यावेळी आम्ही खरेतर मनाविरुद्ध जात असू. एचओडी होते ते म्हणून; पण इतक्या दिवसानंतर त्यांनी सांगितलेले आठवते ते मायथालाँजीकल कवि डन आणि तुकाराम ह्यांचे साम्य त्यांनी फार सुंदर समर्पक असे सांगितलेले.)

प्रीडिग्री सायन्स करुन, एफ.वाय.बी.ए. ला प्रवेश घेतला होता तेव्हाच ठरविले होते की आपण इंग्रजी भाषेत पदवी मिळवायची जमले तर एम ए ही एंटायर इंग्रजीत करायचे आणि शिक्षक व्हायचे म्हणजे आपल्या नाटक आणि इतर लिखाण उद्योग करायला उदंड वेळ मिळेल. (ह्यातील पहिल्या दोन गोष्टी साधल्या तिसरी एकच वर्ष नशिबात होती. आणि नंतर जगदीशाने पोटासाठी बँक धरायला लावली आणि अनेक गावे पालथी घालायला लावली.) आणि म्हणून स्पेशल इंग्रजी हा एक एफ वाय ला पेपर निवडला. आणि त्यामुळे प्रथम एम जी सरांचे दर्शन झाले ते भयभीत करणारे होते. थोड्याश्या अभ्यासाने सहज भाषेत मार्क मिळविता येतात ह्या सार्वकालिक समजाचा फुगा पहिल्या तासाला एम जी सरांनी व्यवस्थित फोडला. ‘‘इंग्रजीच नव्हे तर कोणतीही भाषा ही वरवर पाहता सोपी सहज वाटत असेल तुम्हाला; पण ती भाषा आत्मसात तेव्हाच होईल जेव्हा तुम्ही त्या भाषेत विचार करायला लागता आणि हे जर जमले तर भाषा तुम्हाला

आली असे समजा. आधी मराठीत विचार आणि त्याचे रूपांतर तेही शब्द्श: इंग्रजीत करता तुम्ही म्हणजे तुम्ही इंग्रजी भाषा समजला नाही असे मी म्हणतो.'' असे काहीसे त्यांनी सांगितल्यानंतर आम्ही इन मीन चार पाच त्यात दोन मुली हादरलो. पुढील वाक्य जबरे होते आणि ज्यांना हे झेपणार नाही त्यांनी आजच विषय बदलून घ्यावा. नंतर तो मी बदलू देणार नाही. खरे तर आताच वर्गात फार गर्दी आहे. तेव्हा... (पुढच्या तासाला आम्ही फक्त चारच उरलो. केमिस्ट्रिच्या वाड सरांनी प्रीडिग्री सायन्सच्या पहिल्या तासाला एखादी शापवाणी उच्चारावी असे अत्यंत कोरड्या स्वरात म्हटले होते 'तुमच्यापैकी ५० टक्के नापास होणार आहात आणि ५० टक्के पैकी फक्त अर्धे कसेबसे पुढे जातील' त्या पहिल्या पन्नास टक्क्यात मी होतोच, असो.)

एकदा तर गंमत झाली मला वाटते माझ्याजवळ जॉनसनची रासेलास होती. ती आमच्या क्रमिक पुस्तकात नव्हती. पण मी ती वाचायला म्हणून घेतली होती. शेख म्हणून एक मुलगी होती आमच्या वर्गात तिने ती घेतली आणि चाळत असताना एम. जी. वर्गात आले. गडबडीत उभे राहता राहता तिच्या हातातून ती खाली पडली. एम. जी. सरांनी ती बसता बसता उचलली आणि ओह रासेलास let us read RASSELAS today असे म्हणत जवळपास २/३ तास ते त्यावर बोलत राहिले. नावाला ती कादंबरी हातात होती पण एकदाही त्यांना ती उघडावी लागली नाही. (ते तास घेताना बेलकडे लक्ष देत नसत. पुढील तासाचे प्रोफेसर आले तरी ते म्हणायचे त्यांना प्लीज allow me to continue. आणि वाट न पाहता त्यांचे पुढे चालू होई. ते अत्यंत संथ आणि खर्जातला परंतु स्पष्ट आवाजात शिकवीत. त्यांची वाणी फार स्वछ होती. आम्हाला अगम्य असे शब्द ते वापरत. नंतर ते डिक्शनरीमध्ये पाहिले तर ते त्या त्या वेळी किती समर्पक आणि अर्थवाही असत हे कळून येई. त्यांचे हसणे ही मोठ्या आवाजाचे होते.) त्यांचे बोलणे संपले आणि शेख भीत भीत म्हणाली, 'सर ही पोर्शनमध्ये नाही.' ते म्हणाले "So what, we enjoy it today. ' एकदा वर्गात त्यांनी Victorian काळाचा इतिहास शिकविताना इंग्लिश मॅनर्स बाबत आणि टेबल मॅनर्स कसे असावेत, सूरी काटा आणि चमचा कसा वापरतात, सूप पिताना चमचा कसा धरावा, हे काही वेळा हावभाव करीत आणि अत्यंत विस्ताराने सांगितले. हे सारे अभ्यासक्रमाच्या बाहेरचे होते. पण जणू तो त्याचा एक भाग आहे असे त्यांनी शिकविले. त्यावेळी तो आम्हाला वेळकाढूपणा वाटायचा पण नंतर थोडे मोठे झालो मग समजले हाही भाषा शिकण्याचा भाग आहे. आणि तो धडा त्यांनी आम्हाला एफ वाय लाच दिला. कारण एम ए ला आल्यानंतर त्यांची खरी ओळख झाली आणि त्यांची विद्वत्ता काय आहे हे समजले. त्यांचे महाविद्यालयीन मित्र आणि प्रसिद्ध कवि विंदा करंदीकर ह्यांच्या पत्नी सुमाताईंनी रास ह्या त्यांच्या आत्मकथनपर पुस्तकात लिहिले आहे, राजा देशपांडे हा त्यांचा महाविद्यालयीन काळातील त्यावेळचा परममित्र! हे देशपांडे म्हणजे पुढे नासिक कॉलेजमधील इंग्रजीचे प्राध्यापक मु. गो. देशपांडे. राजा देशपांडेंमुळे या दोघांनी खूप इंग्रजी वाङ्मय वाचले. त्या वेळी राजाची इंग्रजी वाङ्मयाची समज माझ्यापेक्षा अधिक चांगली होती असे हे नेहमी म्हणतात.

त्यांनी मराठीत इंग्रजी मधील दिग्गज लेखकांची ओळख करून देणारे समीक्षणवजा 'पाश्चात्य साहित्यातील लेणी' नावाचे पुस्तक लिहिले होते. डी. एच. लॉरेंस ची SONS AND LOVERS ही कादंबरी अभ्यासाला होती म्हणून त्यातील लॉरेन्स बद्दल वाचण्यासाठी ते त्यावेळी वाचले होते.

ते बोर्ड ऑफ स्टडीजचे चेअरमन होते त्यामुळे त्यांनी आम्हास गिलीगुडच्या आवाजातील हॅम्लेटची रेकॉर्ड ऐकविली, फ्रँक करमोड हे शेक्सपियरवरील अधिकारी व्यक्ति पुणे विद्यापीठात आली होती तर त्यांना नासिकला घेऊन आले आणि आम्हाला त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घेऊ दिला. अभ्यासक्रमाच्या बाहेर जाऊन अधिक वाचावे भाषेची लज्जत चाखावी असे त्यांना वाटत असे. अर्थात इतर इंग्रजीचे सहयोगी प्राध्यापक आम्हाला फार छान मिळाले होते प्रश्न एव्हढाच होता की आम्ही त्यांच्या शिकविण्याला किती पात्र होतो तो!

पहिल्या एम. ए. च्या वर्षाला आमच्या नाटक आणि इतर गोष्टीमुळे मला आठवते की माझी वर्गातील उपस्थिती कमी भरली. आणि नियमाप्रमाणे वार्षिक परीक्षेचा फॉर्म भरताना एचओडीची सही असल्याशिवाय तो विद्यापीठाकडे पाठवता येत नसे. मी त्यांची सही घ्यायला गेलो तेव्हा त्यांनी नकार दिला. मग मी प्रिन्सिपल जोशींकडे गेलो ते म्हणाले, ''दुसरे काही असेल तर सांग मी पण त्यांचा विद्यार्थी होतो. त्यांना मी नाही काही सांगू शकणार.'' आता काय करावे, असा विचार करत मी लायब्ररीच्या बाहेर उभा होतो, तेव्हढ्यात ते आले. वर गेले. माझे लक्ष नव्हते. ते खाली येत घरी जाण्यासाठी म्हणून वळले, काय झाले कोण जाणे? (खरं तर तेच जाणे) मला हाक मारली आणि अर्धा तास बिन पाण्याने करत बोलत राहिले. ''कॉलेज म्हणजे नुसती नाटके आणि एकस्ट्रा गोष्टी नव्हेत. तू एम. ए. ला आहेस. जबाबदारी नको वर्गात येत नाहीस म्हणजे काय? एम.ए. म्हणजे खेळ वाटला. आण तो फॉर्म इकडे.'' असे बोलत त्याच्यावर सही केली मी अगदी भावूक होत म्हटले, ''सर अजून तीन एक महीने आहेत मी जोरात अभ्यास करतो. तसा पहिला पेपर शेक्सपियर आणि त्याचा काळ चा अभ्यास झाला आहे. मला खात्री आहे मी ५० च्या वर मार्क मिळवेन.'' तेव्हा अत्यंत शांतपणे ते म्हणाले, ''असे तुला वाटते प्रत्यक्षात २५ पर्यन्त पडले तरी खूप! कारण ह्या वर्षी हा पेपर प्रोफेसर नागराज तपासणार आहेत.'' (नागराज सर हे यूनिवर्सिटीचे डीन होते आणि ते एक दंतकथा होते. स्पेलिंगची एक चूक जर सापडली तर पुढे न तपासता भोपळा देत असत, असे त्यांच्याबद्दल बोलले जाई. जिज्ञासूंनी त्यांच्याबद्दल विनय हर्डीकर ह्यांनी अंतर्नादमध्ये त्यांच्यावर जो लेख लिहिला आहे तो वाचावा. ते नागराज म्हणत एम. जी. नाशिकमध्ये असताना हे लोक युनिवर्सिटीत का येतात. आणि गुरुची वाणी कधी खोटी ठरत नाही. फक्त २६ मार्क्स मला मिळाले) आमची बॅच सरांची शेवटची बॅच असावी. ते त्यानंतर निवृत्त झाले. त्यांनी आपणहून आमची आठवण काढावी इतके आम्ही त्यांच्या अपेक्षेइतके विद्वान (?) नव्हतो. प्रोफेसर देवराजसरांमुळे एक वर्ष शिक्षक होता आले. पण एम. ए. ला क्लास नसल्याने साहजिक नंतर पत्रकार व्हाया बँकेची नोकरी धरली. गाव ही पायाखालून सुटले. एम. जी. सरांविषयी तसे नंतर ते गेले

हीच बातमी कळली.

मुलाच्या प्रवेशासाठी एकदा कॉलेजवर गेलो होतो जुने सर भेटले, ते सांगत होते की आता एम. ए. इंग्रजीच्या दोन डिविजन आहेत जवळपास एका वर्गात ७५ जण. मी उडालोच; त्यांना म्हणालो सुद्धा, 'सर फार बरे झाले आज एम. जी. सर नाहीत ते. त्यांनी बहुदा आत्महत्या केली असती एव्हढी संख्या बघून आम्ही चार होतो तेव्हा त्यांना ती गर्दी वाटायची. आणि हे बघून...' आणि हसताना डोळ्यात पाणी आले ते न लपवता वाहू दिले; मनात त्या Last Victorian योद्ध्याला स्मरत. आज ते नाहीत. त्यांना अशी पडझड पाहणे कदाचित जड गेले असते. काय माहीत मोठयाने हसत हेही त्यांनी बाजूला केले असते.

A teacher can never truly teach unless he is still learning himself. A lamp can never light another lamp unless it continues to burn its own flame.

The teacher who has come to the end of his subject, who has no living traffic with his knowledge but merely repeats his lesson to his students, can only load their minds, he cannot quicken them.

– Gurudeva Rabindranatha Thakur

**कवित्ववाराशिनिशाकराभ्यां**
**दौर्भाग्यदावाम्बुदमालिकाभ्याम् ।**
**दूरिकृतानम्रविपत्तिताभ्यां**
**नमो नमः श्रीगुरुपादुकाभ्याम् ।।**



# सात्त्विकतेची प्रतिमा : डॉ. सौ. अरुणा रारावीकर

**श्री. पद्माकर देशपांडे**



आपल्या संस्कृतीत गुरुचे महत्त्व असाधारण आहे. त्यातही आईला पहिला गुरुपदाचा मान देण्यात येत असतो. मुलाला जगवण्यासाठी आणि पुढे येण्यासाठी आईच शिकवीत असते. त्यामुळे आईचे गुरुपद हे ध्रुवासारखे अढळ आहे. कोणीही तिला त्या स्थानापासून दूर करू शकत नाही. त्यामुळेच मातृप्रेमाच्या महन्मंगल स्तोत्राचे गुणगान आपण सदैव करीत असतो. आई हा कधीही न संपणारा असा ठेवाच असतो जणू. आईच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही, उलट तिच्या ऋणात राहण्यात आपल्याला आनंद वाटत असतो तो त्यामुळेच. सर्वांप्रमाणेच माझ्याही जीवनात आई हा एक स्वंतत्र अध्याय आहे. अनेकदा गुरूला आईची उपमा देण्यात येते. संत ज्ञानेश्वर यांना गुरुमाऊली म्हटले जाते. गुरुही आपल्या शिष्यासाठी आवश्यक ते सर्वकाही करतो. त्यामुळे त्याचेही महत्त्व अनन्यसाधारण असते. सामान्य सुख-दुःखात खितपत पडलेल्या शिष्याचे उन्नयन करण्यासाठी गुरु घेत असलेले कष्ट हा एक वेगळा विषय आहे. आपण असतो ते अशा आई आणि आईसारख्या गुरूमुळे. आपले अस्तित्व म्हणजे काय? या दोन्ही शक्तींनी भरलेले स्रोत नसतील तर आपण असून नसल्यासारखेच. आपण जीवनात येवून, काही केले अथवा न केले तरी आपल्याला प्रसिद्धी, मानमान्यता मिळाली किवा मिळाली नाही तरी या दोन शक्तींचे स्मरण आपल्याला सतत ऊर्जाशील ठेवत असते. माणसाचे भाग्य म्हणजे अशा सच्छक्ती त्याला लाभणे. ज्याला या शक्ती प्राप्त होतात व त्यांची यथार्थ ओळख पटते त्या व्यक्ती धन्य होत.

माझ्या जीवनात हे भाग्य मला लाभले हे सांगताना मला अतीव आनंद होतो. त्यामुळेच लौकिकदृष्ट्याच नव्हे, तर समग्र संपन्नतेचा अनुभव मला अनेकदा येतो.

माझ्या महाविद्यालयीन काळात असेच आनंदपर्व गुरु आणि मातेसमान माझ्यावर प्रेम करणाऱ्या प्राध्यापिका कै. डॉ. सौ. अरुणा यशवंत रारावीकर यांच्या रूपाने माझ्या जीवनात अवतरले. रारावीकर बाई यांचे कुटुंबच शिक्षणक्षेत्राला वाहिलेले होते. प्रसिद्ध अर्थज्ज्ञ डॉ. यशवंत रारावीकरसर हे त्यांचे पती. तर रारावीकर बाईंचे बंधूही पी. आर. हायस्कूलचे प्राचार्य होते. आमच्या रारावीकर बाई म्हणजे सात्त्विकतेची प्रतिमाच! नितळ गौर वर्ण, मध्यम उंची,कायम उत्साही, भारतीय संस्कृतीचे नितांत प्रेम आणि अभिमान! अध्यापन,अध्ययनात आवड व त्यासाठी प्रचंड परिश्रम घेण्याची तयारी ही त्यांची वैशिष्ट्ये! भारतीय संस्कृतीचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. 'मेघदूताचे मराठी अवतार' यावर त्यांनी पीएच. डी. मिळवली होती. कालिदासाचे मेघदूत हे महाकाव्य हा विषयच मोठा काव्यात्मक. त्यात त्यांनी संशोधन केले व कुसुमाग्रज,बा. भ. बोरकर, वसंत पटवर्धन अशा अनेकांनी केलेल्या मेघदूताच्या मराठी रूपांतरांचा अभ्यास केला ही बाब लक्षणीय होती. मी नुकताच अकरावीच्या वर्गात प्रवेश घेतला होता. त्या काळात रारावीकर बाई आम्हाला मराठी आणि संस्कृत विषय शिकवीत. त्यांच्या शिकविण्यात मातेची ममता, माझ्याविषयी व माझ्या अन्य मित्रांविषयी प्रेम व कर्तव्याची जाणीव सतत जाणवत असे. शिकविणे म्हणजे केवळ चार भिंतींच्या आड पुस्तके वाचून घेणे नव्हे, याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला होता. त्यामुळेच आमचे संबंध मर्यादित आणि तात्पुरते नव्हते. केवळ शिक्षिका यापेक्षा आपल्या लाडक्या मुलाची काळजी घेणारी आई असे ते संबंध होते. त्यांच्याकडे केव्हाही गेले तरी आमचे स्वागत होत असे. त्यावेळी लक्षात येत नव्हते; पण घराची जबाबदारी, शिक्षकी पेशा, अनेक कामे असूनही त्यांनी तसे कधी जाणवू दिले नाही. दसऱ्याला सोने द्यायला तसेच संक्रातीला तिळगुळ घेण्यास आणि अभ्यास, वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने त्यांच्याकडे सतत जाणे होत असे. नाशिकमधील शालीमार भागातील पटेल कॉलनीत त्या राहत असत. पलीकडच्या गल्लीत मालुसरे यांच्या घरात कवी कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब शिरवाडकर यांचेकडेही आम्ही जात असू. आता त्या आपल्यात नसल्या तरी त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी कायम स्मरणात आहेत,कायम स्मरणात राहतील. मी हंप्राठा महाविद्यालयाच्या अकरावीच्या कला शाखेत प्रवेश घेतला, तेव्हा कोणते विषय घ्यावे ते समजत नव्हते. दहावीला मी संस्कृत विषय घेतलेला नव्हता. बाई तर संस्कृतच्या अभ्यासक. मी संस्कृत विषय घ्यावा म्हणून त्यांनी प्रेरित केले. त्यामुळे मला देवभाषेचा सहवास मिळाला. त्यापुढे जावून त्यांनी मला संस्कृतमध्ये पारंगत करण्याचा जणू विडाच उचलला होता. त्यासाठी मराठीचे तज्ज्ञ आणि संस्कृतचे अभ्यासक, समीक्षक, नाशिकमधील मराठीत पहिले पीएच. डी. असलेले डॉ. बा. वा. दातार यांच्याकडे मी आणि माझे मित्र नरेंद्र दाणी, राजू देव यांना त्यांनी पाठविले. कोणतीही फी न घेता दातार सर आम्हाला दुपारच्या वेळात संस्कृत शिकवीत असत. रारावीकर बाईंमुळे मला आणखी एका चांगल्या गुरूचा लाभ झालेला होता. त्यांचे हे देणे मर्यादित नव्हते. शिकविताना मुलांनी

सुसंस्कृत व्हावे असे त्यांना वाटत असे. त्यामुळे त्यांच्या सवयी, कौटुंबिक माहिती त्या जाणून घेत. मुलांतील कलागुणांना उत्तेजन देण्याची त्यांची सवय होती. त्यामुळेच मला एका काव्य स्पर्धेत प्रथम परितोषिक मिळाले, तेव्हा त्यांनी वर्गात उभे करून सुहास्य वादनाने ही माहिती सर्व मुलांना दिली. त्यांचे उदगार अजून स्मरणात आहेत. ''पद्माकरने एक पराक्रम गाजविला आहे, बक्षीस मिळविणे हाही पराक्रमच!'', असे त्या म्हणाल्या. वाचनाची मला आवड होती परंतु काय वाचावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच विवेकानंद, रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर व सावरकरांवरील अनेक पुस्तके मी वाचून काढली. अनेकदा स्वतःची पुस्तकेही त्या देत. त्याच्या पुस्तकाला कव्हर लावून परत केले तेव्हा त्यांना खूप आनंद झाला होता. त्यामुळे चांगल्या गोष्टीना प्रोत्साहन त्यांच्याकडून हमखास मिळणारच असा दृढ विश्वास वाटत असे.

संस्कृतच्या आवडीमुळे त्यांनी आम्हाला संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त केले. त्यांच्यामुळेच पुण्याच्या बी. जे. मेडिकलमध्ये मी संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत भाग घेवून बक्षीस मिळवू शकलो. लिहून देणाऱ्या, पाठ करून घेणाऱ्या रारावीकर बाईच होत्या. आम्ही फक्त पाठांतर करणारे . संस्कृत भाषा सभेचे काम सुरु झाले तेव्हा कै. डॉ. वि. म. गोगटे यांच्या गच्चीवर कार्यक्रम होत. चांगले विद्वान येत. खूप काही ऐकायला मिळे. एकदा तर कार्यक्रमाला माझी आई आली होती. नेमक्या त्याच दिवशी तेव्हा नवे असणारे मोठ्या आकाराचे, जाड सालीचे ताजे टमाटे देण्यात आल्याने आई खुश झाली होती. त्र्यंबकचे प्रसिद्ध प्रवचनकार विद्वान भालचंद्रशास्त्री मुळे यांचा सहवासही या कार्यक्रमात मिळाला. वर्गातील श्रीप्रकाश मुळे याचे ते पिताश्री. अनेक चांगले क्षण त्यांच्यामुळे अनुभवायला मिळाले. संस्कृत वक्तृत्व स्पर्धे साठी पुण्याला जाण्याचा प्रसंग आला तेव्हा आम्हाला नेण्याची जबाबदारी त्यांनी आनंदाने उचलली होती. त्यावेळी रारावीकर कुटुंबाचे मित्र असलेल्या भागवत यांच्या शिवाजीनगरच्या बंगल्यात आम्ही उतरलो होतो. त्यानंतर जळगाव येथे बाईंनी आम्हाला नेले. निमित्त होते त्यांनी संस्कृतात लिहिलेल्या नभोनाटयाचे. 'पार्वती पर्यटनम्' आणि 'विनायाकस्य स्वर्गाधिरोहणम्' या दोन नाटिका तेव्हा नवीन असलेल्या आकाशवाणीच्या जळगाव केंद्राने प्रसारित केल्या होत्या. त्यात बाईंनी आमच्याकडून संस्कृतातील संवाद वाचून घेतले होते. त्यात सावरकरांची भूमिका करण्याची संधी मला त्यांच्यामुळेच मिळाली होती. या उपक्रमासाठी त्यांनी भरपूर मेहनत घेतली. आम्हाला रेल्वे तिकीट काढणे किंवा कोणतेही काम करावे लागले नाही, विद्यार्थी म्हणून कोणतीही तोशिष त्यांनी आम्हाला लागू दिली नाही. रारावीकर हे मुळचे जळगावचे. त्यामुळे तेथे आमच्या राहण्याची व्यवस्था रारावीकर सरांच्या बंधूंकडेच करण्यात आली होती. या काळातील एक आठवण आहे. आम्हा मुलांवर मातेप्रमाणे त्या प्रेम कशा करीत होत्या याची ती खूण आहे. एके दिवशी सकाळी नाश्त्यासाठी कालच्या पोळीचा कुस्करा केला होता. जोडीला पोहे किंवा असेच आणखी काही असावे. सकाळी तो बाईंनी केला, तेव्हा आम्हाला शिळे जास्त खावे लागू नये म्हणून स्वतःला जास्त वाढून घेतला होता असे आठवते. घरातील आई

असेच करताना पूर्वीच्या काळात दिसत असे.

एकदा मी मामाकडे मराठवाड्यातील सेलू येथे गेलो होतो. तेव्हा जुनी मासिके वाचताना रारावीकर बाईंनी लिहिलेली कथा प्रसिद्ध झालेली दिसली. ती वाचली. तेव्हा फोनचा वापर आजच्याइतका होत नसे. मी बाईंना पत्र लिहिले. ते वाचून, त्यांना नक्कीच खूप आनंद झाला असेल. पुढे कॉलेज शिक्षण सुरू असतानाच मी गावकरीत नोकरी करू लागलो. बाई नव्या घरी राहायला गेल्या. पटेल कॉलनीतून मुंबई आग्रा रोड वरील भाभानगर मध्ये त्यांनी बंगला बांधला होता. तेथेही अधून मधून जात असे. उत्साहाने बाईंनी सारे घर दाखविले. घरात देवघर, शेणाने सारविण्याची एका खोलीतील व्यवस्था यातून त्यांनी भारतीय संस्कृती जपण्यासाठी किती आटापिटा चालविला होता ते दिसून आले. त्यानंतर गाठीभेटी कमी होत गेल्या. त्यानंतर त्या आजारी पडल्या. आम्हाला त्यांच्या दुखण्याची माहिती मिळाली होती परंतु त्याचे गांभीर्य समजले नव्हते. त्यांना कर्करोगाने ग्रासले होते. सर,आशुतोष यांनी या काळात त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या. त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रसाद प्रकाशनातर्फे करण्यात आले. चार चाकी गाडी घेण्यात आली. अन अचानक त्याच्या निधनाची बातमी आली. तारीख होती - २८ जून १९९६. तर त्यांचा जन्म झालेला होता १२ ऑगस्ट १९३९ रोजी. उणे-पुरे ५५ वर्षांचे आयुष्य. पण या आयुष्यात त्यांनी खूप काही केले होते. बाईंच्या जीवनाचा विचार केला तर जीवनात त्यांना अनेक दुःखे सहन करावी लागली होती. त्यांच्या पहिल्या मुलाचे निधन अकाली झालेले होते. एक लहान मुलगी होती. आम्ही गेलो की ती सुमधूर हास्य करीत असे. काळाने तिलाही हिरावून नेले. स्वतः बाईंनाही लुनाचा अपघात झाला होता. अनेक दुःखे असूनही त्या आनंदित राहण्याचा प्रयत्न करीत. कामात मन गुंतवीत असत.

बाईंनी खूप काही दिले,केवळ मलाच दिले असे नव्हे तर माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी जीव लावला. त्यांच्यामुळे खूप विद्यार्थी, विद्यार्थिनी आपल्या जीवनात यशस्वी झाले. आम्हाला नवी ओळख मिळाली. माझे गुरू परमपूज्य नारायणकाका ढेकणेमहाराज यांचा माझा संपर्कही त्यांच्यामुळेच झाला. एकदा बाईंनी मला सांगितले काकामहाराज ढेकणे म्हणून साधुपुरुष गंगापूर रोडवर एका आश्रमात असतात. वाटले तर त्याची भेट घे. आणि माझ्या लग्नानंतर मी आश्रमात गेलो. अत्यंत निःस्पृह अशा काकांनी भावी काळात मला मार्गदर्शन केले. हे मोठे भाग्यच! ते लाभले ते रारावीकर बाई यांच्यामुळेच. अन्यथा हा विषयच मला माहिती नव्हता. एक नवा मार्ग त्यामुळे सापडला. आमच्याकडून बाईंच्या काहीच अपेक्षा नव्हत्या. तरीही काही बाबी आपल्याकडून चुकल्या असतील तर त्यांनी क्षमा करावी. या कुटुंबाकडून खूप काही मिळाले. त्यातून उतराई होता येणार नाहीच. मात्र त्याच्या स्मृतींचा नंदादीप कायम मनात तेवत आहे, तेवत राहील. त्यांची सात्त्विकतेची प्रतिमा मनातून कधीही पुसली जाणार नाही, हे मात्र नक्की.

◆◆



# वात्सल्यमूर्ती सहस्रबुद्धे मॅडम

**प्रा. डॉ. अश्विनी कुलकर्णी - धर्माधिकारी**

दिनांक २७ जून १९९६, वेळ दुपारी सव्वा तीन, ठिकाण - आर वाय के कॉलेज ची ज्युनियर कॉलेज बिल्डिंग, ११वी सायन्स चा वर्ग.

एका मध्यमवयीन, सुबक ठेंगणी आकृती असणाऱ्या श्यामल प्राध्यापिकेने अत्यंत शांतपणे, आत्मविश्वासाने माझ्या वर्गातच नव्हे तर माझ्या जीवनातही प्रवेश केला आणि आपली असाधारण बुद्धिमत्ता तसेच विषयाच्या व्यासंगाने मला भारावून टाकले. पहिल्याच लेक्चर मध्ये सहस्रबुद्धे मॅडमनी मला इतके प्रभावित केले की याच विषयात आपण करियर करायचे हे मी त्याच दिवशी ठरवून टाकले.

प्राचीन भारतीय वैदिक ग्रंथांचे संदर्भ देत महर्षी कणाद ते अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स विश्व असा एक मोठा काल प्रवासच मॅडमने आम्हाला अर्ध्या तासात घडवला. सहस्त्रबुध्दे हे आपले आडनाव सार्थ करणाऱ्या मॅडमचे वैशिष्ट्य असे की त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व असले तरी त्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अधिक आपुलकीने मार्गदर्शन करायच्या.

१० वी पर्यंत मातृभाषेत शिक्षण घेणाऱ्या आम्हा मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या भाषिक संघर्षाची जाणीव मॅडमना होती . म्हणूनच त्या आम्हाला सांगायच्या की मी शिकवत असताना जे शब्द समजत नाही ते वहीच्या शेवटच्या पानावर लिहून घ्या आणि तास संपल्यावर माझ्याकडून समजून घ्या.

१९९६ -९८ या दोन वर्षांमध्ये मॅडमनी इलेक्ट्रॉनिक्स तर शिकविलेच पण विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणारी आदर्श प्राध्यापिका कशी असावी याचे उदाहरणच माझ्यासमोर ठेवले. मी विचारलेल्या असंख्य प्रश्नांना न कंटाळता, समर्पक उत्तरे दिली आणि माझ्या भावी आयुष्याचा मार्गच जणू मला आखून दिला. त्यांना रागावलेले मी कधीही पाहिले नाही.

एखादा टॉपिक समजला नाही की मी रडवेली होऊन जायचे. तेव्हा मॅडम मला धीर द्यायच्या.

''अग अश्विनी, तू हुशारच आहेस गं! हा

टॉपिक घरी गेल्यावर पुन्हा वाच, तुला नक्की समजेल आणि नाहीच समजला तर मी आहे ना! मी पुन्हा सांगेन समजावून. '' त्यांच्या अशा आश्वासक प्रोत्साहनाने मला १२ वी ला उत्तम गुण मिळाले.

१२ वी चा रिझल्ट छान लागला या आनंदापेक्षा मॅडम आता रोज भेटणार नाही याची खंत मनात होती. सुदैवाने मला के. के. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजमध्येच ॲडमिशन मिळाली. कंप्युटर इंजिनियरिंगला सहज ॲडमिशन मिळत असताना हा तत्कालीन प्रतिष्ठित करियरचा राजमार्ग सोडून, इलेक्ट्रॉनिक्सकडे वळणाऱ्या मला अनेकांनी वेड्यात काढले होते. पण माझा निश्चय ठाम होता. आई बाबांचा माझ्या निर्णयाला पाठिंबा होता. मी के. के. वाघ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये एम. ई. इलेक्ट्रॉनिक्स पूर्ण केले आणि तिथेच मला अध्यापनाची संधी मिळाली.

लग्नानंतर मी पुण्यात आले आणि COEP च्या इलेक्ट्रॉनिक्स विभागात प्राध्यापिका झाले. इलेक्ट्रॉनिक्स मध्ये पी. एचडी. करताना वारंवार जाणवायचे की सहस्त्रबुद्धे मॅडमनी पाया पक्का केला म्हणून संशोधनाची वाट सुकर झाली. आजही वर्गात जाण्यापूर्वी माझ्या मन:चक्षुंसमोर येते तीच माझ्या गुरू सहस्त्रबुद्धे मॅडमची शांत मूर्ती. याच गुरूने आपल्या ज्ञानाने,मातृ सुलभ वात्सल्याने आणि समंजसपणाने मला माझ्या करियरचा योग्य मार्ग दाखवला. कंपन्यांच्या गलेलठ्ठ पॅकेजच्या मोहाला बळी न पडता शांतपणे आपले ज्ञान पुढच्या पिढ्यांना देण्यातले समाधान अतुलनीय आहे हे मी केवळ त्यांच्यामुळे जाणू शकले.

गुरू पौर्णिमेला आणि शिक्षक दिनाच्या दिवशी माझ्याभोवती मॅडम मॅडमचा गजर करत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले COEP चे मेरिटचे विद्यार्थी जेव्हा गोळा होतात, परदेशात उच्च पदांवर स्थिरावलेले माजी विद्यार्थी व्हिडिओ कॉल करून आशीर्वाद मागतात तेव्हा जाणवते की आपले उत्तरदायित्व मोठे आहे. या सगळ्यांच्या विश्वासाला सार्थ करण्यासाठी सातत्याने अभ्यासाची आणि ज्ञान अद्ययावत असण्याची नितांत गरज आहे.

सहस्त्रबुद्धे मॅडमचा ज्ञानदानाचा वारसा मी माझ्या परीने पुढे नेत आहे. त्यांच्यासारखे १% जरी मला होता आले तरी मी स्वत:ला भाग्यवान समजेन. माझ्या वंदनीय गुरूंना भावपूर्ण आदरांजली!


**म्हणोन जाणतेन गुरू भजिजे।**
**तेणे कृतकार्य होईजे ।**
**जैसे मूळसिंचने सहजे ।**
**शाखापल्लव संतोषती ।।**

**- (ज्ञानेश्वरी)**



# कविताच जगणे, कवितारुपीच उरणे!
# प्रोफेसर व्ही. एच. क्षीरसागर

**डॉ. अंजली पटवर्धन कुलकर्णी**



साधारण नव्वदचे दशक. एच. पी. टी. महाविद्यालयाच्या शिक्षक कक्षात सकाळी सकाळी साडे सातच्या पहिल्या तासाला इंग्रजी विभागातील शिक्षकांची वर्गावर जाण्याची घाई असायची. पहिला तास म्हणजे कम्पल्सरी इंग्लिशचा. या तासानंतर विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या स्पेशल विषयाच्या तासांसाठी वेगवेगळ्या वर्गात निघून जात असत. पण कॉलेजच्या पहिल्या तासाचा मान इंग्रजीच्या प्राध्यापकांचाच! सकाळची ही वेळ गाठणे म्हणजे खूपच कसरत असायची. तासाची बेल होण्या अगोदर वर्गात पोहोचण्यासाठीही धडपड असायची. तेव्हढ्यात क्षीरसागर सर वर्गात जाता जाता भेटायचे. त्या दोन क्षणात त्यादिवशी रेडियो वर मंगलप्रभात मध्ये कोणती भक्तीगीतं ऐकली, किंवा त्यानंतरच्या कार्यक्रमात कोणते भावगीत ऐकले त्याची चर्चा होत असे. सर, आज खूप दिवसांनी, 'रात्र काळी, घागर काळी, यमुना जळे ही काळी हो माय', ऐकले. किंवा 'तुझ्या गळा, माझ्या गळा, गुंफू मोत्याच्या माळा', 'कान्हू घेऊन जाय रानी, धेनु घेऊन जाय', किंवा महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी प्रसारित होणारे नवेकोरे भावगीत. वर्गाच्या दिशेने भर भर पावले टाकतांना पूर्ण वाटच अशी संगीतमय, काव्यमय होऊन जायची. हा कवितांचा. गाण्यांचा परिपाठ बरीच वर्ष चालला. म्हणजे सर राका कॉलनीत वास्तव्याला असे पर्यंत तर अगदी हमखास. नंतर सर इंदिरानगरला राहायला गेले आणि विभागातील आम्ही सगळ्यांनी त्यांना सांगितले की पहिल्या तासाची जबाबदारी आता आमच्यावर सोपवा. इतक्या लांबून पावसापाण्यात, थंडीत इतक्या लवकर येऊ नका, जरा आरामात येत जा. त्यांच्या अत्यंत शिस्तशीर स्वभावात ही गोष्ट बसणारी नव्हतीच पण आमच्या सगळ्यांच्या आग्रहापुढे त्यांनी त्याला मान्यता दिली; पण

त्यामुळे हा काव्यास्वादाचा 'हरिपाठ' थोडा मागे पडला.

पंच्याहत्तर साली नासिक रोड कॉलेजमध्ये बी. ए. च्या पहिल्या वर्षाला असतांना क्षीरसागर सर सगळ्यात पहिल्यांदा भेटले. त्यांनी आम्हाला जेन ऑस्टेन ची 'प्राईड ॲन्ड प्रेज्युडीस' शिकवली. त्यांनी प्रथमतःच कादंबरी ही एखाद्या जीवनपटासारखी कशी समजून घ्यायची, त्यातील पात्रं खऱ्या आयुष्यातील माणसांप्रमाणे कशी अभ्यासायची याची जाणीव करून दिली. कादंबरीतल्या कुटुंबांची ओळख नीट व्हावी, सर्व पात्र लक्षात राहावी म्हणून त्यांनी काढलेली फॅमिली ट्री आजही लख्ख आठवते. सरांच्या तासानंतर प्रश्न विचारायचीही पूर्ण मोकळीक असल्याने त्यांच्याशी अभ्यास आणि इतर गोष्टींसंबंधी चर्चा होत असे, ज्यातून आम्हा विद्यार्थ्यांच्या जाणिवांचे आभाळ विस्तारत असे. सरांचे जसे कथा, कादंबऱ्या शिकवण्यात प्रभुत्व तसेच ते लँग्वेज शिकवण्यात ही निष्णात होते. त्यांनी चार्ली च्या तोंडाचे चित्र काढून शब्दांचे उच्चार कसे निर्माण होतात, द्वायोष्ट्य, दन्त्योष्ट्य, तालव्य, कण्ठ्य इ. इ. समजावून सांगतांना हे सगळे केवळ माहितीच्या स्वरूपात न सांगता एका सुंदर अनुभवाच्या स्वरूपात आमच्या पर्यंत पोहोचवले. परकीय भाषेतील शब्दांचे अचूक उच्चार करायचे तर त्यासाठी उपलब्ध असलेल्या डिक्शनरीचा वापर कसा केला पाहिजे ते शिकवले. कोणावरही अवलंबून न राहता आपल्या आपण अभ्यासाच्या बाबतीत आत्मनिर्भर कसे व्हावे याची ती शिकवण होती, जी आमच्या आयुष्यभर उपयोगी पडली आहे. साहित्याच्या अभ्यासात रुची असणाऱ्या व्यक्ती लँग्वेजच्या अभ्यासात रमत नाहीत असा साधारण अनुभव असल्याने तर लिटरेचर आणि लँग्वेज या मधे एक उभी भिंत असल्यासारखे वाटायचे. मात्र लँग्वेजचा अभ्यासही किती महत्वाचा आहे आणि लिटरेचर समजून घ्यायलाही उपयुक्त आहे हे सरांनीच आम्हाला पटवून दिले. त्यामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मनात ही भिंत अथवा अढी कधीच निर्माण झाली नाही. आम्ही नंतर स्वतःच शिकवायला लागल्यावर सरांनी मनावर बिंबवलेल्या सर्व गोष्टी वर्गात आवर्जून वापरायलाही लागलो.

या दरम्यान सरांच्या व्यक्तिमत्वाचा अजून एक पैलू नव्याने अनुभवायला मिळाला. एक शीघ्र कवी म्हणून त्यांची ओळख आम्हाला झाली. एखाद्या प्रसंगावर तत्काळ चार ओळी जुळून येत असत आणि त्या ऐकण्याचा मान त्यांच्या कुटुंबियांच्या नंतर आम्हा सहकाऱ्यांचा असे. सकाळचा साडेसात चा परिपाठ हुकला तरी साडेनऊला शिक्षक कक्षात मधल्या सुट्टीत चहाच्या सोबत या काव्यास्वदाचा नेम सुरू झाला! अभ्यासक्रमात नेमलेल्या कवितांवर सततच चर्चा होत असे. कवितेतल्या प्रतिमा उलगडून सांगताना नेहेमीच्या अनुभवातून त्या समजावून सांगण्याचा सरांचा आग्रह असायचा. 'मन शुद्ध तुझं, गोष्ट आहे पृथ्वी मोलाची, तू चाल पुढ तुला र गड्या भीती कश्याची?' या गाण्याच्या धर्तीवर त्यांनी कविता लिहिली, –

'रे हसणं तुझ सुद्ध गड्या
लई मोलाचं
तू चाल फूडं तुला र गड्या
औक्ष सुखाचं. '

आणि मला आठवते आहे की त्यावेळी आम्ही एमिली ब्रॉन्टे च्या वूदरिंग हाईट्स मधल्या हीथक्लिफ या पात्रा विषयी बोलतांना

त्याचे वर्णन सरांनी या शब्दात केले.

सरांचा क्रिकेट हाही अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. क्रिकेटमधल्या उपमा तर अनेकदा दिल्या जात. त्यांच्या 'बाप्पाचा बड्डे' ही किशोर २००८ मध्ये प्रसिद्ध झालेली लहान मुलीची - अपूर्वाची कथा. अपूर्वाच्या चौकार, षटकार, आणि शाब्दिक बौन्सरने वाचकाला पायचीत, धावचीत, क्लीनबोल्ड केलेले आहे. लहान मुलांच्या साहित्यामधेही सरांनी मोलाची भर घातली आहे. बालभारती मध्ये त्यांची एक कविता प्रसिद्ध झाली होती जी कोड्याच्या स्वरुपात होती. शिक्षक म्हणून, लेखक म्हणून मुलांना रिझवत त्यांच्यावर संस्कार करण्याचे अत्यंत मोलाचे कार्य क्षीरसागर सरांनी केले. स्वतःच्या आनंदासाठी केले; पण त्याचसोबत इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न सातत्याने केला.

महाराष्ट्राचे भूषण असलेले सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांच्या लेखनाप्रती सरांना विशेष ममत्व वाटत असे. स्रग्धरा, दिवाळी १९९७ च्या अंकात त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता - 'इंग्रजी पुलंच्या कलाइडस्कोप मधून' ज्यामध्ये पुलंच्या पात्रांच्या तोंडी असलेल्या इंग्रजी भाषेबद्दलचे अनेक बारकावे लक्षात आणून दिले आहेत. मात्र शीर्षकामध्ये असलेला इंग्रजी शब्दाचा अचूक उच्चार देऊन अनेकांची कलाइडस्कोपबाबत उच्चारात होणारी चूक अलगद लक्षात आणून दिली आहे. उत्तम शिक्षकाचे हेच तर लक्षण असते, ज्ञानाचा डोस द्यायचा पण नकळतपणे!

सरांचे भाषा, साहित्य, क्रिकेट, मैदानी खेळ या आवडीच्या विषयांबरोबरच गाण्याची उत्तम जाण आणि गळ्यातही गाणे होते. त्यांनी लिहिलेल्या 'एक प्रवचन' या कवितेत धर्मोपदेशक बोलायला सुरवात करण्याआधी एका पाखराने गाणे म्हणायला सुरवात केली. मोकळ्या मनाने आणि मोकळ्या गळ्याने ते गाऊ लागले. जमलेली सगळीजणं सर्वांगाचे कान करून गाणं ऐकत होती. संपूर्ण सभाच जणू गाणं झाली. मनसोक्त गाण गाऊन पाखरू गेले उडून, आणि त्यादिवशीचे प्रवचन तिथेच संपले. स्वच्छंदी मनाने गायलेले गीत ही एक प्रार्थना कशी बनू शकते याचे हे सुंदर उदाहरण आहे.

प्रसिद्धीची फारशी हौस नसलेल्या क्षीरसागर सरांनी त्यांच्या कविता, लेख पुस्तक रूपाने प्रकाशित व्हावे म्हणून विशेष काही प्रयत्न केले नाहीत. मात्र त्यांच्या कवितांच्या आशयावर, विचारांवर लोभ असलेले त्यांचे अनेक विद्यार्थी, सहकारी चाहते आहेत.

आमच्या घराच्या वास्तुशांतीचे आमंत्रण त्यांना द्याला गेले तेंव्हा त्यांनी विचारले होते, अंजली भेट काय हवी नवीन घरासाठी? मी क्षणाचाही विचार न करता म्हटले होते एक नवी कविता. सरांनी आमच्या घरावरच 'परिश्रम'वरच, 'परिश्रम सुखावले' अश्या नावाची कविता करून ३० एप्रिल १९९९ या वास्तुशांतीच्या दिवशी आम्हाला दिली. ती त्यांच्याच हस्ताक्षरात सोबत देत आहे. ही भेट आमच्या साठी अत्यंत मौल्यवान आहे, जी आजही जपून ठेवलेली आहे. सर आमच्या सोबत कवितारूपाने आजही आहेत असा विश्वास वाटतो.

सरांच्या सोबतचे ऋणानुबंध सुरवातीला शिक्षक, आणि नंतर वरिष्ठ सहकारी एवढेच मर्यादित स्वरूपात कधीच नव्हते. त्यांचे अनेक विद्यार्थी त्यांच्या कुटुंबाचा भाग बनले होते.

आज सर नाहीत; परंतु क्षीरसागर मॅडम, त्यांची मुले अपर्णा आणि अमोघ, यांच्याशी आजही तितकेच आपुलकीचे नाते टिकून राहिलेले आहे. (हा लेख लिहितांना सरांचे चिरंजीव श्री. अमोघ यांचे खूप मोलाचे सहकार्य मिळाले.)

एच. पी. टी. महाविद्यालयाच्या शतकमहोत्सवी वाटचालीमध्ये ज्या अनेक आदर्श शिक्षकांचा वाटा आहे त्यात एक क्षीरसागर सर नक्कीच आहेत. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचा डंका महाराष्ट्राबाहेरही गाजवणारे आमच्या अनेक गुरुजनांना स्मरतांना प्रकर्षाने आठवण होते ती क्षीरसागर सरांच्या योगदानाची.

कविवर्य कुसुमाग्रजांच्या शब्दात सांगायचे तर क्षीरसागर सरांचे जगणे होते गाणे!

जाता जाता गाईन मी<br>
गाता गाता जाईन मी<br>
गेल्यावरही या गगनातील<br>
गीतांमधुनी राहीन मी

म्हणूनच कविताच जगणे, कवितारूपीच उरणे! प्रोफेसर व्ही. एच. क्षीरसागर सरांच्या स्मृतीस विनम्र वंदन.

## परिश्रम सुखावले

**शब्दकोषातील शब्द<br>
त्यांचे सुखंटाचे जगणे<br>
साहित्य सोनियाच्या खाणी<br>
फुलपाखरांचे जिणे...**

**कुठे आंग्लशब्द कळा<br>
कुठे मराठीचे लेणे<br>
त्याच फुलांची ओंजळ<br>
तुम्हा दोघा हाती येणे...**

**शब्द सौंदर्याच्या काठी<br>
घर दोघांना लाभले<br>
झाले 'परिश्रम' भारी<br>
आज तेच सुखावले...**

**आत माणसे विसावली<br>
तीच घराची सावली<br>
यश दोघांचे वर जाई<br>
त्याला कमान लाभली...**

**शुभ आशीष थोरांचे<br>
खरे घर हे मायेचे<br>
माया अक्षर धनाची<br>
मोल अक्षय हो त्याचे...**

**घर गाभारी तुमच्या<br>
दिवा राहो प्रकाशता<br>
ज्ञान आनंद सुखाचा<br>
देव होईल रे दाता...**

**- वि. ह. क्षीरसागर**



# प्रा. त्र्यंबक शंकर बोराटे : तत्त्वनिष्ठ शिक्षक

**डॉ. प्रणव रत्नपारखी**



साधारणता वर्ष २०००-२००१ मधली ही घटना असेल. मी माझे पदवीचे शिक्षण संपवून एच. पी. टी. महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर विभागात इंग्रजी विषयाला प्रवेश घेण्यासाठी आलो. मला एच. पी. टी. महाविद्यालय हे काही नवीन नव्हते. कारण माझ्या आधीच्या दोन पिढ्या येथेच शिकलेल्या. त्यामुळे इथले वातावरण, परिसर हे माहित होते. त्याआधी मी याच ठिकाणी 'इंग्रजी' सर्टिफिकेट कोर्स केला होता. तेव्हा इंग्रजी विभागाचे प्रमुख क्षीरसागर सर होते. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले आणि नवीन विभागप्रमुख आले आहेत असे समजले.

आम्ही काही विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी स्टाफरूमजवळ उभे राहून इंग्रजी विभागप्रमुखांची वाट पाहत होतो. तेव्हाच एक व्यक्ती तेथे आली आणि आम्हाला विचारले, तुम्ही सगळे इंग्लिशला ॲडमिशन घ्यायला थांबले आहात का? एवढा वेळ रांगेत कशाला उभे राहिलात? सरळ डिपार्टमेंटला येऊन सही घ्यायची ना. ही माझी बोराटे सरांशी झालेली पहिली भेट. धिप्पाड शरीरयष्टी, सावळा वर्ण, चष्म्याच्या आडून दिसणारे मोठे डोळे आणि एक खांदा उडवत बोलण्याची त्यांची लकब ही पहिल्या भेटीतच मनावरती छाप पडून गेली. त्यांची विद्यार्थ्यांबद्दलची असलेली संवेदनशीलता ही जाणवून गेली. माझा फॉर्म चेक करताना 'अच्छा तू उल्हासचा मुलगा का?' हे त्यांचे वाक्य माझी त्यांच्याबद्दलची आलेली थोडीफार धास्ती देखील पूर्णपणे कमी करणारी ठरली. ते माझ्या वडीलांचे कॉलेज काळातले मित्र. बोराटे सर दिंडोरी जवळच्या म्हेळुस्के गावातले. प्राथमिक शिक्षण पूर्ण करून, नाशिकला ते पुढील शिक्षणासाठी आले आणि एच. पी. टी. कॉलेजमध्येच प्रवेश घेतला त्यावेळी माझे वडील, माझा मामा आणि बोराटे सर हे वर्गमित्र. ही सगळी ओळख नंतर सरांनीच मला सांगितली. बरीच घरची चौकशी देखील केली.

सरांच्या बोलण्यामधला निर्व्याजपणा आणि थेट संवाद साधण्याची कला पहिल्या भेटीतच जाणवली. त्यानंतर काही दिवसातच आमचे एम. ए. वर्ग सुरू झाले आणि पहिल्याच दिवशी बोराटे सर तास घ्यायला वर्गात आले. त्यांचा वर्गातला वावर हा अतिशय सहज पण शिस्तबद्ध असणारा असा होता. विद्यार्थ्यांचा परिचय करून घेणे किंवा प्रत्येकाला नाव विचारणे या कुठल्याही भानगडीत न पडता सरांनी सरळ आपल्याला एम. ए. ला कुठला अभ्यासक्रम आहे, किती पेपर्स आहेत, कुठला साहित्यप्रकार शिकायचा आहे याची सविस्तर चर्चा केली. परीक्षांचे स्वरूप, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप हे सगळेच पहिल्या दिवशी सांगून टाकले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन कसे केले पाहिजे याबद्दलही विस्तृतपणे बोलले. साधारणतः ७० मिनिटे ते आमच्याशी बोलत होते. मात्र त्या काळात त्यांनी ना कुठला कागद पाहिला ना कुठले पुस्तक हातात घेतले. एम. ए. च्या पहिल्या वर्षांचा चारही पेपरचा अभ्यासक्रम त्यांचा तोंडपाठ असल्याचे आमच्या सगळ्याच विद्यार्थ्यांच्या लक्षात आले. ही व्यक्ती काहीतरी असामान्य आहे याची चुणूक आम्हाला पहिल्याच तासाला जाणवली आणि नंतर पुढे १२ ते १५ वर्षे बोराटे सरांच्या सहवासात राहिल्यानंतरही ही समजूत दिवसेंदिवस पक्कीच होत गेली.

बोराटे सरांचा इंग्रजीमधील पुणे विद्यापीठ परिक्षेत्रातील एक ख्यातनाम प्राध्यापक हा नावलौकिक का होता याची प्रचिती आम्हाला पहिल्या काही दिवसातच पटली. इंग्रजी साहित्याचा इतिहास त्यांनी सविस्तरपणे उलगडून सांगितला होता. साधारणता चार ते पाच तासात चॉसरपासून आधुनिक इंग्रजी साहित्यामधल्या अनेक प्रवाहांचा आढावा त्यांनी आमच्यासमोर अलगद उलगडून दाखवला. एवढे शिकवल्यानंतर हे सगळे मी शिकवण्यासाठी कुठल्या पुस्तकांचा वापर केला आहे ती 'पेलिकन सिरीज' आम्हाला दाखवली. वर्गात शिकविण्यासाठी शिक्षक स्वतः वापर करीत असलेली संदर्भ पुस्तके सहसा विद्यार्थ्यांसमोर सांगत नाहीत. त्या काळात जेव्हा इंटरनेट फारसे प्रचलित नव्हते त्या काळात तर असे संदर्भ ग्रंथ पटकन कोणाला सांगणे हे दुरापास्तच होते. मात्र बोराटे सरांनी आपल्याला जे माहित आहे, समजले आहे ते सगळे विद्यार्थ्यांना मुक्तहस्ताने देण्याचे धोरण कायमच स्वीकारले होते. त्यामुळे वर्गात त्यांच्या शिकवण्यादरम्यान तर ते मुलांच्या शंकांची उत्तरे देत असतच मात्र त्यांचा तास संपल्यानंतरही महाविद्यालयाच्या कॉरिडॉरमध्ये अनेक विद्यार्थी त्यांच्याशी चर्चा करत उभे दिसायचे. विद्यार्थी प्रथम वर्षाचा असो किंवा पदव्युत्तर वर्षाचा बोराटे सर त्याच्याशी किंवा तिच्याशी त्याच उत्साहाने, आत्मीयतेने बोलत असत. गरज पडली तर आम्हाला स्वतः ग्रंथालयात घेऊन जात असत आणि काही पुस्तके स्वतःच्या नावावर घेऊन आम्हाला देत असत.

बोराटे सर हे प्रखर बुद्धिमत्तेचे धनी तर होतेच पण त्यांच्याकडे अतिशय तीक्ष्ण अशी विश्लेषण क्षमता होती. त्यांचे इंग्रजी भाषा आणि इंग्रजी साहित्य या दोन्हीही गोष्टींवरती प्रभुत्व होते. इंग्रजी शिकवणाऱ्या प्राध्यापकांमध्ये साधारणता इंग्रजी भाषा, व्याकरण शिकवणारे किंवा इंग्रजी साहित्य शिकवणारे असे गट आढळून येतात. मात्र बोराटे सर याला अपवाद होते. ते इंग्रजी भाषाशास्त्र, इंग्रजी साहित्य, अमेरिकन साहित्य आणि विशेष म्हणजे साहित्यिक समीक्षा (लिटररी क्रिटीसिझम) या सर्व क्षेत्रांमध्ये नैपुण्याने संचार करू शकत होते. त्यामुळे त्यांनी आम्हाला

ॲरिस्टॉटल, लॉनजायनसपासून मिल्टन, ड्रायडन, डी. एच. लॉरेन्स, शॉ आणि अगदी सस्सुरचे भाषाशास्त्र शिकविले.

वर्गात शिकवत असताना सरांनी कधीही स्वतःच्या आवडीनिवडीमध्ये आणल्या नाहीत. प्राध्यापक म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या काही विशेष आवडी आणि काही न आवडणाऱ्या लेखक, कलाकृती असतातच. प्राध्यापक म्हणून बोलत असताना त्या नकळत वर्गात विद्यार्थ्यांसमोर उघड केल्या जातात. (हा अनुभव मी स्वतः प्राध्यापक म्हणून घेतला आहे.) मात्र बोराटे सर याला अपवाद होते. त्यांनी कधीही कुठल्याही लेखकाबद्दल अशा प्रकारची व्यक्तिगत टीकाटिपणी केल्याचे मला आठवत नाही. अभ्यासक्रमात नेमलेल्या सर्व लेखक आणि कलाकृतींकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्या अर्थाने तटस्थ असाच असायचा. लेखक/लेखिका आणि त्यांनी लिहिलेली पुस्तके याच्या मर्यादेतच त्यांचे शिकवणे असायचे. जसा एखादा समीक्षक तटस्थपणे साहित्यिक कलाकृतीचे समीक्षण करतो. त्यात स्वतःच्या आवडीनिवडी, मते तो मिसळत नाही. त्याच प्रकारे बोराटे सर सुद्धा वर्गात शिकवत असताना त्यांच्या व्यक्तिगत आवडीनिवडी कधीही मिसळू देत नसत. पुढील काळात प्राध्यापक म्हणून काम करत असताना मला हा शिक्षकाचा अत्यंत महत्त्वाचा गुण आहे असे जाणवत गेले.

बोराटे सर वर्गामध्ये शिकवत असताना फळ्याचा वापर अतिशय उत्तम करत असत. तासाच्या सुरुवातीला फळ्याच्या डाव्या बाजूला ते त्या दिवशी शिकवणार असलेल्या गोष्टींचे महत्त्वाचे मुद्दे लिहून ठेवत असत. मग उरलेल्या भागामध्ये विविध प्रकारे शब्द, वाक्य, त्यांचे अर्थ किंवा साहित्यकृतीतील काही संकल्पना त्यांचा एकमेकांशी असणारा अंतरसंबंध हे स्पष्ट करून सांगत. ॲरिस्टॉटलची शोकांतिकेची व्याख्या शिकवत असताना त्यांनी त्या मोठ्या व्याख्येचे छोटे छोटे तुकडे करून चार भागांमध्ये आमच्या समोर ती पूर्ण व्याख्या फळ्यावर लिहून काढली होती. त्यासाठी त्यांनी विविध रंगातील खडूंचा वापर केला होता. आजही साधारण वीस वर्षानंतर बोराटे सरांनी फळ्यावर लिहिलेली ती व्याख्या माझ्या डोळ्यासमोर आहे. सरांच्या प्राध्यापक म्हणून असणाऱ्या या म्हटल्यातर छोट्या गोष्टींचा नंतरच्या काळात मी प्राध्यापक झाल्यानंतर मोठा फायदा मला शिक्षक म्हणून झाल्याचे जाणवले.

सर हे वर्गात शिकवत असताना संपूर्ण लक्ष हे त्या मुद्द्यावर किंवा पुस्तकावर देत असत त्याच्याशी संबंधित उदाहरणे ते नक्कीच देत असत. मात्र विषयाला सोडून कुठल्याही प्रकारच्या चर्चा ते वर्गात करत नसत. वेळेचा पुरेपूर वापर कसा करावा, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. विद्यार्थी म्हणून बोराटे सरांची एक प्रचंड छाप आमच्या सगळ्यांच्या मनावर त्यांच्या या गुणांमुळे तयार झाली. वर्गाबाहेरही त्यांचे वागणे हे अतिशय संयत, विद्यार्थ्यांची आपुलकीने चौकशी करणारे आणि त्यांना ज्या प्रकारे शक्य असेल त्याप्रकारे मदत करण्याचे असायचे. स्वत: अतिशय सामान्य परिस्थितीतून वर आल्याने सरांना सामान्य विद्यार्थ्यांच्या व्यथा लगेच समजत असतात. हे करत असताना विद्यार्थ्यांना स्वतः बद्दलचे कुठलेही गैरसमज होऊ न देण्याची ते काळजी ही ते घेत. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना तुला हा अभ्यासक्रम पेलवणार नाही किंवा तुला इंग्रजी

करून भवितव्य फार चांगले नाही असे स्पष्ट सांगितल्याचे देखील मला आठवते. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय हातोटीने समजून देत असतानाच त्यांच्यामध्ये कुठल्याही प्रकारे स्वतःबद्दलचे किंवा करिअर बद्दलचे गैरसमज तयार होऊ नयेत याची काळजी देखील सर घेत असत. त्यांच्या या परखड पण काळजीपोटी केलेल्या कृतीमुळेच पुढे अनेक विद्यार्थी हे त्यांचे आयुष्यभर ऋणी राहिले आहेत.


दोन वर्ष सरांच्या वर्गात शिकल्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे २००२ मध्ये मी प्राध्यापक म्हणून गोखले एज्युकेशन सोसायटी मध्ये कार्यरत झालो. त्या काळात मी नेट आणि सेट या परीक्षांची तयारी करत होतो. त्यानिमित्ताने बोराटे सरांशी कायम संवाद व्हायचा. या परीक्षांसाठी कुठल्या प्रकारची स्ट्रॅटर्जी करायला हवी याचा विचारही सरांनी अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने केला होता. विद्यापीठाच्या परीक्षांपेक्षा स्पर्धा परीक्षा म्हणून या परीक्षांकडे तुम्ही बघा, असे ते आम्हाला कायम सांगत. अनेक वेळा त्यांनी त्यांच्या स्वतःची पुस्तके, त्यांनी काढलेल्या नोट्स आम्हाला अभ्यासासाठी उपलब्ध करून दिल्या होत्या.

नंतर मी एच. पी. टी. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून आल्यानंतर बोराटे सरांच्या हाताखाली जवळपास चार वर्ष काम करण्याचे भाग्य लाभले. निवृत्तीकडे आलेले सर आणि अध्यापन क्षेत्रात नुकताच प्रवेश केलेला मी आणि त्यातही त्यांचा विद्यार्थी असे असूनही सरांनी विभागामध्ये तसे कधीही जाणवू दिले नाही. त्याकाळी इंग्रजी विभागात सगळेच अनुभवी शिक्षक होते. त्यांच्यामध्ये मीच एक नवखा होतो. मात्र पहिल्या वर्षापासूनच सरांनी विभागातील अनेक कामांची जबाबदारी माझ्याकडे दिली. काही नवीन कल्पना मी मांडली तर ते आवर्जून त्याचा विचार करत असत. विभागातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या मजकुराचा वॉलपेपर असावा, ही माझी कल्पना सरांनी लगेच अंमलात आणली. संगणक वापरात त्यांना जिथे जिथे माझी मदत आणि काही वेळा मार्गदर्शनही लागले तरी ते विचारायला अजिबात मागे पुढे बघत नसत. अनेक वेळा विभागामधल्या कम्प्युटरवर सर माझ्याकडून एम. एस. वर्ड किंवा एक्सेलच्या अनेक गोष्टी समजून देखील घेत असत. आपल्याला जे शिकायचे आहे ते कोणाकडूनही शिकावे हा त्यांचा शिरस्ता. वयाच्या बऱ्याच उशिरा त्यांनी संगणक शिक्षण घेतले. एम. एस. सी. आय. टी. चा कोर्सही पूर्ण केला. तो केवळ कागदावर न ठेवता त्याचा दैनंदिन जीवनात ते अतिशय सुयोग्य वापर करत असत. त्यांनी खास घरी देखील संगणक घेतला होता. विभागाचे सर्व काम ते त्या संगणकावर करत असत. नवीन शिकण्याची त्यांची आवड ही कायम टिकून होती. ग्रंथालयात आलेले नवीन पुस्तक असो किंवा नवीन अभ्यासक्रमाची आलेली संदर्भ पुस्तके किंवा संगणकातील काहीतरी नवीन विषय याचा ते आवर्जून पाठपुरावा करत असत. सातत्याने नवनवीन गोष्टींचा ते शोध घेत राहिले.

प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी दोन वर्ष आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून देखील काम केले एच. पी. टी. महाविद्यालयात अनेक वर्ष त्यांनी विद्यार्थी सभा, सांस्कृतिक सभा अशा अनेक विभागांची जबाबदारी सांभाळली होती. एच. पी. टी. महाविद्यालयासारख्या मोठ्या महाविद्यालयाचे


संपूर्ण वेळापत्रक त्यांनी बसवून देण्याचे अवघड काम एक हाती केले होते. नॅकच्या सुरुवातीच्या काळात सरांनी अनेक विभागांना नॅकभेटीदरम्यान कशा पद्धतीचे सादरीकरण करावे हेही सांगितले होते. प्राध्यापक संघटनेमध्ये देखील त्यांचे योगदान मोठे होते. आपल्याला जे काम करायचं आहे ते नीट समजून, सुस्पष्ट रीतीने त्याची आखणी करून ते तडीस न्यायचे हाच कायम त्यांचा नेम असायचा. आपल्याला जे वाटले, जे रुचले ते स्पष्टपणे, कोणताही मुलाहिजा न बाळगता व्यक्त करायचे, हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे अनेकवेळा त्यांचाबद्दल गैरसमज ही होत असत. मला एक प्रसंग आठवतो. विद्यापीठाकडून नवीन अभ्यासक्रम लागू झाला होता. त्यानुसार लिहिलेले एक पुस्तक प्रथम वर्षाला लागू केले होते. संभाषण कौशल्यांशी संबंधित ते पुस्तक होते. बोराटे सरांनी त्या पुस्तकातल्या व्याकरणाच्या, भाषेच्या आणि काही मुलभूत संकल्पनेच्या चुका विस्तृतपणे लिहून काढल्या आणि त्या विद्यापीठाकडे पाठविल्या. विशेष म्हणजे ते पुस्तक लिहिणाऱ्या लेखक समूहातील काही प्राध्यापक हे बोराटे सरांचे जवळचे स्नेही होते. तरीही सरांनी त्यांना जे योग्य वाटले ते केले. सरांबाबत असे अनेक अनुभव सांगत येतील. मात्र त्यांच्या परखड विचारामध्ये कुठेही खुनशीपणा किंवा कोणाचे नुकसान करण्याचा अजिबात हेतू नसायचा. याच काळात मी जाई निंबकर यांची 'टेंपररी आन्सर्स' ही कादंबरी शिकवत होतो. बोराटे सरांच्या एम. फील संशोधनाचा विषय हा जाई निंबकरांच्या कादंबऱ्या असल्याने मी सरांकडे त्यांचा थेसिस मागितला. सर दोन दिवसांनी तो घेऊन आले. मला थेसिस दिला आणि सांगितले कि, ह्या अभ्यासाला आता बरेच वर्ष झाले आहेत. त्यातील आता किती उपयोगी पडेल हे मला माहित नाही. आता वाचल्यानंतर यातल्या अनेक गोष्टी मलाही पटत नाहीयेत. स्वतः केलेल्या अभ्यासाबद्दल हे असे बोलायचे धाडस कोण करेल? एकदाच काही तरी करून त्याच्या जोरावर आयुष्य काढणारी मंडळी शिक्षण व्यवसायात जागोजागी पहायला मिळतात. अशा धुराळ्यात बोराटे सरांचे हे वाक्य म्हणजे आत्मभानाची प्रचीतीच म्हणावी लागेल. त्यामुळेच प्रचंड क्षमता असूनही आणि सहज शक्य असूनही त्यांनी पीएच.डी. ची पदवी पूर्ण केली नाही. कारण त्यासाठी करावी लागणारी तडजोड सरांना मानविणारी नव्हती.

प्रा. त्र्यंबक शंकर बोराटे इंग्रजी भाषा, साहित्य याची प्रचंड विद्वत्ता असलेला, मात्र त्याबद्दलचा कुठलाही अहंकार न बाळगणारा एक प्राध्यापक. सरांचे वर्गातले शिकविणे, त्यांचा विद्यार्थ्यांमधला वावर, अभ्यासूवृत्ती, कामामधली अचूकता, स्पष्टवक्तेपणा आणि आपल्या तत्त्वांशी कधीही तडजोड न करण्याची भूमिका यामुळे बोराटे सर हे प्राध्यापक म्हणूनच त्यांच्या विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहिलेच. मात्र आयुष्याच्या अनेक प्रसंगी त्यांच्या अनुपस्थितीत देखील त्यांची आठवण कायम येत असते ते त्यांच्या या निरलस व्यक्तीमत्वामुळेच. तत्त्वनिष्ठ भूमिका शिकवणारा एक चिंतनशील आणि परखड समीक्षा करणारा व्यक्ती म्हणून देखील ते कायमच लक्षात राहतील. एच. पी. टी. महाविद्यालयातील ख्यातनाम प्राध्यापकांच्या मांदियाळीत आणि ज्यांनी या महाविद्यालयाचे नाव मोठे केले त्यात बोराटे सरांचे नाव कायमच अग्रस्थानी राहील.



# स्थितधी आचार्यः
# कुलकर्णी मनोहर महोदयः

**हुन्नरगीकर लीना**



एखाद्या व्यक्तीचे आपण नांव ऐकतो. त्या व्यक्तीचे नाव तिच्या क्षेत्रातले खूप नावाजलेले असे नाव असते. आपण आपल्या शैक्षणिक कालावधीत त्या व्यक्तीच्या कार्याचा गौरव पहात असतो, तिला ऐकत असतो; परंतु आपल्या स्वभावगत लाजाळूपणामुळे आपण त्या व्यक्तीशी प्रत्यक्ष बोलत नाही; पण त्यांच्याबाबत ऐकत असतो आणि ऐकतांना त्या व्यक्तीविषयीचा आदरभाव प्रतिक्षणी वाढतच जातो. आदरणीय डॉ. म. बा. कुलकर्णी यांच्याबाबत माझे असेच काही घडले आहे.

डॉ. म. बा. कुलकर्णी...संस्कृतचे गाढे अभ्यासक, वैदिक साहित्य, रामायण, महाभारत, अभिजात संस्कृत साहित्य आणि त्यातील नाट्य, काव्य इ. विविध विषय, इतिहास, स्मृती वाङ्मय, भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र अशा विविध क्षेत्रात अधिकार असणारे बहुआयामी व्यक्तित्व म्हणजे डॉ म. बा. कुलकर्णी. शब्दचर्चा, नव्याने रामकथा गाऊ, पराक्रमी युवक अनंत कान्हेरे, व्यावहारिक शहाणपणासाठी ३०१ सुभाषिते, मनु आणि स्त्री, पुनर्जन्म भगवद्गीतेतील विवेचन अशा ग्रंथांचे त्यांनी केलेले लेखन म्हणजे त्यांच्या सखोल चिंतनाचे फलितच आहे.

नामूलं लिख्यते किञ्चित्, ह्या वचनाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सरांचे लेखन!!! संत गुलाबराव महाराज म्हणत असत की, युक्तीने पटवून देणे हा माझा बाणा आहे. सरांचे लेखन वाचताना गुलाबराव महाराजांच्या या वचनाचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. अध्यापन असो, व्याख्यान असो अथवा लेखन असो, आपले विचार अत्यंत मुद्देसूद पद्धतीने, तर्कशुद्धतेने मांडत असत. प्रखर बुद्धिप्रामाण्य असले तरी अतिशय संवेदनशीलता सरांच्या व्यक्तिमत्त्वात प्रतीत होते. आपल्या विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक करणारे, त्यांच्यातल्या प्रतिभेला जाणणारे आणि जपणारे, असे सर होते. मला

आठवते की, सरांनी रत्नागिरीमधील आपल्या एका अंध विद्यार्थ्याच्या अभ्यासूपणाचे भरभरून कौतुक केले होते. तो कसा भगवद्गीतेच्या तासांना लक्ष देऊन ऐकत असे, तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास करत असतांना, तो कसा विविध टीकांचा अभ्यास करत असे, त्याच्यामुळे आपणही कसे अधिक उत्साहाने अध्यापन करत असू इ. गोष्टी सरांनी त्यावेळी अगदी मन लावून सांगितल्या होत्या. सरांचे हे सर्व बोलणे ऐकत असतांना, त्यांच्यातील प्रसन्न, समाधानी झालेला असा अध्यापक मला दिसला.

लौकिक अर्थाने, मी सरांची विद्यार्थिनी कधीही नव्हते; परंतु सरांना पहात - पहात, त्यांचे लेखन वाचत असतांना, त्यांच्याकडून नकळत पुष्कळ शिकत गेले. खरे शिक्षण अशा चिंतन, मननशील अध्यापकांच्या सहवासातच घडत असते. सरांशी माझा प्रत्यक्ष संपर्क आला २०१२ च्या सुमारास, त्या आधी त्यांच्या लेखनाने माझ्यावर संस्कार केले. सार्वजनिक वाचनालयाच्या 'पुस्तक मित्र' या उपक्रमात सरांच्या 'पुनर्जन्म भगवद्गीतेतील विवेचन' या पुस्तकावर बोलावयाचे होते. सरांची अशी इच्छा होती की, ह्या उपक्रमात कोणीतरी विद्यार्थीवजा नव प्राध्यापकाने बोलावे. सुदैवाने ही संधी मला मिळाली आणि सरांची आणि माझी प्रत्यक्ष भेट घडून आली.

सरांविषयी मनात प्रचंड आदर होताच, त्याबरोबर त्यांचे लेखन वाचल्यामुळे त्यांच्यातील गभीर, चिंतनशील, विद्वत्तापूर्ण, व्यासंगी अभ्यासकाचीही जाणीव होती. सरांच्या घरी गेल्यावर, माझ्या मनावरील एक आदरयुक्त दडपण दूर झाले ते सरांच्या पत्नींच्या सुहास्य वदनाने!!! सरांनी अतिशय प्रेमाने मला त्यांच्या खोलीत बोलावले आणि हे पुस्तक वाच आणि तुला काय वाटते, समजते ते सांग, असे सांगितले. त्यावेळी अतिशय आस्थेने सरांनी आणि त्यांच्या पत्नींनी माझी चौकशी केली. एच. पी. टी. महाविद्यालयातील, नासिकरोड महाविद्यालयातील त्यांच्या आठवणी त्यांनी सांगितल्या. रत्नागिरी महाविद्यालयातील काही गोष्टी सांगितल्या.

सरांच्या बोलक्या स्वभावामुळे ते खूप वेळ बोलत होते, आठवणी सांगत होते. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा जाणविलेला विशेष म्हणजे, सरांची धैर्यशीलता, संयम, आपल्या जीवनात येणा–या अडचणींनी हताश न होता, त्यांचा हसतमुखाने सामना करणे, आपला व्यासंग जोपासताना, अभ्यास पुढे नेत असतांना, संस्कृत भाषा सेवेचे हे व्रत, हो हाच शब्द योग्य आहे कारण सरांनी खरंच या भाषेच्या सेवेचे व्रत घेतले होते, सांभाळतांना, आपल्यातील कुटुंब वात्सल्य पण सरांनी जपले होते. आपली नातवंडे, त्यांचे अभ्यासाचे विषय या विषयी पण ते बोलत होते. हे सर्व ऐकताना वाटले की, भगवद्गीतेवर सरांनी केवळ पुस्तक लिहिलेले नाही तर माऊली एक तरी ओवी अनुभवावी असे म्हणतात त्याप्रमाणे सरांनी भगवद्गीता पूर्णतः जगली आहे. गीतेतील स्थितप्रज्ञलक्षणांचे स्मरण होऊन, जणू काही श्रीकृष्णाने सांगितलेल्या स्थितप्रज्ञाची प्रत्यक्ष भेट झाली, असे वाटले.

सरांच्या स्वभावातील अजून एक विशेष इथे नोंदवावासा वाटतो. सरांनी दिलेले पुस्तक वाचून, पुनः सरांकडे गेले तेव्हा सरांनी त्यातून तुला काय समजले असे विचारले असतां, मला जे आकलन झाले ते मी सांगितले. आमच्या दोघांच्या मतांत काहीसा भेद होता; पण सरांनी तो मान्य केला आणि स्वतःचे मत तर्कशुद्ध पद्धतीने मांडून दाखविले, आणि पटवून दिले. आपल्यापेक्षा

वयाने, अनुभवाने लहान असणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र मते असतात आणि ती मांडण्यासाठी मोठ्या व्यक्तींनी त्यांना प्रोत्साहन द्यावयाचे असते, हा सरांचा गुणविशेष त्याठिकाणी खूप भावला. आपली मते तर्कशुद्ध पद्धतीने कशी मांडावीत, हे त्यांच्या त्यावेळच्या बोलण्यातून उमगले.

पुस्तक मित्र उपक्रमाच्या नंतरही सरांच्या घरी पुष्कळ वेळा मी जात असे. विविध विषयांवरच्या गप्पा आणि त्यातून सहजपणे होत जाणारे अध्ययन, हा सरांच्या सहवासातील अनुभव खूप काही संस्कार करून गेला. देवस्थळी सर आमच्या दोघांचेही एका अर्थाने दैवतच!!! सरांच्या विद्यावाचस्पती उपाधीच्यावेळी डॉ. गो. वि. देवस्थळी त्यांचे मार्गदर्शक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सरांनी ब्राह्मण ग्रंथांतील कथांवर खूप अभ्यासपूर्ण असा प्रबंध लिहिला होता. तो प्रबंध पहाण्याचे, काही अंशी वाचण्याचे मला सद्भाग्य लाभले. प्रमुख ब्राह्मग्रंथ मिळविणे, त्यांचा सटीक अभ्यास करणे, त्यांतील कथांचे उद्देश समजून घेण्यासाठी यज्ञ विधींचे अध्ययन करणे, त्यांचा तौलनिक विचार करणे, अशा कितीतरी गोष्टी या प्रबंधात सरांनी विचारात घेतल्या होत्या. ज्याकाळी पुस्तके उपलब्ध होणेही अतिशय अवघड होते, त्याकाळी सरांनी केलेले हे महत्प्रयास पण बोलके आहेत. सरांचा तो प्रबंध बघितल्यावर, न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः, असे सुवचन लिहिणाऱ्या भर्तृहरीचे स्मरण झाले.

आपले अध्ययन करत असतांना, समाजात घडणाऱ्या गोष्टींबाबत ते नेहमी सजग असत. नुसते सजग नव्हे तर चुकीच्या समजांना आळा बसावा म्हणून ते क्रियाशीलही असत. मनुस्मृतीवरील 'मनु आणि स्त्री' आणि 'आद्य श्रीशंकराचार्यांबद्दलचे गैरसमज' हे त्यांचे लेखन प्रातिनिधिक स्वरूपात विचारात घेता येईल. अध्यापन हे आपले कर्म हे बरोबरच; पण समाजाचे भान, त्यासाठी यथाशक्ती योगदान आपण द्यावयास हवे, हे सरांकडून शिकले. सर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते!!! त्यांनी बहुमोल असे सामाजिक योगदानही दिलेले आहे. शैक्षणिक क्षेत्रातील सरांचे योगदानही अतुलनीय आहे. आमच्या पिढीचे खरंच हे सौभाग्य की आम्हाला त्यांच्या सारख्या अध्यापकांचा सहवास लाभला. त्यांच्याकडून कळत-नकळत शिकता आले.

देह हा नश्वर आहे; पण माणसाचे कर्तृत्व हे अमर आहे, असे मानणाऱ्यांपैकी सर होते. आज ते देहाने नाहीत; त्यांनी केलेले संस्कार, त्यांचे लेखन, त्यांचे आशीर्वाद हे सातत्याने आहेत आणि पुढेही असणार आहेत. मा. सरांना सश्रद्ध अभिवादन करून, इथेच लेखणीला विराम देते.

**श्लिष्टा क्रिया कस्यचिदात्मसंस्था**
**सङ्क्रान्तिरन्यस्य विशेषयुक्ता ।**
**यस्योभयं साधु स शिक्षकाणां**
**धुरि प्रतिष्ठापयितव्य एव ।।**

**- कविकुलगुरु महाकवि कालिदास**



# मार्तंड जे तापहीन: डॉ. मोहन गोखले सर

**डॉ. गिरीश पिंपळे**



ते वर्ष होतं १९७८. मी आर. वाय. के. महविद्यालयात तिसऱ्या वर्षात शिकत होतो. माझा प्रमुख विषय होता भौतिकशास्त्र (फिजिक्स) शैक्षणिक वर्ष नुकतंच सुरू झालं होतं. एके दिवशी डॉ. मोहन गोखले सरांनी आमच्या वर्गात प्रवेश केला. मध्यम उंची, डोळ्यांवर चष्मा, अगदी साधे कपडे आणि चेहऱ्यावर हलकीशी स्मितरेषा. सरांनी इंग्रजीमध्ये संथपणे बोलायला सुरूवात केली. ते अगदी हळू आवाजात बोलत होते. त्यामुळे अगदी कान देऊन ऐकलं तरच त्यांचं बोलणं समजत होतं. सरांचं बोलणं जसजसं पुढे जाऊ लागलं तसतसं उत्तम इंग्रजी म्हणजे काय याचा प्रत्यय येऊ लागला. अगदी सहज – नैसर्गिक बोलणं. गोखले सरांची पहिली ठसठशीत मुद्रा माझ्या मनावर उमटली ती त्यांच्या ओघवत्या इंग्रजीमुळे.

पुढच्या काळात सरांच्या शिकवण्यातून त्यांची अर्थातच जास्त ओळख होत गेली आणि भौतिकशास्त्र या विषयावर त्यांचं जे असामान्य प्रभुत्व होतं त्याची प्रचीती आली. तसा हा विषय बहुतेक विद्यार्थ्यांच्या पोटात गोळा आणणारा. पण सर त्यात लीलया संचार करत. भौतिकशास्त्र या विषयाच्या दोन ठळक शाखा आहेत – सैद्धांतिक (Theoretical) आणि प्रायोगिक (Experimental). यापैकी पहिली शाखा अधिक अवघड समजली जाते. कारण या शाखेत सगळा भर गणितावर असतो. त्यामुळे प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवता येत नाहीत. गोखले सर नेमके याच शाखेत पारंगत होते. या शाखेत असणारे अनेक अवघड पेपर सरांनी आम्हांला आणि पुढच्या पिढीतल्या विद्यार्थ्यांना शिकवले. नुसते शिकवलेच नाहीत तर त्यातून भौतिकशास्त्राची आवड निर्माण केली.

सरांचं शालेय शिक्षण पुण्याच्या नामवंत अशा नूतन मराठी विद्यालयात झालं होतं.

शालेय जीवनापासून ते अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून परिचित होते. शालांत परीक्षेत (म्हणजे तेव्हाची अकरावी) गणितात १०० पैकी १०० गुण मिळवण्याचा पराक्रम त्यांनी केला होता. त्याकाळी ही गोष्ट अशक्य समजली जात असे. पुढच्या काळात ते फर्गसन महाविद्यालयातून बी. एस्सी. झाले. भौतिकशास्त्रात एम. एस्सी. करण्यासाठी त्यांनी मुंबई आणि कानपूर अशा दोन्ही ठिकाणच्या आय. आय. टी. मध्ये प्रवेश परीक्षा दिल्या होत्या. विशेष म्हणजे या दोन्ही ठिकाणी त्यांची निवड झाली होती ! कानपूरहून पदवी संपादन केल्यावर त्यांना एक विशेष शिष्यवृत्ती मिळाली आणि ते १९६७ मध्ये कॅनडाला गेले. तेथे त्यांनी एम. एस. ही पदवी प्राप्त केली. तेथे ४ वर्षे राहिल्यानंतर ते मुंबई आय. आय. टी. मध्ये पी.एच. डी. साठी रुजू झाले. १९७६ मध्ये त्यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान करण्यात आली.

मुंबईतल्या एका महाविद्यालयात दोन वर्षे नोकरी केल्यावर ते १९७८ मध्ये आर. वाय. के. महविद्यालयात दाखल झाले. सरांकडून शिकणं ही आमच्यासाठी एक बौद्धिक मेजवानीच असायची . विषयातल्या अनेक अवघड संकल्पना सरांनी स्पष्ट केल्या की तुलनेनं सोप्या वाटू लागत. असं अनेकदा घडत असे. गोखले सर अतिशय कमी बोलत. पण ते जे काही बोलायचे ते मार्मिक असे. त्यातून त्यांचा मिश्किल स्वभाव प्रगट व्हायचा. सरांपाशी इतकी विद्वत्ता होती – पण तिचं कुठलंही प्रदर्शन नव्हतं, गाजावाजा नव्हता. विशेष म्हणजे ते कधीही चिडत नसत. 'मार्तंड जे तापहीन' या शब्दांची आठवण व्हावी असं त्यांचं व्यक्तिमत्व होतं.

सगळं काही व्यवस्थित सुरू असताना एके दिवशी अघटित गोष्ट घडली. ३० मार्च १९९८ हा तो दिवस. सर घरातच चक्कर येऊन पडले. त्यांना लगोलग डॉक्टरकडे नेण्यात आलं. काहीतरी गंभीर घडलं होतं. ते बेशुद्ध झाले होते. काही काळानं ते शुद्धीवर आले खरे पण अत्यंत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांची वाचाच गेली होती! शरीरातल्या इतर सगळ्या प्रणाली नीट काम करत होत्या पण सर बोलू शकत नव्हते. मुळात मितभाषी असलेल्या गोखले सरांचं थोडंथोडके बोलणं देखील परमेश्वरानं हिरावून घेतलं होतं! सरांच्या पत्नी रेखाताई, कन्या नुपूर आणि चिरंजीव उर्जित या सगळ्यांनी नानाविध उपचार केले, प्रयत्नांची शर्थ केली. पण त्या प्रयत्नांना हवं तसं यश मिळू शकलं नाही. ते किंचित बोलू लागले पण किंचितच. त्यात आवाज असे पण शब्द कळत नसत. बोलणं हाच ज्या नोकरीचा प्रमुख भाग आहे अशा शिक्षकी पेशात राहणं सरांना आता शक्य नव्हतं. अगदी नाईलाजानं गोखले सरांना नोकरी सोडावी लागली.

मी त्यानंतर सरांकडे नियमितपणे जात असे. बोलता येत नसल्याने ते इतके व्यथित व्हायचे की त्यांना अश्रू आवरता येत नसत. हळूहळू ते सावरले. खाणाखुणा करून बोलू लागले. विशेष म्हणजे त्यांची बुद्धिमत्ता या अपघातानंतरही शाबूत होती. स्मरणशक्ती उत्तम होती. विनोदबुद्धी सुद्धा जागृत होती. इतरांनी केलेल्या विनोदांना हसून दाद द्यायचे. अशा अवस्थेत असताना सुद्धा त्यांनी त्यांच्या मुलाला – उर्जितला – त्याच्या १२ वीच्या आणि नंतर अभियांत्रिकीच्या परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. ही शिकवणी पाटी – पेन्सिलच्या मदतीनं होत

असे. सरांच्या एका विद्यार्थ्याचे या काळात पीएच. डी. च्या प्रबंधाचे काम चालू होतं. विशेष म्हणजे स्वत: इतक्या विचित्र परिस्थितीत असतानाही गोखले सरांनी तो प्रबंध बारकाईने वाचला आणि त्यात दुरुस्त्याही सांगितल्या!

या काळात सरांकडे गेल्यावर त्यांच्याशी काय आणि कसं बोलायचं हा मोठा प्रश्नच असायचा. मग मी त्यावर एक उपाय शोधला. सर भौतिकशास्त्र या विषयाचे केवळ नोकरीपुरते शिक्षक नव्हते तर त्या विषयवार त्यांचं मनापासून प्रेम होतं. आजारपणामुळे ते त्यांच्या आवडत्या विषयापासून दूर गेले होते. त्यांचं मन रमवण्यासाठी त्यांना त्यांच्या आवडीच्या विषयाकडे घेऊन जाणं फार आवश्यक होतं. मग मी या विषयावर वर्तमानपत्रात आलेल्या / इंटरनेटवर मिळालेल्या बातम्या घेऊन त्यांच्याकडे जाऊ लागलो. या बातम्यांचा टाइप लहान असल्यामुळं त्यांना वाचायला त्रास होतो असं लक्षात आल्यावर मी त्या बातम्यांची मोठी झेरॉक्स काढायचो आणि त्यांच्याकडे घेऊन जायचो. काही वेळा त्यांना या बातम्या वाचूनही दाखवायचो. त्यांच्या अत्यंत आवडीच्या विषयात चालू असलेल्या या घडामोडी वाचताना/ऐकताना त्यांचे डोळे लकाकत. चेहऱ्यावर स्मित पसरे. सरांना आपण अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना पण आनंद देऊ शकलो या जाणीवेनं मला आंतरिक समाधान मिळत असे.

मोहन गोखले सर हरहुन्नरी होते. ते संगीतातले दर्दी होते. कॅरम छान खेळायचे. संस्कृतवर त्यांचं प्रभुत्व होतंच पण रशियन, जर्मन या भाषांशी त्यांचा चांगला परिचय होता.

नियतीनं कोणाचीही वाचा अशी हिरावून घेणं वाईटच पण एका उत्तम शिक्षकाच्याबाबत असं घडणं अधिकच वाईट. यात त्या शिक्षकाचं दुर्दैव आहेच पण त्याच्या भावी विद्यार्थ्यांचं देखील आहे. २६ नोव्हेंबर २००४ या दिवशी सरांनी अशा अबोल अवस्थेत या जगाचा निरोप घेतला. त्यांची ती मंद स्मितहास्य करणारी साधी – सोज्वळ मूर्ती आजही माझ्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी आहे...

◆

**संशोधनाने ही बाब सिद्ध केली आहे की, जे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कमी आहेत, ते सामान्य दर्जाचे आहेत, असं समजून शिकवितात, ते विद्यार्थी कधीच उंच झेप घेत नाहीत. किंबहुना आपण अशी झेप घेऊ शकू असा आत्मविश्वास त्यांना वाटत नाही. पण जे शिक्षक सतत काहीतरी नवंनवं शोधून, आपल्या विद्यार्थ्यांना आकाश हीच मर्यादा असं सांगतात, अनोख्या कामाला न बिचकता सामोरं जायला सांगतात, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता विकास पावतात.**

**- श्रीमती लीला पाटील यांच्या 'परिवर्तनशील शिक्षण' यातून संकलित**



# Prof. Madhav Kulkarni

**Mrs. Rajitha Nair**



As a student when we come across some people in our life who play a special role and help us in shaping our future and their inspiration stays alive even after they depart. In my life, I have Late Dr. Madhav Kulkarni Sir. He was Professor at RYK college, who possessed rich experience of 30+ years in various fields of Biostatistics, Statistical Ecology, Medical Statistics, Statistical Consultancy, Distribution Theory, Statistical Inference, Sampling Theory, Design of Experiments, Industrial Statistics, Mathematical Statistics, Descriptive Statistics Research Methodology. He recived the Best Teacher Award from the Sarwajanik Vachanalay, Nashik in the year 2010.

In 2005 I met him first college building. Professor Madhav Kulkarni's first lecture was on Descriptive statistics. He began our lecture with a story of frogs, farmers, and how statistician was the Birbal in solving for the problems. First time, I felt that the lecture did not be over as it had very interesting stories of how to identify problems and solve them using simple statistics. It made me think practically and not theoretically. Till today that key to life has helped me to start my venture and step into his dream of starting a consultancy of analytics in Nashik. His guidance helped me to apply statistics knowledge to Ph. D.

Analysis, corporates, projects, and societal problem solving. His level of confidence was commendable.

Every teacher has their different ways of teaching and facilitating but there are always good and effective teachers who allows us to see ourselves within and by their continuous support and guidance students reach a height. Late Dr. Madhav Kulkarni sir was one among them in my life.

The story with Sir began when I was about to choose the specialization and was confused about whether to choose Mathematics or Statistics. That was the era where Mathematics was more favorable than Statistics due to its less familiarity and awareness of the future career options for Statistics

During our SYBSc course in statistics, in the year 2005, there was a competition in Baramati in which many students from different colleges were participating, Sir chose 5 students. I was among them. He took us to Baramati, He took us to his own Wada at Morgaon and made us meet his most charming mother with whom we stayed at night as the quiz was the next day morning. I remember this experience was the most memorable and precious moment of my life. He took us to Mayureshwar temple (One of the Ashtavinayak) for blessings of Ganpati Bappa before the quiz competition. His confidence in us gave us a different zeal for preparation and our R. Y. K students of Statistics were the first, and second, runner-up winners in that competition.

My confusion about specialization ended there and I was 100% confident in opting for Statistics. In that competition, I got a chance to see how this subject is applicable in various fields and how data plays an important role in decision-making. But my parents were against my decision and they preferred me to opt for Mathematics as any other parent would have thought. During that moment Sir took a stand and visited my house and met my parents and he said just a word, "She is my daughter and I guarantee you that she will never regret her decision". I always envy him because of his confidence in students and how he shaped us in decision-making. He had a good convincing power as well. I was sent for post-graduation to the UNIPUNE Statistics department due to my ranking 9th in the merit list for the entrance exam.

The journey did not end there, but Sir was posted as a Lecturer in the Department of Statistics, University

of Pune, for the year 2007-2008. So the guidance continued during my MSc period as well. I got through campus selection in one of the reputed companies Indian Market Research Bureau- IMRB, Pune.

After a year of service in that company, I had to return to Nashik, leaving my first job since my dad had met with a major accident. That was a tough struggling period when I was Jobless. Sir helped me in getting a position in his department as a lecturer, in B. Y. K College of Commerce and rebuilt my lost confidence. There I started from scratch in teaching under his guidance. There I understood his key to success. He had a great confidence his Guru and mentor Pandurang Vasudeo Sukhatme (1911–1997), who was an Indian Statistician. He is known for his pioneering work of applying random sampling methods in agricultural statistics and biometry, in the 1940s. He was also influential in the establishment of the Indian Agricultural Statistics Research Institute. As a part of his work at the Food and Agriculture Organization in Rome, he developed statistical models for assessing the dimensions of hunger and future food supplies for the world. He also developed methods for measuring the size and nature of the protein gap. I heard a lot of stories from Sir about his learning from his Guru. Along with Sir, I solved many PhD holders Statistical problems in various fields of health science, medical science, and agriculture. He kept me as his right hand. Sir's contribution towards the subject and students was commendable.

Below are some of the experiences and opportunities of working with sir:

1) When I was teaching in MET Bhujbal Knowledge city, Nashik, I was still taking the guidance of Sir and as a coordinator of the event, held an International conference on "Statistics in Action" at YCMOU, sponsored by International Statistical Institute's Outreach Committee for South Asia, International Year of Statistics and with B. Y. K college of Commerce in the year 2013. In this conference many research scholars from different parts of countries had come together to solve research problems in their project and Ph.D. thesis work. It was a fantabulous amalgamation of research and statistics in action.

2) We Worked together in a case study on Anaemia in pregnant womens of Maharashtra which helped Maharashtra Government later in

eradicating Anemia in rural parts of Maharashtra which was later presented in the international conference.

3) In his guidance, we Published a research paper together in 2012, "The Choice of an Appropriate Statistical Technique for Research" Critical Enquiry, Vol IV, Special issue, Feb. 2012.

4) Along with Sir in 2010, A study material prepared for Distance Learning for Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU), Nashik, on "Statistical Techniques".

And the list continued as I was associated with Sir from the year 2005 to 2015 my golden years of learning.

Till today, whenever I am called on any dais as a Chief Guest or a Speaker for data analytics/AI/ML, I always mention my Late Dr. Madhav Kulkarni Guru's learnings and how it helped me in my life to shape my career. I am a firm believer of Bhagavad Gita hence for this Arjun (Rajitha) the roll of Krishna was played by Madhav sir as his name already suggests.

He had a inclination towards Music which was later followed by his younger son Ashish Kulkarni and his flavour towards research was later followed by his elder son Swanand Kulkarni. His presence will always be felt in all the hearts he touched upon. I would always be thankful and obliged to him for mentoring me and bringing the ray of hope and success in my life.

◆◆

Public life must be spiritualized. Love of country must to fill the heart that all else shall appear as of little moment by its side. A fervent patriotism which rejoices at every opportunity for the motherland, a dauntless heart which refuses to be turned back from its object by difficulty or danger, a deep faith in the purpose of providence which nothing can shake, equipped with these the worker must start on his mission and reverently seek the joy which comes of spending oneself in the service of one's own country.

\- **Namadar Gopal Krishna Gokhale**



# सर्वंशोभनीयं सुरूपं नाम : डॉ. निरूपमा कुलकर्णी

**कु. समीक्षा काळे**



आता जवळपास पंधरा वर्षे उलटली पण आजही आमच्या डॉ. निरूपमा कुलकर्णी बाईंची आठवण आली म्हणजे आठवते ती त्यांची करारी नजर, त्यांचा हसतमुख चेहरा, खांद्यावरील शबनम बॅग, अंगावरील शाल...!

आमच्या संस्कृत विभागात बाईंचा रघुवंशाचा तास असला की आम्ही मैत्रीणी, बाई कधी येतील? याची वाट पाहत असायचो. अज-इंदुमती स्वयंवराचे वर्णन ऐकावे ते बाईंकडूनच. ! वाटायचे की आपण ती इंदुमती का नाही?

एकदा बाईंना मधूनच विचारले, 'स्वयंवर म्हणजे किती मज्जा येत असणार ना बाई? 'आपल्या भुवया कौतुकाने उंचावत बाई म्हणाल्या,' बघा त्याकाळीही मुलींना किती चॉईसेस् दिल्या जात होत्या! मग वर्गात एकच हशा पिकला...

'रात्रीर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्..' हा श्लोक आजही कुठे वाचला किंवा ऐकला तरी 'हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार' ह्या शेवटाला बाईंचा गदगद आवाज जसाच्या तसा ऐकू येतो आहे असे वाटते.

डॉ. निरूपमा कुलकर्णी आणि कवी भास ह्यांचं अगदी जिव्हाळ्याचं नातं.! 'भास एक प्रयोगशील नाटककार' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय. भासाचं 'प्रतिमा' नाटक शिकवितांना बाई भासाविषयी अगदी भरभरून बोलायच्या. 'माझा भास, माझा भास' असे ऊर भरून अभिमानाने, कौतुकाने सांगायच्या. . आमच्या मनात कवी भासाविषयी प्रेम हे केवळ बाईंमुळेच निर्माण झाले.

बाईंनी आम्हाला संस्कृतचे केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर शिकवतांना व्यावहारिक ज्ञानही दिले. आपली आजी, आई किंवा बहिणही सांगणार नाही अशी शिकवण त्या सहज देऊन जायच्या. त्यांच्या उच्च शिक्षणाचा, भारदस्त आवाजाचा आणि वयाचा आम्हाला कधी धाक वाटला नाही. याउलट

असे वाटे की आपली आजीच आपुलकीने, प्रेमाने, हक्काने आपल्याशी बोलत आहे. एकदा आम्ही सगळे विद्यार्थी बाईंच्या घरी गेलो त्यावेळी त्या दाम्पत्याला जो आनंद झाला तो आजही आठवतोय. बाईंनी दिलेली गणपतीची एक सुंदर मूर्ती आजही आमच्या देवघरात विराजमान आहे.

आमच्या बाई केवळ शिकविण्यात कुशल होत्या असे नाही, तर त्या उत्तम सुगरण होत्या. त्यांच्या हातच्या नारळी पाकाच्या वड्या, चकली, अळूवड्या विसरलो नाही आहोत. बाईंना फुलांची, गजऱ्याची व फिरण्याची आवड.. एकूणच हौशी व्यक्तिमत्त्व.. !

बाईंनी आम्हाला सामाजिक बांधिलकी शिकवली, परस्पर सहकार्य शिकवले, स्नेहबंध जपायला शिकवले. कॉलेजच्या प्रथम, द्वितीय वर्षातील अर्धकच्च्या टाळूवर शहाणपणाचे तेल बाईंनी मुरवले. आज शिक्षक म्हणून जेव्हा आम्ही विद्यार्थ्यांसमोर उभे राहतो तेव्हा बाईंनी पाजलेले बाळकडू उपयोगी येते. बाईंनी त्यांच्यासारखेच आमचे मन मोठे आणि हात उदार केले. बाई आम्ही तुम्हाला कधीही विसरणार नाही...!

◆◆

**कुमति कीच चेला भरा, गुरु ज्ञान जल होय।**
**जनम-जनम का मोरचा, पल में डारे धोया।।**

**गुरु कुम्हार शिष कुंभ है, गढ़ि-गढ़ि काढ़ै खोट।**
**अन्तर हाथ सहार दै, बाहर बाहै चोट।।**

**गुरु समान दाता नहीं, याचक शीष समान।**
**तीन लोक की सम्पदा, सो गुरु दीन्ही दान।।**

**गुरु मूरति आगे खड़ी, दुतिया भेद कुछ नाहिं।**
**उन्हीं कूं परनाम करि, सकल तिमिर मिटि जाहिं।।**

**सब धरती कागज करूँ, लिखनी सब बनराय।**
**सात समुद्र की मसि करूँ, गुरु गुण लिखा न जाय।।**

**ज्ञान समागम प्रेम सुख, दया भक्ति विश्वास।**
**गुरु सेवा ते पाइए, सद्‌गुरु चरण निवास।।**

**- संत कबीर**



# विद्यार्थी प्रिय प्राध्यापक, गुरुवर्य : ललित एम. समनोत्रा

**प्रो. डॉ. अशोक वसावे**



सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणेचे (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) अपत्य असलेले उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावशी संलग्नित नवापूर सारख्या ग्रामीण आदिवासी भागातील महाविद्यालयात उच्च शिक्षण घेण्याची सोय नव्हती. त्यामुळे मी पदव्युत्तर (राज्यशास्त्र विषय) शिक्षण घेण्याकरिता नाशिकला यायचे ठरविले; परंतु नाशिकला कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा याविषयी साशंकता होती. परंतु याविषयी जेव्हा माझ्या मित्रांकडून कळाले की, उत्तर महाराष्ट्रातील ब्रिटिशकालीन, नामांकित अशा एच. पी. टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. सायन्स महाविद्यालय, नाशिक येथे प्रवेश घ्यावा लागणार आहे, हे ऐकून मी आनंदित झालो. याचे कारण राज्यशास्त्र विभाग व महाविद्यालयाची ख्याती मी ऐकून होतो.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एच. पी. टी. महाविद्यालयात अनेक परिवर्तने झालेली आहेत. या परिवर्तनाच्या काळात प्राचार्य टी. ए. कुलकर्णी (१९२४) यांपासून तर प्राचार्य डॉ. सूर्यवंशी सरांपर्यंतचा (२०२४) हा काळ म्हणजे परंपरा आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम असणारा असाच आहे. प्राचार्य सूर्यवंशी सरांनी महाविद्यालयाच्या शाश्वत विकास व उच्च शिक्षणाची उत्तुंग ध्येयपूर्तीचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेऊन वाटचाल केली आहे. विभागांचे संगणकीकृत करणे, महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा अद्यायावत करणे, NACC मूल्यांकन करून घेण्याची प्रक्रिया, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा- चर्चासत्रे -परिषदा आयोजित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. त्यातलाच एक भाग म्हणजे एच. पी. टी कॉलेजचे 'शतक महोत्सवी वर्ष' २०२४ साजरा करणे हे होय.

यंदाचे वर्ष म्हणजे २०२४. या शैक्षणिक वर्षात एच. पी. टी. महाविद्यालयाला शंभर

वर्षे पूर्ण होत आहेत. तेव्हा 'शतक महोत्सवी' वर्ष साजरे होत आहे याचे औचित्य साधून 'गुरु अर्घ्य' या अंकात माझ्या आठवणीतल्या गुरुवर्यांविषयी, दिवंगत प्राध्यापक ललित समनोत्रा यांविषयी दोन शब्द लिहावेसे वाटतात.

प्रा. ललित समनोत्रा सरांचा जन्म १८ सप्टेंबर १९४३ साली झाला. समनोत्रा सरांच्या पत्नीचे नाव इला असे असून सरांना दोन कन्या आहेत. डॉ. तरुणा (Psychologist and Owner of Special School) आणि प्रियदर्शिनी (Interior Designer). असा लहानसा परिवार. सरांनी सुरुवातीला मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सिन्नर कॉलेजला एक वर्ष प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांची त्यानंतर एच.पी.टी. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख व प्राचार्य एस. पी. सोहनी (१९५२-१९७२) यांच्याशी भेट झाली. कारण प्राचार्य एस. पी. सोहनी सरांचे ते विद्यार्थी होते. त्यानंतर पुढे एच.पी.टी. कॉलेजलाच प्राध्यापक पदी सर कायमस्वरूपी राहिले. व ते २००३ ला रिटायर्ड झाले.

सन १९९९ ते २००० या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात माझा जिवलग मित्र रवी वसावे (सीनियर क्लार्क पाणीपुरवठा विभाग नंदुरबार ) याने माझा प्रवेश निश्चित केला. आणि आम्ही नाशिकला आलो. परंतु आमच्या एका मित्राचे म्हणणे असे होते की, एच. पी. टी. महाविद्यालयात प्रवेश का घेतला आहे? तेथे तर प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसह सर्वजण इंग्रजी मधून संभाषण- संवाद साधतात. त्यामुळे तुमचा टिकाव लागेल काय? असा सवाल उपस्थित केला. परंतु आम्हां मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये सुरुवातीला प्रश्न निर्माण झाले आणि घाबरलो देखील, मात्र जेव्हा कॉलेजला नियमितपणे यायला सुरुवात झाली. तेव्हा विभागातील तत्कालीन विभाग प्रमुख आदरणीय प्रा. समनोत्रा सर, प्रा. संजय आहिरे, प्रा. प्रशांत देशपांडे (विद्यमान उपप्राचार्य व विभाग प्रमुख) व प्रा. विलास देशमुख (विद्यमान प्राचार्य, एम एस डब्ल्यू कॉलेज, नाशिक) आदी सरांशी भेटलो व संवाद साधला, आणि नियमितपणे तासिकांना प्रारंभ झाला. आम्हां विद्यार्थ्यांमध्ये जी भीती होती ती दूर झाली. मनातील भीती दूर करण्यात आदरणीय, गुरुवर्य, प्रा. ललित समनोत्रा सरांचे मोठे योगदान राहिले.

प्रा. ललित समनोत्रा सर इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतून आपले तासांचे व्याख्यान द्यायचे, सरांचे भारतीय संविधान, राजकीय सिद्धांत, आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण हे आवडीचे प्रमुख विषय होते. त्या विषयांवर त्यांचा हातखंडा होता. आम्हां मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांना राज्यशास्त्रातील मूळ इंग्रजी, अवघड अशा संदर्भ ग्रंथांचे भाषांतर करून सोप्या मराठी भाषेत संकल्पना समजावून देत असत. त्यामुळेच ते विद्यार्थी प्रिय प्राध्यापक ठरले. एखाद्या वेळेस सरांना वर्गात यायला उशीर झाल्यास स्टाफ रूम मध्ये लेक्चरसाठी सरांना बोलवायला जायचो तेव्हा ते विनोदी शैलीत, हसतमुखाने इतर प्राध्यापकांसमवेत राजनीतिक गप्पांमध्ये रंगलेले असायचे. त्यांच्या या मनमिळावू स्वभावामुळेच प्राध्यापकांत आणि नाशिकमध्ये परिचित होते.

ललित समनोत्रा सरांनी केवळ राज्यशास्त्रातील सैद्धांतिक बाबींकडेच लक्ष दिले होते असे नव्हे, तर त्यांनी व्यावहारिक दृष्टिकोनांकडेही दुर्लक्ष केले नव्हते. त्यांनी

शैक्षणिक ज्ञानार्जनाबरोबरच, सामाजिक कार्य व राजकारणात देखील स्वतःला वाहून घेतले होते. प्रा. ललित समनोत्रा सर जेव्हा आम्हांस लेक्चर द्यायला यायचे, तेव्हा सरांच्या व्याख्यानांमधून सतत भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, एक कणखर नेत्या म्हणून इंदिरा गांधींच्या नेतृत्वाबद्दल कौतुकास्पद असे अनेक मुद्दे ते सांगत असत. भारताचे पहिले प्रधानमंत्री व भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कन्या, बांगलादेश मुक्तिसंग्राम, बँकांचे राष्ट्रीयीकरण, गरिबी हटाव ची घोषणा, आणीबाणी,ऑपरेशन ब्ल्यू स्टार, भारताला आंतरराष्ट्रीय पटलावर अण्वस्त्रधारी राष्ट्र बनविण्यासाठी व राष्ट्रीय सामर्थ्य प्राप्त करून देण्यासाठी पोखरण, राजस्थान येथील अणुचाचणी, परराष्ट्र धोरण आदी प्रमुख बाबींमधून इंदिरा गांधींच्या सार्वजनिक धोरणाबद्दल व त्यांच्या नेतृत्वावर समनोत्रा सरांची अपार निष्ठा होती, हे स्पष्ट दिसून येते. इंदिरा गांधीजी समनोत्रा सरांना वैयक्तिकरित्या ओळखत असत. काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी सरांचा आणि इंदिरा गांधीजींचा नेहमी टेलिफोनवरून संवाद व्हायचा. राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांशी त्यांचे जवळीक नातं निर्माण झाले होते, हे त्यांच्या या कार्यावरून कळते. ज्यावेळेस स्वर्गीय इंदिरा गांधीजींची हत्या (१९८४) झाली, त्यावेळेस त्यांना अपार दुःख झाले होते. अशी घटना जर घडली नसती तर आज मी एखाद्या महत्त्वाच्या राजकीय वा प्रशासकीय पदावर असतो, असे ते स्वतः म्हणत असत.

समकाळात काँग्रेस या राष्ट्रीय पक्षाला गेल्या लोकसभेच्या दोन पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकांमध्ये (२०१४ व २०१९) उतरती कळा आलेली होती; परंतु २०२४ मध्ये पुन्हा काँग्रेसला (१०० जागा) नवसंजीवनी प्राप्त झाल्याचे दिसून येते! काँग्रेस या राष्ट्रीय पक्षाबद्दलची समनोत्रा सरांची खूपच निष्ठा होती असे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सरांनी बराच काळपर्यंत नाशिक जिल्हा काँग्रेस पक्षाचे सचिव म्हणून भूमिका बजावली. एवढेच नव्हे तर सर काही काळ 'महाराष्ट्र युथ कांग्रेस' पक्षाच्या सचिव पदी सक्रिय राहिले. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाची कोणतीही सभा वा कार्यक्रम असो समनोत्रा सरांचे नाव पुढे येई. ते काँग्रेस पक्षाचे कट्टर कार्यकर्ते होते. त्यांचे काँग्रेस पक्षाशी दृढत्वाचे,अतूट असे नाते होते, असेच म्हणावे लागेल. समनोत्रा सरांनी नाशिक मध्ये काही काळ 'आजाद कलम' नावाचे साप्ताहिक चालविले, त्याचे ते संपादक होते. सरांनी संपादकाचेही कार्य केले.

२००१ मध्ये अमेरिकेतील 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' व 'पेंटागन' इमारतींवर दहशतवादी हल्ला झाला. त्यानंतर दहशतवादाचे स्वरूप जागतिक झाल्याचे मानले गेले. त्यातून उद्भवलेले मानवाधिकारांचे प्रश्न आणि मागील वर्षापासून आजतागायत रशिया-युक्रेन युद्ध व आखाती देशांमधून इजराइल-हमास संघर्ष अशा घटनांतून मोठ्या प्रमाणात मानवाधिकाराचे प्रश्न निर्माण झाले आहे. तर दुसऱ्या बाजूला एच. पी. टी. सारख्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ललित समनोत्रा सरांनी मानवाधिकार जागृती संस्थेच्या माध्यमातून नाशिक शहरात मानवाधिकार जागृती विषयक कार्य हाती घेतले होते. तीच परंपरा कायम राखत राज्यशास्त्र विभागा द्वारा 'युनो दिवस' आणि 'मानवाधिकार

दिन' साजरा करण्यात येतो.

**मानवी हक्क जागृती संस्था आणि प्राध्यापक ललित समनोत्रा:-**

प्रा. ललित समनोत्रा सर एच. पी. टी. कॉलेजच्या राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून १९९७ ते २००३ पर्यंत पदावर कार्यरत राहीले. त्याचप्रमाणे सरांनी मानवी हक्क जागृती संस्था, नाशिक या संस्थेच्या माध्यमातून नाशिक शहरात आणि विभागात मानवी हक्कांच्या जाणीवां संदर्भात विविध उपक्रम घडवून आणले. त्यात सन २००० -२००१ या वर्षात राज्यशास्त्र विभाग व मानवी हक्क जागृती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १० डिसेंबर २००० रोजी मानवी हक्क जागृती अभियानाच्या माध्यमातून 'मानवी हक्क पोस्टर्स प्रदर्शन' शालिमार चौक(हस्ते माननीय किशोर गजभिये, जिल्हाधिकारी, नाशिक) येथे करण्यात आले. व शहरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मानवी हक्कांसंदर्भात ५ हजार बेंचेस विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. यावेळी आम्ही विभागातील सर्व विद्यार्थी व तिबेटियन लोक मोठ्या प्रमाणात उपस्थित होतो.

दहा डिसेंबर २००१ रोजी राज्यशास्त्र विभाग व मानवी हक्क जागृती संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'मानवी हक्क पर्यावरण जागृतीच्या अभियानातून' नाशिक शहरात मानवी हक्क पोस्टर्स प्रदर्शन व ५ हजार वाहनांना मानवी हक्कांबाबतचे स्टिकर्स लावण्यात आले. २४ ऑक्टोबर २००२ रोजी राज्यशास्त्र अभ्यास मंडळ व युनो दिनाचे औचित्य साधून दैनिक देशदूत,नाशिक या वर्तमानपत्राचे संपादक मा. निशिकांत भालेराव यांनी 'जागतिकीकरणाच्या संदर्भात मानवी हक्कांचे भवितव्य' या विषयावर व्याख्यान दिले होते. दहा डिसेंबर २०२२ रोजी राज्यशास्त्र विभाग व मानवी अधिकार जागृती संस्था आयोजित मांनवी हक्क अभियानांतर्गत नाशिक शहरातील शालिमार चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ मानवाधिकार भीत्तिचित्र प्रदर्शन व मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रकाशन उपक्रम घेण्यात आला होता. दहा डिसेंबर २००३ रोजी राज्यशास्त्र व मानवाधिकार जागृती संस्था आयोजित मानवी अधिकार दिनाचे औचित्य साधून, अँड. निशाताई शिऊरकर यांनी 'महिलांवरील अत्याचार व लिंगाधारीत हिंसा' यावर व्याख्यान पर भाषण दिले. २१ नोव्हेंबर २००३ रोजी डॉ. सुहास पळशीकर (विभाग प्रमुख राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग पुणे विद्यापीठ) यांनी 'आघाड्यांचे राजकारण व विचार प्रणालीतील ताणतणाव' या विषयावर व्याख्यान दिले. दहा डिसेंबर २००४ रोजी राज्यशास्त्र विभाग व मानवी हक्क जागृती संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात श्रीमती किरण अरोरा (सेक्रेटरी, जॉईंट वूमन प्रोग्राम, नवी दिल्ली) यांनी 'महिलांवरील अत्याचार व मानवी हक्क' या विषयावर व्याख्यान पर मार्गदर्शन केले.

विभाग प्रमुख, आदरणीय प्रा. ए. बी. देशपांडे यांच्या काळात महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ११ वे अधिवेशन दिनांक २८ ते २९ नोव्हेंबर १९९० रोजी घेण्यात आले होते. त्यात महात्मा ज्योतिबा फुले स्मृती शताब्दी व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष 'स्मृती विशेषांक' प्रकाशित झाले. या परिषदेचे संमेलन उद्घाटक डॉ. त्र्यं. कृ. टोपे (माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ) हे होते. या संमेलनाला

डॉ. य. दि. फडके (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई) यांच्या शुभेच्छा मिळाल्या. परिषदेचे संमेलनाध्यक्ष डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. हरेश मेहता, सरचिटणीस प्रा. किसन चोपडे, गोखले एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी प्राचार्य डॉ. सर मो. स. गोसावी यांचे तर अध्यक्ष मा. आचार्य भाऊसाहेब वर्तक यांचे या परिषदेला मार्गदर्शन लाभले. एच. पी. टी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. चौरे, उप प्राचार्य बी. देवराज, डॉ. आर. पी. देशपांडे, उपप्राचार्य डॉ. एस. ए. कुलकर्णी यांचे या परिषदेला सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्रा. ललित समोत्रांसह, डॉक्टर वंदना तळेकर मॅडम, प्राचार्य मा. डॉ. पी. डी. देवरे (आप्पा) (महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे माजी अध्यक्ष) सर्वांनी या परिषदेत सक्रिय सहभाग घेतला.

एच. पी. टी. महाविद्यालयात खो-खो ची टीम बरीच वर्षे नव्हती. ती टीम आम्ही मित्रांनी मिळून सन २००० मध्ये प्रा. तेलुरे सरांच्या सहकार्याने उभी केली. आणि सेमी फायनल पर्यंत मजल मारली. त्यावेळेस समनोत्रा सरांनी मला शाबासकी दिली होती. तसेच आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत मी स्वतः आणि राज्यशास्त्र विभागाच्या पुढाकाराने एच. पी. टी. महाविद्यालयाची क्रिकेट टीम विजयी ठरली. त्यात प्रथम क्रमांकाचे बक्षीस देखील आम्हांस मिळाले. त्यावेळी समनोत्रा सरांनी मला पाठीवर कौतुकाची थाप मारली.

मी एच. पी. टी. महाविद्यालयाच्या एम. ए. राज्यशास्त्र विषयात विभागात सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आलो. त्यावेळेस मला आदरणीय सर डॉ. एम. एस. गोसावी सरांच्या हस्ते पारितोषिक (चांदीचे मेडल) मिळाले. पदव्युत्तर झाल्यानंतर नहाटा कॉलेज, भुसावळ या महाविद्यालयात (सी.एच.बी. ) रुजू झालो. त्यानंतर २००३ च्या नेट परीक्षेत उत्तीर्ण झालो. त्याच वर्षी प्राध्यापक ललित समनोत्रा सर निवृत्त झाले. आणि ऑगस्ट २००४ मध्ये माझी नियुक्ती एच. पी. टी. महाविद्यालयात लेक्चरर म्हणून झाली. त्यानंतर पीएच.डी. झालो व पदोन्नती द्वारा असिस्टंट प्रोफेसर ते प्रोफेसर पदापर्यंत आज पोहोचलो आहे.


या सर्व यशाचे श्रेय कोण्या एखाद्याला देता येणार नाही तर मला माझे गुरूचे स्थानी असणाऱ्या दिवंगत आदरणीय प्रा. ललित समनोत्रा सरांना हे श्रेय जाते. आणि त्यावेळेस मला अध्यापन करणारे विद्यमान गुरुवर्य, विभाग प्रमुख, उपप्राचार्य मा. प्रा. डॉ. प्रशांत देशपांडे व मा. प्रा. डॉ. संजय आहिरे सरांचे देखील माझ्या या यशात खूप मोठे योगदान राहिलेले आहे. राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व प्राचार्य एस पी सोहनी (१९५२-१९७२) प्रा. एस. जी. मुळे(१९७२-१९७३) प्रा. ए. बी. देशपांडे (१९७३-१९९७) प्रा. एल. एम. समनोत्रा (१९९७-२००३) आणि विद्यमान विभाग प्रमुख व उपप्राचार्य डॉ. प्रशांत देशपांडे (२००४- आजतागायत) अशी या विभागाची गुणवत्तेची परंपरा राहिलेली आहे. या विभागाचे ऋण फेडणे तशी अवघड बाब आहे. सध्या प्रा.हरिष खैरनार व डॉ.गणेश गिरी यांचे राज्यशास्त्र विभागासाठी मोलाचे योगदान आहे.

शेवटी सारांशतः असे म्हणता येईल की, आदरणीय गुरुवर्य समनोत्रा सरांसारखे अष्टपैलू, कर्तव्यदक्ष, संपादक, जनमानसांत


मानवाधिकरांप्रति जाणीवा विकसित करणाऱ्या, राजकारणात सक्रिय असणाऱ्या, राज्यशास्त्र विषयात हातखंड असणाऱ्या, राज्यशास्त्रातल्या मूळ इंग्रजी संज्ञा सोप्या करून मराठी भाषेत अध्यापन करणाऱ्या आमच्या सरांचे आम्हाला घडविण्यात मोलाचे योगदान आहे. त्यांची इहलोक यात्रा २३ फेब्रुवारी २०१७ रोजी संपली. त्यांच्या जाण्यामुळे आमच्यासारख्या प्राध्यापकांचा दीपस्तंभ दूर गेला आहे, राज्यशास्त्र विभागाची अपरिमित हानी झाली आहे, असे वाटते. परंतु त्यांची शिकवण आणि विचार, कार्य यांना आमच्यापासून तसूभरही दूर जाऊ देणार नाही. ते नेहमी आमच्या राज्यशास्त्र विभागास व एच.पी.टी. महाविद्यालयास प्रेरणादायी राहतील! शतक महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचे विचार अजरामर राहतील. यात तीळ मात्र ही शंका नाही.

# उदार मनस्क : प्राचार्य सोहनी सर

**श्री. श्रीराम शंकरराव बिनीवाले**



आज गुरु अर्घ्यच्या निमित्ताने प्राचार्य सोहनी सरांची आठवण झाली. मॅट्रिक पास झाल्यावर १९६९ ला कला विभागात PD ला ॲडमिशन घेतली, कॉलेजमधील नवीन नवलाईचे दिवस जाऊन नंतर अभ्यास सुरु झाला आणि एक दिवस नोटीस लागली, ओळख पत्रासाठी पासपोर्ट फोटो काढून आणावे, मी मेनरोडवरील जगदीश फोटो स्टुडिओमधून फोटो काढला आणि कॉलेज ऑफिसमध्ये दिला, दोन दिवसांनी मला सांगण्यात आले, हा फोटो चालणार नाही, कारण तो फोटो साईड पोजमध्ये काढला होता. त्या वेळेस ऑफिसमधील आर. जे. टोचे ह्यांनी सांगीतले की, ‘तू उपप्राचार्य सोहोनी सर ह्यांना भेट.’ मी भीत भीत सरांकडे गेलो, त्यांना सर्व सांगितले की, ‘सर मला आता वडील परत फोटोसाठी पैसे देणार नाहीत.’ आणि हे ऐकून सरांनी माझ्याकडे दोन मिनिटे बघितले आणि म्हणाले, ‘दे तुझे ओळखपत्र आणि त्यांनी त्या फोटोवर सही केली. हाच माझा त्यांच्याबरोबर आलेला पहिला प्रसंग.’ सोहनी सरांना प्रेमाने आम्ही विद्यार्थी ‘काका’ म्हणत असू. नेहमी विद्यार्थ्यांच्या पाठीशी कायम उभे रहात असत, त्यांची विद्यार्थ्यांबद्दलची आपुलकी खुप होती, कॉलेजमध्ये असताना काका आम्हा सर्वांना सोडुन गेले तो दिवस होता १६/१२/१९७२. सोहनी काकांना विनम्र श्रद्धांजली.



# डॉ. सरल धारणकर : चालता बोलता इतिहास

**श्री. शरद मोरे**



एच. पी. टी. आर्ट्स कॉलेजला अकरावीला प्रवेश घेतला तेव्हाचा काळ खूप वेगळा होता. आपले पालक अत्यंत कष्टाने आपल्याला शिक्षण देत आहेत तर आपण मन लावून शिकले पाहिजे अशा भावनेने मी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेज म्हणजे माझ्यासाठी मनोरंजन किंवा विरंगुळ्याचे ठिकाण नव्हते तर ते माझ्या भविष्याची पायाभरणी करणारे ज्ञानमंदिर होते. शिक्षकांबद्दल आदरयुक्त भीती असायची. डॉ. सरल धारणकर मॅडम आम्हाला इतिहास विषय शिकवायच्या. त्यांच्या तासाला भारताचा इतिहास शिकतांना असे वाटायचे जणू हे सगळे प्रसंग, या सगळ्या घटना आमच्या डोळ्यांसमोर घडत आहेत. मॅडमना ओजस्वी वाणीचे वरदान लाभले होते. आपल्या इतिहास या विषयाला त्यांनी संपूर्ण जीवन समर्पित केले होते. वर्गात अभ्यासक्रमासोबतच त्यांनी आम्हाला अनेक गोष्टी सांगितल्या. यशस्वी करिअरचे महत्त्व, त्यासाठी करावे लागणारे अभ्यासाचे नियोजन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वास वाढविण्यासाठी आवश्यक असणारे वाचन! आपल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त फायदा कसा करून देता येईल या दृष्टीने त्या नेहमी शिकवायच्या. आपल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाव्यतिरिक्तही पुस्तके वाचावी यासाठी मॅडम प्रयत्नशील असत. त्यांच्यामुळेच मला वाचनाची सवय लागली आणि त्याचा पुढील आयुष्यात मला नेहमीच फायदा झाला.

मॅडमना नाशिकबद्दल विशेष आस्था होती. इतिहास संकलन समितीचे काम करतांनाच त्यांनी 'गौतमी गोदावरी' आणि नंतर 'श्री. दादासाहेब बिडकर –वसा आदिवासी सेवेचा' अशी पुस्तके लिहिली. सार्वजनिक वाचनालय समितीच्याही त्या पदाधिकारी होत्या. नाशिकचा इतिहास सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. इतिहास फक्त सनावळ्या पुरता

मर्यादित राहू नये तर तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये; मात्र त्यांची विक्रमाशाली गौरव गाथा पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचावी अशी डॉ. धारणकर मॅडमची भूमिका होती. माझ्या दृष्टीने त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे चालता – बोलता इतिहास होते. विद्यार्थ्यांबद्दल पराकोटीची आस्था असणाऱ्या दुर्मिळ निःस्पृह प्राध्यापकांपैकी त्या एक होत्या. दुर्दैवाने त्यांनी फारच लवकर या जगाचा निरोप घेतला. माझ्यासारख्या विद्यार्थ्यांच्या मनात डॉ. धारणकर मॅडमच्या पवित्र स्मृती कायम राहतील.

**गुरु हा संतकुळीचा राजा ।**
**गुरु हा प्राणविसांवा माझा ।**
**गुरुवीण देव दुजा ।**
**पाहातां नाहीं त्रिलोकीं ।।१।।**
**गुरु हा सुखाचा सागर ।**
**गुरु हा प्रेमाचा आगर ।**
**गुरु हा धैर्याचा डोंगर ।**
**कदाकाळी डळमळीना ।।२।।**
**गुरु वैराग्याचें मूळ ।**
**गुरु हा परब्रह्म केवळ ।**
**गुरु सोडवी तात्काळ ।**
**गांठ लिंगदेहाची ।।३।।**
**गुरु हा साधकाशीं साह्य ।**
**गुरु हा भक्तालागी माय ।**
**गुरु हा कामधेनु गाय ।**
**भक्ताघरीं दुभतसे ।।४।।**
**गुरु घाली ज्ञानाजंन ।**
**गुरु दाखवी निज धन ।**
**गुरु सौभाग्य देउन ।**
**साधुबोध नांदवी ।।५।।**
**गुरु मुक्तीचें मंडन ।**
**गुरु दुष्टाचें दंडन ।**
**गुरु पापाचे खंडन ।**
**नानापरी वारितसे ।।६।।**
**काया काशी गुरु उपदेशी ।**
**तारक मंत्र दिला आम्हाशीं ।**
**बापरखुमादेवीवराशी ।**
**ध्यान मानसी लागलें ।।७।।**
**-संत ज्ञानेश्वर माऊली**



# सा एका देवलोकस्य प्रेषिता अप्सरा! डॉ. गोगटे अनिता महोदया

**डॉ. अश्लेषा कुलकर्णी**
सहाय्यक प्राध्यापिका



डॉ. गोगटे अनिता महोदया आसीत् मम प्राध्यापिका! सा आसीत् मम मार्गदर्शिका! सैव आसीत् छात्राणाम् अतुलनीया प्रेरणा! डॉ. अनिता गोगटे महोदया मम अर्थशास्त्रस्य प्राध्यापिका आसीत्। तस्याः व्यक्तिमत्वे लावण्यस्य तथा च बुद्धिमत्तायाः अद्वितीयं मिश्रणम् आसीत्। सा सदा कार्यरता। अर्थशास्त्रम् अधिकाधिक-छात्राणां प्रिय: विषय: भवेत् एतदर्थं सा आजीवनं यत्नशीला आसीत्। अभिनव संकल्पनानां प्रत्यक्ष प्रकटीकरणम् इति आसीत् तस्याः वैशिष्ट्यम्। इतोऽपि स्मरामि यदा अहं कला शाखाया: द्वितीय वर्षस्य छात्रा आसम् तदा डॉ गोगटे महोदया 'अर्थसङ्कल्प' इति विषयं स्वीकृत्य प्रदर्शिन्या: आयोजनं कृतवती। सर्वे छात्रा: प्रेरिता:। सर्वोत्तमा वेषभूषा, अर्थशास्त्रस्य ज्ञानं, सम्यक् समायोजनं, कार्यालयीन पत्राणां सम्यक् संग्रहणम् एते तस्याः गुणविशेषाः सा अतीव अनुशासनप्रिया आसीत्।

अहं हं प्रा ठा महाविद्यालये २००१ – २००६ एतस्मिन् कालखण्डे पठितवती। प्रतिवर्षं अहं महाविद्यालये प्रथमा आसम्। २००२ वर्षे अहं महाविद्यालयस्य विद्यार्थी प्रतिनिधि तथा च विश्वविद्यालय प्रतिनिधि (General Secretary and University Representative) अपि आसम्। अस्माकं महाविद्यालयस्य प्रतिनिधिरूपेण अहं वक्तृत्वं, निबन्धं, काव्यवाचनं, गीता पठनं, एकाङ्किका, कथाकथनं जनपदं तथा च राज्यस्तरीय प्रतियोगितायां सहभागी भूत्वा नैकानि पारितोषिकानि प्राप्तवती। महाविद्यालयस्य कृते अपि नैकान् विजयकरण्डकान् आनीतवती। प्रत्येके अवसरे डॉ. गोगटे महोदयाया आशिषं प्राप्तवती।

यदा अहं छात्रा आसम् तदा इतिहास, भूगोल, संस्कृत, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थिनी मञ्च, विवेकवाहिनी, विद्यार्थि सभा कस्यापि विभागस्य कार्यक्रमः स्यात् सूत्रसञ्चालनं

ममैव दायित्वम् आसीत्। गोगटे महोदया मम सुसंवादिनी इति नामकरणं कृतवती। मम संस्कृत स्नेहमपि अभिमानस्य विषय आसीत् तस्या:।

अहम् अर्थशास्त्रस्य चयनं मुख्य विषय रूपेण कृतवती अत: सा अतीव आनन्दिता । यदा अहं प्रिं. एस. जी. पुराणिक सुवर्ण पदकं प्राप्तवती तदा तस्या: मनसि अतीव अभिमानस्य भावना आसीत्। मम एम ए तथा NET. परीक्षाया: परिणाम फलं दृष्ट्वा सा अतीव प्रमुदिता नियुक्ता तदा अहम् अर्थशास्त्रस्य छात्राणां। अहं २००६ वर्षे अर्थशास्त्र विभागे प्राध्यापिका रुपेण नियुक्ता तदा अहम् अर्थशास्त्रस्य छात्राणां कृते 'अर्थप्रभात' नाम्ना सांस्कृतिक समारोहस्य आयोजनं कृतवती। गोगटे महोदया प्रफुल्लितमनसा साहाय्यं कृतवती। तस्य समारोहस्य अतीव प्रशंसा अभवत्। अर्थशास्त्रीय सिद्धान्तानां नाटयरूपेण प्रकटनं, प्रहसनं, अर्थगीतं तथा च एडम स्मिथ, आल्फ्रेड मार्शल, कौटिल्य इत्यादयानाम् आर्थिक विचारवन्तानां आत्मगतं छात्रा: तेषां वेषभूषां कृत्वा प्रस्तुतं कृतवन्त:। एतत् सर्वं दृष्ट्वा समारोहस्य प्रमुख अतिथि तत्कालीन महसूल आयुक्त श्री. रामचन्द्र कुलकर्णी महोदय: प्रभावित भाषणे यदा स: डॉ. अनिता गोगटे महोदयाया: अभिनन्दनं कृतवान् तदा सा अनुक्षणमेव उत्थाय उक्तवती, एतत् मम छात्रा अश्लेषाया: प्रयत्नस्य फ़लमस्ति । अहम् किमपि न कृतवती । कियत् विशालं हृदयं ?

अनन्तरं मम नियुक्ति बी वाय .के. महाविद्यालये अभवत् । तत्र गन्तुम् अहम् उत्सुका नासं कारणं गुरुवियोगस्य दुःखं सोढुम् असमर्था अहम् । तदा सा एव मम सान्त्वनं कृत्वा कथितवती, एतदेव अस्ति जीवनं कियत् कालपर्यन्तम् अस्माकं सहवास: भविष्यति? किन्तु, भवती यत्र यत्र गमिष्यति तत्र तत्र अर्थशास्त्रस्य लोकप्रियतायाः कृते प्रयत्नं करणीयम्। गुरु- शिष्यस्य स्नेहस्य अपेक्षया महत्व पूर्णमस्ति छात्र - विषयस्य स्नेहम्। गुरुनिष्ठा श्लाघनीया किन्तु विषयनिष्ठा सर्वश्रेष्ठा।'

तस्या: सन्देशस्य स्मरणं कृत्वा अहं बी. वाय के. महाविद्यालये अपि अर्थशास्त्र विषयस्य लोकप्रियताया: कृते यथाशक्ति प्रयत्नं कृतवती। अर्थप्रदर्शिनि, अर्थसृष्टि नाम्ना सांस्कृतिक समारोह, कृषि -उद्योग प्रदर्शिनि, आन्तरराष्ट्रीय अर्थशास्त्रं तथा च बँन्किग कार्यशाला इ उपक्रमाणाम् आयोजनं कृतवती। प्रत्येके प्रसङ्गे डॉ. गोगटे महोदया तत्र आगत्य मां प्रोत्साहनं दत्तवती।

डॉ. गोगटे महोदया सत्यमेव आसीत् देवलोकस्य प्रेषिता अप्सरा। अप्सरसा: अल्पायु सन्ति इति अस्ति किंवदन्ती। दुर्दैवन् महोदयापि अल्पायुषी आसीत् । तस्या: संपूर्णं जीवनं सर्वे षां कृते प्रेरकम् अस्ति। सा तस्या: जीवनस्य प्रत्येकस्य क्षणस्य सम्यक् उपयोगं छात्र विकासार्थं कृतवती। तस्या: कार्यं अग्रे नयनम् इत्यैव अस्ति श्रद्धांजली।



# आनंदी जीवनाची गुरुकिल्ली देणारे : प्रा. तरसे सर

**श्री. दिनेश चंद्रकांत भावसार**



दहावी पास झाल्यानंतर कुठल्या महाविदयालयात प्रवेश घ्यायाचा हा मोठा यक्ष प्रश्न सर्वांसमोर जसा असतो तसा प्रश्न माझ्या समोर नव्हता; कारण ज्या गोखले एज्युकेशन संस्थेच्या परिसरात लहानाचा मोठा झालो त्याच परिसरातील एच. पी. टी. आर्ट्स अँड आर. वाय. के. सायन्स महविद्यालयात प्रवेश घ्यायचा हे अगोदरच ठरले होते. ११ वी आर्ट्स मध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयाच्या नवीन वातावरणाची सवय करत असताना, काही नवीन विषय कानावर आले त्या नवीन विषयांपैकी मानसशास्त्र हा विषय नवीन होता; पण इतर विषयांपेक्षा या विषयाची थोडी जास्तच उत्सुकता होती.

अकरावीत प्रवेश झाल्यांनंतर थोड्याच दिवसांत सर्व विषयांचे तास सुरू झाले. ''सुप्रभात! विद्यार्थी मित्रांनो, मी श्री. शिवाजी तरसे सर,मी तुम्हाला मानसशास्त्र हा विषय शिकविणार आहे'' असे सांगून, तरसे सरांनी आपल्या बद्दल माहिती दिली व सर्व विद्यार्थ्यांना आपले प्रत्येकाचे नाव सांगायला लावले . प्राथमिक स्वरूपाची ओळख झाल्यानंतर मानसशास्त्र या विषयाची प्रारंभिक ओळख करून देण्यास सरांनी सुरुवात केली. ''मानसशास्त्र म्हणजे मनाचा, मानवी वर्तनाचा अभ्यास. आपण केवळ आपल्या वर्तनाचा जरी अभ्यास केला तरी आपल्या व्यक्तिमत्वात आमूलाग्र सकारात्मक बदल घडवू शकतो. मानसशास्त्राचा समाजातील प्रत्येक क्षेत्रात उपयोग केला जाऊ शकतो आणि त्याचा उपयोग करून, त्या सबंधित क्षेत्रातील व्यक्तीचा, त्या क्षेत्राचा आणि पर्यायाने समाजाचा विकास होऊ शकतो. हे केवळ मी मानसशास्त्राचा शिक्षक आहे म्हणून सांगतो आहे असे नाही'', असे ते मिश्कीलपणे बोलायचे.

सरांचे एक वैशिष्ट्य म्हणजे मानसशास्त्रातील काही व्याख्या, आपल्या समाजात आजुबाजूला जे

काही घडत आहे त्याचा संदर्भ घेऊन, ते समजून सांगत आणि असे केल्याने ते चांगलेच लक्षात राही, कधी कधी तर वर्गातीलच विद्यार्थ्यांच्या मन:स्थितीचा अभ्यास करून संकल्पना स्पष्ट करत असत. वेळप्रसंगी विनोदाचा आधार घेत आणि या शिकविण्याच्या अनोख्या पध्दतीमुळे त्यांच्या तासाला कुठलाही बेंच रिकामा नसे.

त्यांच्या मानसशास्त्र विषयाच्या ज्ञानाव्यतिरिक्त ते सामान्य ज्ञान, व्यावहारिक ज्ञान हे वेळोवेळी देत असत. ते नेहमी सांगत असत की, तुम्ही महाविद्यलयात आले आहात येथील आनंद नक्कीच घ्या पण ह्या वातावरणात हरवून जाऊ नका. तुमचे ध्येय मोठे राहू द्या, समाजपयोगी कार्य करत रहा आणि एक आदर्श जीवन जगा.

जीवनात यशस्वी होण्याकरिता अभ्यास, सातत्यता, नियोजन, वेळेची किंमत करायला पाहिजे हे सांगतांना, ते जीवनाचा आनंद देखील घेतला पाहिजे, हे आवर्जून सांगत असम आणि ते स्वत: असा आनंद खरंच घेत असत. एके दिवशी माझा मित्र नुकताच त्यावेळेस प्रदर्शित झालेला 'बॉर्डर' चित्रपट पाहून मला त्याची कथा सांगत होता. आणि आमचे दोघांचेही लक्ष नव्हते की, सर पाठीमागे केव्हा आले आणि ते देखील कथा ऐकत आहे. मित्राने काही क्षणिक विसावा घेतला तेव्हा सर म्हणाले की, 'पुढे काय झाले?' तेव्हा आम्हाला समजले सर पाठीमागे आहेत आणि ते हसून पुढे निघून गेले. आम्हाला जणू त्यांनी आनंदी जीवनाची गुरुकिल्ली दिली.

अशा ह्या सरांनी जीवनाचा आनंद घेत, अखंड प्रयत्नाने, अभ्यासातील सातत्याने, आपले ध्येय समोर ठेऊन, आपली जबाबदारी, आपले कर्तव्य याचे भान राखत स्वत:चा उत्कर्ष कसा करायचा या ज्ञानाची शिदोरी दिली.

◆◆

**गुरु बिन कौन बतावे बाट**
**बड़ा बिकट यम घाट**

**भ्रान्ति की पहाड़ी, नदिया बीच में**
**अहंकार की लाट ।**
**बड़ा विकिट यम घाट...**

**काम क्रोध दो पर्वत ठाड़े,**
**लोभ चोर संघात ।**
**बड़ा बिकट यम घाट...**

**मद मत्सर का मेहा बरसत**
**माया पवन बह दाट**
**बड़ा बिकट यम घाट...**

**कहत कबीर सुनो भाई साधो,**
**क्यों तरना यह घाट**
**बड़ा बिकट यम घाट...**



# हं प्रा ठा :
# ज्ञानाची 'तदंगभूत' शाळा

**प्रा. अनंत येवलेकर**

कोणत्याही माणसाच्या जडणघडणीत अवतीभोवतीच्या अन्य माणसांबरोबरच परिसरही महत्त्वाची भूमिका बजावत असतो. माझ्यापुरते बोलायचे तर बालपण कोकणात गेले, पुढे चाळीशी ओलांडल्यावर एका दिवाळी अंकात 'माझी पंचविशी' या विषयावर लिहिताना एक विधान असे निघून गेले की माझ्यात जे,जेवढे चांगले आहे ते कोकणाने मला दिले आहे. आता साठी ओलांडल्यावर मागे वळून पाहताना ज्या एका परिसराने तरुण वयात मला कोकणाची आठवण येऊ दिली नाही आणि तितकेच किंबहुना थोडे अधिक चांगले संस्कार केले तो परिसर म्हणजे हं प्रा ठा महाविद्यालय.

प्रवेशासाठी चौकशी करायला गेलो ते वर्तक ग्रंथालय होते. त्यावेळी कँटीनकडे जाण्याच्या रस्त्यावर उजवीकडे पोफळे हॉल, त्याच्या बाजूला प्रशासकीय इमारत आणि त्या इमारतीला लागून छोटय़ा दगडी खोल्यांची बराकीवजा रचना होती. खोल्या जेथे संपत तेथे स्टाफ रूम होती. या सर्व इमारतीच्या दक्षिणेला माळरान होते.

एफ वाय बी ए च्या वर्गातला एक प्रसंग अजूनही आठवतो. पोफळे हॉल मध्ये सकाळी ज मो कुलकर्णी यांचा इंग्रजीचा तास चालू असता अचानक मुरलीधर खैरनार(हे नाव नंतर कळले) आणि त्याचे काही मित्र घोषणा देत वर्गाच्या दारात आले आणि त्यांनी काही पत्रके वर्गात भिरकावली. काही मुलांनी ती उचलून घेतली. बहुतेकांना काय झाले आहे ते कळलेच नाही. तो दिवस होता २५ जून १९७५. पुढे खैरनार आणि त्यादिवशी वर्गात शिकवत असलेले कुलकर्णी सर, अन्य काही प्राध्यापक हे 'मिसा' बंदी झाले.

शिक्षणाची पाच आणि शिकवण्याची ३८ अशी एकूण ४३ वर्षे या परिसरात घालवली. या काळात माणसांपेक्षा जास्त सहवास पुस्तकांचा आणि वृक्षराजीचा होता. सुरुवातीची पाच वर्षे जास्त रमणीय ठरतात. त्याचे कारण अर्थातच हा परिसर. मराठीचे बा. वा. दातार, वाय. पी. कुलकर्णी, राजगुरू, मानसशास्त्राचे ना. बा. दीक्षित, आठवतात. नरहर कुरुंदकर यांचे एक व्याख्यान वर्तक ग्रंथालयाच्या सभागृहात झाले

होते. युवक महोत्सवात एकांकिका लेखनाचे सुवर्णपदक मिळाल्यावर नमस्कार करायला उपप्राचार्य सु. ग. मुळे यांच्याकडे गेलो होतो ते आठवते. विजय तेंडुलकर यांच्या हस्ते कसलातरी पुरस्कार घेतला होता. दोन वर्षे पुढे शिकत असलेल्या प्रमोद कुलकर्णीने शब्दश:अर्थाने बोट धरून स्पर्धात भाग घ्यायला लावला ते आठवते.

नमुनेदार अशा त्या वर्गखोल्या आणि आणखी काही शिक्षक आठवतात. सी.एस. पंडित हे कविता शिकवत. रोमांटिक संप्रदायातील इंग्रजी कवी शिकवताना ते काव्यरसात स्वतः चिंब भिजून जात आणि त्यांची एकूण देहबोली सगळ्या वर्गाला त्या रसात न्हाऊ घालायला आतुर असायची. पंडितसर लॅम्ब्रेटा स्कूटरवर यायचे तर विभाग प्रमुख असलेले मु. गो. देशपांडे सायकलवर. डॉक्टर साळुंखे हे या शिक्षकांपेक्षा तुलनेने तरुण. अमेरिकन साहित्याचा त्यांचा चांगला व्यासंग होता. पुढे त्यांनी मराठीतील काही साहित्यकृतींचे इंग्रजीत अनुवादही केले. भाषाशास्त्र शिकवायला नाशिकरोडहून ह. रा. कडेपूरकर यायचे. त्यांनी पुढे माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात पथदर्शक म्हणून काम केले. देशपांडे यांच्यानंतर विभाग प्रमुख म्हणून बी देवराज आले. ते शेक्सपिअरची नाटके शिकवत. क्षीरसागर, चेडे, पिरजादे हे अन्य काही शिक्षक होते.

महाविद्यालयाने शतक गाठले. या प्रवासाचे सलग साक्षीदार इथले वटवृक्ष आहेत. चहूकडून जमिनीला स्पर्श करणा-या पारंब्यांनी ज्ञानसत्र पुढे चालू राहण्याची ग्वाही दिलेली आहे. कॅम्पस मधून हे वटवृक्ष वजा केले तर मोठी मूल्यघट होईल. महाविदयालयाच्या बाल्यावस्थेत परिसरात वटवृक्ष लावून संस्थापकांनी एक प्रकारे दीर्घायुष्याची हमीच दिली. चिंच आणि कडूनिंबाची काही झाडे परिसरात आहेत; मात्र भारतीय नसलेली झाडे अगदी अपवादाला दिसतील. ५०-६० वर्षानंतर विद्यार्थी पुन्हा कॉलेजमध्ये येतात तेव्हा त्यांच्या वर्गखोल्या न दिसल्याने येणारी बेचैनी ही झाडे पर्णसंभाराची सळसळ ऐकून घालवून टाकतात. आईच्या कुशीत मिळणारी ऊब या झाडांनी कित्येक पिढ्यांना पुरवली. झाड जमिनीवर उभे असते. जमीन त्यासाठी लागतेच. पण ही जमीन पैसे असतील तर विकत घेता येते, विकता येते. मोठी झाडे अशी विकत घेता येत नाहीत. जमीन विकताना तदंगभूत वस्तूंसह म्हणजेच झाड झाडो-यासह फरोक्त खरेदी विक्री होते. यातला सूक्ष्म फरक लक्षात येणे फार महत्त्वाचे आहे. या परिसरात संध्याकाळच्या वेळी वडाच्या झाडांवर पक्ष्यांची शाळा भरते. संध्याकाळच्या वेळी या परिसरात फार जाणे व्हायचे नाही. पण जेंव्हा केंव्हा जाणे झाले तेंव्हा तेंव्हा कानावर पडलेला पक्ष्यांच्या शाळेतला गोड गोंगाट कर्णसंपुटात अजूनही जिवंत असतो. धनंजय गोवर्धनेसारखा चित्रकार आजही या परिसरात आला की त्याला पुन्हा एकदा हाती कागद आणि ब्रश घेऊन बैठक मारावीशी वाटते.

१०० वर्षे हा शैक्षणिक संस्थेच्या जीवनातला छोटा काळ असला तरी फार छोटाही नाही. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या किती पिढ्या येथे आल्या आणि गेल्या. मानवी जीवनात बालपण रम्य आणि तारुण्य धुंद असते. या परिसराने अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञासाठी समिधा पुरवल्या तसे प्रेमात पडलेल्या कितीएक युगुलांच्या स्वप्नांना श्वास पुरवले. येथे त्यांनी आयुष्यभर एकमेकांना साथ

करण्याच्या आणाभाका एखाद्या झाडाखाली घेतल्या असतील आणि पुढे पन्नासेक वर्षे संसार झाला असेल तर जोडीने येऊन त्या झाडाला स्पर्श करणारी दांपत्ये इथे अधूनमधून पाहायला मिळतात. तेव्हाचा चोरटेपणा आता सार्थकतेत बदललेला असतो.

वर्ग खोल्यांमधून दिली जाते ती माहिती. त्या माहितीचा ज्ञानापर्यंत पोहोचण्यासाठी उपयोग होऊ शकतो इतकेच. तीच गोष्ट ग्रंथालयांची. ग्रंथ सर्वांचेच गुरु होतात असे नाही. ज्ञान वर्गखोल्यांच्या बाहेर असण्याची शक्यता केव्हाही अधिक. ते कट्ट्यावर असते, रस्त्यावर, झाडांवर असते, प्राणी पाखरांमध्ये असते. महाविद्यालयाच्या परिसरापुरते बोलायचे तर सी. एस. पंडित कविता शिकवायचे तेव्हा दगडी वर्ग खोल्यांच्या खिडक्यातून दिसणाऱ्या गवताळ माळावर झुलत असायचे ते ज्ञान. विस्तीर्ण पसरलेल्या प्रत्येक वटवृक्षाच्या पारंबीतून ते देशपांडे सरांच्या तासाला जमिनीवर उतरायचे. त्यामुळेच इथले विद्यार्थी आणि शिक्षकांत हा परिसर भिनलेला होता.

पुढची १०० वर्षे हा परिसर असाच राहो. इमारती उभ्या राहतील, पाडल्या जातील; मात्र वटवृक्षाच्या पारंब्या परिसरात पसरतच जावोत.

**जिता भेटता सद्गुरु । आता कां मी पुण्य करू ।।१।।**
**जाहलिया जीवन्मुक्ति । इच्छू का मी मृत्यूप्रती ।।२।।**
**स्वये मी प्रणवरूप । आता कां शास्त्रसंकल्प ।।३।।**
**ज्ञानेश्वर मायबाप । तेणे नेले तिन्ही ताप ।।४।।**

---

**गुरु देव दोन्ही देखिले लोचनी । आधी तो वंदनी श्रेष्ठ कोण ।।१।।**
**माझे मन म्हणें गुरु आधी वंदा । तेणेचि गोविंदा देवपण ।।२।।**
**सर्वाभूती वस्तु दाखवी कृपाळ । तैसा हा गोपाळ नव्हे देख ।।३।।**
**ज्ञानेश्वर मेळवूनी गोपीकांता । कन्या आणि कांता जाहले मी ।।४।।**

**- संत गुलाबराव महाराज**

नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली
निर्मीतो नव क्षितिजे पूढती !
मार्ग आमुचा रोधू न शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा !
चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
अनंत अमुची ध्येया सक्ती अनंत अन आशा
किनारा तुला पामराला

- महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी
ज्ञानपीठ विजेते मा. कुसुमाग्रज

# पसायदान

आतां विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे,
तोषोनि मज द्यावे, पसायदान हे ।।१।।

जे खळांचि व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो,
भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे ।।२।।

दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो,
जो जे वांछील तो ते लाहो, प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळ मंडळी, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी,
अनवरत भूमंडळी, भेटतु भूता ।।४।।

चला कल्पतरूंचे आरव, चेतनाचिंतामणींचे गाव,
बोलती जे अर्णव, पीयूषांचे ।।५।।

चन्द्रमेंजे अलांछन, मार्तण्ड जे तापहीन,
ते सर्वाही सदा सज्जन, सोयरे होतु ।।६।।

किंबहुना सर्व सुखी, पूर्ण होवोनि तिहीं लोकी,
भजिजो आदिपुरुषीं, अखण्डित ।।७।।

आणि ग्रंथोपजिवीये, विशेषी लोकी इये,
दृष्टादृष्टविजये, होआवेजी ।।८।।

येथ म्हणे श्री विश्वेश्वरावो, हा होईल दानपसावो,
येणे वरे ज्ञानदेवो, सुखिया झाला ।।९।।

# महाविद्यालयाचे यशवंत विद्यार्थी

